
विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका



जुलै २०२१

वर्ष पहिले । अंक पहिला

विज्ञान निर्भयता नीती

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

संस्थापक : शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर

स्थापना : ९ ऑगस्ट १९८९

माणसांना विवेकी बनविणारे सशक्त संघटन

## पंचसुत्री

- **शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध**
- **वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार, अंगिकार**
- **धर्माची विधायक कृतिशील चिकित्सा**
- **संत-समाजसुधारकांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न**
- **व्यापक समाज परिवर्तनवादी चळवळीबरोबर सहयोग**



**डॉ. नरेंद्र दाभोळकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

(मराठी मासिक)


जुलै २०२१

वर्ष पहिले | अंक पहिला



**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक मंडळ**

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सह संपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापक मंडळ**

**व्यवस्थापकीय संपादक**
अवधुत कांबळे

**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील



सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी संपादित केले आहे आणि प्रकाशक अविनाश रमेश पाटील यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर ट्रस्ट सहमत असेलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार / इस्लामपूर



**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, 'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रश्नासाठी
हौतात्म्य पत्करलेले
थोर समाजसुधारक
शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना...

आपला आपण स्वत:शीच शोध घ्या.
बुद्धीला कौल लावा.
मूल्यभावनेला प्रतिसाद द्या.
आव्हानाला सामोरे जाणाऱ्या
लोकयात्रेत सामील व्हा.
कारण माणसाला मदत केवळ
माणसेच करू शकतात आणि
माणसेच समाज घडवत असतात
व बदलत असतात.
(डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या 'विचार तर कराल?'
या पुस्तकाच्या ब्लर्बवरुन साभार...)

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** |नितीन शिंदे / उत्तम जोगदंड | ५
- **अभिवादन**
  - उपेक्षित सुधारक : गोपाळ गणेश आगरकर |उत्तम जोगदंड | ७
- **संताचिये द्वारी**
  - संत तुकाराम महाराज आणि अंधश्रध्दा निर्मूलन | हरीदास तम्मेवार | १२
- **चिकित्सा**
  - एक उपवास संकष्टीचा | नितीन शिंदे | १६
  - कोरोना आणि अफवा | प्रमोद गंगणमाले | २३
- **महिला विश्व**
  - काय बाई सांगू, कस गं सांगू? | शब्दांकन - सुशीला मुंडे | ३१
  - कसा गं बाई जातीचा ह्यो किला | रंजना गवांदे | ३४
  - जाहीरात, मालिका आणि स्त्री प्रतिमा | दर्शना पवार | ३७
- **पंचनामा**
  - कधी संपणार जात पंचायतीचा जाच? | कृष्णा चांदगुडे | ४३
- **बुवाबाजी**
  - चुंबकमॅन अज्ञानाची फसवेगीरी | नंदकिशोर तळाशीलकर| ५०
  - मुस्लीम समाजातील भानामती प्रकरण | माधव बावगे | ५३
  - अध्यात्मिक बुवाबाजीचा बिनभांडवली धंदा | ठकसेन गोराणे | ५७
- **चमत्कार जनामनातील**
  - माताजींच्या अजब लीला, क्षणात केला पाण्यापासून बर्फाचा गोळा| मच्छिंद्रनाथ मुंडे | ६१
- **जडणघडण**
  - प्रतिगामी ते परिवर्तनवादी | सुयश तोष्णीवाल | ६३
- **कार्याध्यक्षांची दैनंदिनी** | अविनाश पाटील | ६६
- **अंनिसवार्ता**
  - महा. अंनिसचा अटकेपार झेंडा, युगांडात जादूटोणाविरोधी कायदा | सुदेश घोडेराव | ६८
  - गुंफू हातामध्ये हात, फुलू सारे एक साथ | सुरेखा भापकर | ७०
  - 'मन के साथ मन की बात' एक उत्साह देणारा अनुभव | विनायक सावळे | ७३
  - जागर विवेकाचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा | मच्छिंद्रनाथ मुंडे | ७७
  - शाहू जयंती राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा | विशाल विमल | ७८
  - वटपौर्णिमा दिनानिमित्त... | कल्पना बोंबे| ८३
- **संघटन**
  - डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या स्वप्नातील कार्यकर्ता आणि संघटना | संदेश बालगुडे | ८४
- **कविता**
  - भय | एकनाथ पाटील | ९१

# हवी फक्त नवी उमेद आणि एकीचे बळ....

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा हा पहिला अंक वाचकांच्या हाती देताना आमच्या मनात संमिश्र भावना आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही समताधिष्ठित समाजरचनेचे व्यापक स्वप्न पाहणारी आणि त्यासाठी प्राणपणाने रस्त्यावरचा संघर्ष करणारी, समाजाच्या सर्वस्तरात पोहोचलेली लढाऊ संघटना आहे. समविचारी संघटनांच्या तुलनेत राज्यस्तरावर तिचे जाळे मोठे आहे. आजमितीला राज्याबाहेर देशातही तिचा विस्तार वाढत निघाला आहे. परिणामांची तमा न बाळगता झोकून देऊन प्रामाणिकपणे काम उभारणे हे या संघटनेच्या कार्यकर्त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. 'विचारांनी पक्का कार्यकर्ता आणि अशा कार्यकर्त्यांचे संघटन' हे शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे.

तन, मन, धनाने झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामावर, त्यांच्या उर्जेवर संकुचित हेतूने मर्यादा आणल्या जातात. रस्त्यावरचे संघर्षाचे काम जाणीवपूर्वक एका चौकटीत बंदिस्त केले जाते. ऐनवेळी उद्भवणाऱ्या प्रसंगांना त्या त्या परिस्थितीनुरूप विवेकाने तोंड द्यावे आणि परिस्थितीनुरूपच निर्णय घ्यावेत असा पूर्वानुभव असतानाही असे काम केवळ दुराग्रहापोटी पूर्वपरवानगीनेच करावे असा जेंव्हा दंडक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा कुठल्याही चळवळीच्या इतिहासात जे घडू नये ते घडते. सार्वजनिक जीवनात मतभेदाचे, संघर्षांचे प्रसंग अनेक वेळा उद्भवतात. पण असे मतभेदाचे, संघर्षाचे प्रसंग संवादाने, परस्पर सहमतीने सोडवायचे असतात. पण जेव्हा संवादाची दारे एकतर्फी कायमचीच बंद केली जातात, निस्वार्थी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते, कामावर अविश्वास दाखवला जातो, आर्थिक कोंडी करून सामाजिक कामाला खीळ घातली जाते, तेव्हा भूमिकेवर पक्का असलेला कार्यकर्ता तितक्याच ताठ मानेने आणि सामर्थ्याने पुन्हा उभा राहतो. त्याला काम तर करायचे असते. कितीही कठिण असली तरी नाईलाजाने अशावेळी त्याला कामाची पर्यायी उभारणी करावीच लागते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या इतिहासातही जे घडू नये आणि जे अपेक्षित नव्हते तेच घडले.....

अहोरात्र खपून संघटनेसाठी कार्यकर्त्यांनी लोकवर्गणीतून जमा केलेला जो निधी विश्वस्तांकडे मोठया विश्वासाने सुपूर्द केला होता, तो पुन्हा चळवळीला समाजोपयोगी कामासाठी देताना अडथळे आणले जाऊ लागले. विश्वस्तच जणू मालक झाले. एकापरीने निधी रोखण्याच्या व्युहरचना आखल्या गेल्या. संघटनेचा मूळ हेतूच बाजूला पडतो की काय? असे चित्र निर्माण झाले. या व्युहरचनेत संघटनेचे मुखपत्र असलेले आणि गेली सुमारे तीस वर्ष चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रभर घरोघरी जाऊन, खपून वर्गणीदार व जाहीरातींच्या माध्यमातून मोठ्या कष्टाने उभा केलेले आमचे हक्काचे 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' हे नियतकालिक तांत्रिक मुद्दयांचे भांडवल करून आमच्याकडून हिसकावले गेले. आज मनात याचे प्रचंड दु:ख आहे. निश्चित विचारांच्या

पक्क्या पायावर उभारलेले असे नियतकालिक चळवळीपासून तोडले गेले आणि चळवळीतल्या रस्त्यावरच्या लढाईचा कसलाही अनुभव नसलेल्या मूठभर विश्वस्तांच्या दावणीला बांधून संकुचित बनवले गेले याची मोठी खंत आहे. चळवळीच्या विचार आणि कृतीला बळ देणारे स्वतःचे हक्काचे नियतकालिक असणे हे त्या त्या चळवळीचे मोठे सामर्थ्य असते. त्यामुळे कामाला निश्चित दिशा मिळते. चळवळीचा विचार समाजाच्या सर्व स्तरात पोहोचवता येतो. अशा सामर्थ्याविना चळवळ निष्प्रभ ठरण्याचा धोका असतो. हा धोका विचारात घेऊनच आता नवे पाऊल टाकायचे ठरवले आहे.

चळवळीचे काम थंडावेल की काय? अशी परिस्थीती जेव्हा निर्माण झाली, तेव्हा काम थांबवून तर चालणार नव्हते. पुढे तर जायचे होते, काम पुढे न्यायचे होते. सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या आधारावर आणि शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी दिलेल्या संस्कारांच्या बळावर ताठ मानेने पुन्हा उभे राहायचे होते आणि म्हणूनच कसलाही किंतु मनात न ठेवता अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेची ही नवी सुरूवात आहे. डॉ. दाभोळकरांच्या विवेकी विचारांचे पाठबळ सोबत आहे. तो सशक्त वारसा सोबत घेऊन पुढे वाटचाल करायची आहे. डॉ. दाभोळकरांसह खेडोपाडी पसरलेल्या लहान सहान कार्यकर्त्यांनी गेली सुमारे तीस वर्ष एकत्र खपून या संघटनेची बांधणी केली आहे. या प्रवासात या आधीही आपण आमच्यासोबत होता. इथून पुढे तर तुमच्या सर्वतोपरी पाठबळाची अधिक गरज आहे. कोणाहीबद्दल मनात कसलीही अढी नाही - राग द्वेष तर अजिबात नाही. संवादावर आमचा अजूनही विश्वास आहे, म्हणून तर व्यापक जनसंवादाचे हे नवे पाऊल आहे. हा संवाद अधिकाधिक व्यापक आणि लोकाभिमुख व्हावा, यासाठीच या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा हा आरंभ आहे. या अंकातून समाजबदलाची एक नवी रचना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या प्रवासात आपल्या सर्वतोपरी सहकार्याची अपेक्षा आहे.

ही पत्रिका केवळ विचारपत्रच नव्हे तर चळवळीचे मुखपत्रही असेल. चळवळीच्या आशा, आकांक्षा, विचार, स्वप्ने, दिशा, या पत्रिकेत प्रतिबिंबीत व्हावी, अशी यामागची कल्पना आहे. त्यासाठी फिल्डवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आता लिहिते होण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे संघटनेचा चेहरा पत्रिकेत उमटणार आहे. तांत्रिक आणि आर्थिक अडचणीस्तव आजमितीला छापील स्वरूपात अंक आपणापर्यंत पोहोचवणे शक्य नाही. त्यामुळे सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात ऑनलाईन अंक आपणापर्यंत पोहोचवीत आहोत. आपणा सर्वांच्या सहकार्याच्या बळावर आर्थिक घडी सक्षम झाल्यावर शक्य तेवढ्या लवकर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून छापील स्वरूपात अंक आपणापर्यंत पोहोचविण्याचा आमचा मानस आहे.


या प्रवासात अनेक खडतर आव्हाने समोर आहेत. पण ती अशक्य मात्र नाहीत त्यासाठी हवी फक्त नवी उमेद आणि एकीचे बळ. आपण ते उभे कराल, याची खात्री आहे. प्रतिकूलतेवर मात करीत अपुऱ्या साधनांच्या साहाय्याने काढलेला प्रस्तुत अंक आपणास आवडेल अशी आशा करतो आणि थांबतो.

**संपादक मंडळ**

# उपेक्षित सुधारक : गोपाळ गणेश आगरकर



उत्तम जोगदंड
९९२०१ २८६२८



महाराष्ट्रातील समाज-परिवर्तनाच्या इतिहासासाठी सुवर्णाक्षरांनी कायमस्वरूपी कोरला गेलेला काळ म्हणजे एकोणीसावे शतक. १८१८ साली पेशवाईचा अंत झाला होता आणि इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचा पाय घट्ट रोवून ठेवला होता. देशावर राज्य करतानाच इंग्रजांनी सती बंदीचा कायदा १९२९ साली आणून, अनिष्ट रूढी-प्रथा यापुढे चालवून घेतल्या जाणार नाहीत, याची जाणीव करून दिली होती. महात्मा जोतीराव फुले यांनी याच शतकात आपला 'आसूड' उगारून व्यापक समाजसुधारणेच्या कामाचा पाया रचला होता आणि पूर्ण शक्तिनिशी पत्नी सावित्रीबाई यांना सोबत घेऊन ते तीव्र संघर्ष करीत होते. या पार्श्वभूमीवर, याच शतकाच्या उत्तरार्धात १४ जुलै १८५६ रोजी प्रखर विवेकवादी गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म झाला.

संघर्षमय जीवन म्हणजे काय असते याचे उदाहरण म्हणून आगरकर यांचे नाव सर्व प्रथम घ्यावे लागेल. त्यांच्या केवळ एकोणचाळीस वर्षांच्या आयुष्यात बालपणापासून संघर्ष आणि केवळ संघर्ष ठासून भरला होता आणि या संघर्षात ते एकांड्या शिलेदारासारखे लढले. शालेय शिक्षण घेण्यापासून पुढे अत्यंत गरीब परिस्थितीमुळे संघर्ष करावा लागला आणि कष्टमय जीवन वाट्याला आले. यातूनच पुढे त्यांना दमा झाला आणि आरोग्याच्या आघाडीवर पण संघर्ष करावा लागला. शिक्षण घेतल्यावर चांगल्या पगाराची, सुखाची नोकरी न पत्करता जाणीवपूर्वक अध्यापन आणि समाजसुधारणेचे म्हणजेच लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचे काम स्वीकारले. आणि हे कार्य प्रामाणिकपणे करताना आयुष्यभर आपल्याच नातेवाईकांशी, जनतेशी, मित्रांशी आणि सरकारशी संघर्ष करावा लागला. त्यांचा शेवटचा संघर्ष मृत्यूशी होता आणि मृत्यूनेच या संघर्षाचा अंत केला.

आपल्याला लाभलेल्या या ३९ वर्षांच्या अल्पायुष्यात आगरकर यांनी महाराष्ट्राला जी ‘विवेकवादाची‘ देणगी दिलेली आहे ती अत्यंत अमोघ आहे. त्या काळातील साक्षरतेचे प्रमाण फक्त ९.१ टक्के असतांना आणि एकूणच समाजाची बुरसटलेली मानसिकता पाहता त्यांचे कार्य किती अवघड आणि महान होते हे लक्षात येते.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना

त्यांची गाठ लोकमान्य टिळक यांच्याशी पडली. नंतर त्यांनी टिळकांसोबत देशसेवेस सुरुवात केली. समान उद्दिष्टांमुळे त्यांच्यातील मैत्री एवढी घट्ट झाली की टिळक हे नाव घेताना आगरकर हे नाव आपोआप उच्चारले जाते. जनजागृतीसाठी केसरी आणि मराठा ही टिळकांची वृत्तपत्रे हाती आल्यावर त्यांच्या कार्याला चांगलीच धार आली. अर्थात हे तेवढे सोपेही नव्हते. त्यांनी आपल्या वृत्तपत्रात एका प्रकरणी आवाज उठविल्यामुळे टिळक आणि आगरकर या दोघांनाही चार महीने कैदेची शिक्षा भोगावी लागली.

आगरकर हे विवेकवादी होते आणि आपले जीवन विवेकाने नियंत्रित असावे असा त्यांचा आग्रह असे. ते म्हणत, 'विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोपर्यंत विश्वासाने किंवा श्रद्धेने प्रत्येक गोष्टीत आपला अंमल चालविला यात काही वावगे झाले नाही. जसा लोकांस तसा मनास कोणी तरी शास्ता पाहिजे; व ज्या प्रमाणे मुळीच राजा नसल्यापेक्षा कसला तरी राजा असणे बरे, त्याप्रमाणे वर्तनाचे नियमन करणारे असे कोणतेच तत्त्व नसण्यापेक्षा विश्वासासारखे एखादे स्खलनशील तत्त्व असणे देखील इष्ट आहे. पण हे कोठपर्यंत? अधिक चांगले तत्त्व अस्तीत्वात आले नाही तो पर्यन्त. ते आले की जुन्या प्रमादी तत्त्वाने आपली राजचिन्हे श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केली पाहिजेत. हे सरळ अधिकारांतर येथून पुढे विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे व तसे होण्यातच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखे ऐहिक व पारमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊ लागणार आहे. अशी आमची समजूत आहे. व ती तशी असल्यामुळे विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आच देऊन झाळून पाहणे, हे सुधारकाच्या अनेक कर्तव्यांपैकी एक कर्तव्य होऊन बसते.'

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत आगरकर अत्यंत आग्रही होते. बालविवाह प्रथेच्या बाबतीत केसरीतील एका लेखावरून त्यांच्यात आणि टिळक यांच्यातील मतभेदाचा परिणाम त्यांनी केसरी सोडण्यात झाला. त्यानंतर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या साथीने त्यांनी 'सुधारक' हे स्वतंत्र वृत्तपत्र काढले. आणि या वृत्तपत्राच्या माध्यमातून जहाल सामाजिक आणि राजकीय विचार मांडणे त्यांनी सुरू केले. त्यांच्या या विचारांमुळे त्यांचे नातलग आणि जवळचे मित्र नाराज झाले. खुनाच्या धमक्या देखील येऊ लागल्या. परंतु निर्भीड, विवेकी विचारांच्या आगरकरांनी त्यास भीक घातली नाही. सुधारणांच्या बाबतीत टिळक म्हणाले होते की'.... सुधारणा नको असे 'केसरी' चे म्हणणे केव्हाही नव्हते, पण केवळ बौद्धिकदृष्ट्या किंवा तर्कदृष्ट्या सुधारणेचा विचार करण्यास केसरी तयार नव्हता'. असे असेल तर सुधारणेच्या बाबतीत आणखी कोणती दृष्टी ठेवावी? बुद्धी आणि तर्कच वापरायचे नसतील तर सुधारणा नक्की कशा असाव्यात? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. दुसरा मतभेद म्हणजे सुधारणांची प्राथमिकता. राजकीय स्वातंत्र्य आधी आणि नंतर सामाजिक सुधारणा अशी टिळकांची भूमिका होती तर सांप्रतकाळ (इंग्रजांचे राज्य) सुधारणेस अनुकूल असून आणि ते आपल्या चुका दाखवू शकतात म्हणून राजकीय सुधारणांसोबतच सामाजिक सुधारणाही व्हाव्यात, या बाबत

आगरकर आग्रही होते. त्यांचे म्हणणे रास्तही होते हे सामाजिक सुधारणांच्या बाबतीत सध्याची जी स्थिती आहे यावरून दिसून येते.

जुन्या रूढी परंपरांपैकी हितकारक असतील तर त्यांचे पालन करावे आणि अहितकारक प्रथा टाकून द्याव्यात हे पटवून देताना आगरकर म्हणतात, ' कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता. तितकाच आम्हांसही आहे;.... बऱ्या वाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धी त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठी त्यांचे अंतःकरण जितके कळवळत होते, तितके किंवा त्याहून अधिक आमचेही कळवळत आहे; सृष्टीविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितके त्यांस होते, तितके किंबहुना त्याहून बरेच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनी घालून दिलेल्या नियमांपैकी जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागी आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार.' याचा अर्थ ते परंपरांच्या पूर्णतः विरोधात नव्हते तर त्यांची चिकित्सा करून त्यातील हितकारक, अहितकारक ओळखून हितकारक तेवढेच घ्यावे असे त्यांचे मत होते.

आगरकर यांनी आपले सुधारकी मत मांडताना समाजाच्या आणि व्यक्तीच्या सर्वच अनिष्ट बाबींवर कठोर प्रहार केले. बालविवाह, बाला-जरठ विवाह, विधवांचे केशवपन, स्त्री-पुरुष विषमता, जातिभेद, अस्पृश्यता आदि विषयांवर त्यांनी अत्यंत पोटतिडीकेने आणि परखडपणे आपले विचार व्यक्त केले आहेत.

बाला-जरठ विवाहामुळे अगदी कमी वयात, खरे तर बालवयात सुद्धा, कित्येक मुली विधवा होत. त्या विधवा झाल्यावर त्यांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. त्यांचे केशवपन केले जाई, त्यांना अशुभ मानले जात असे. त्यांना मरेपर्यंत विधवा म्हणून आपले आयुष्य अत्यंत भयानक परिस्थितीत घालवावे लागे. बालवयात लग्न झाल्याने अकाली शारीरिक संबंधांमुळे कित्येक बालिका जखमी होत किंवा काहींचा मृत्यू देखील होत असे. स्त्रियांची ही भयानक अवस्था त्यांना सदैव आसपास दिसत होती, म्हणून या प्रश्नात त्यांनी प्रथम लक्ष घातले. यात सुधारणा करण्यासाठी कायदा आणला जावा असा त्यांचा आग्रह होता. आणि याच प्रश्नावर त्यांच्यात आणि टिळकांत तीव्र मतभेद निर्माण झाले. या प्रश्नावर त्यांनी 'सुधारक' मध्ये विपुल लेखन केले. या कायद्यास विरोध करणाऱ्यांवर ते अत्यंत कठोरपणे तुटून पडले. अशा कायद्यास आक्षेप घेताना आईबापाच्या स्वातंत्र्याचा उच्छेद होतो असे म्हटले गेले. त्यावर आगरकर लिहितात, 'वाहवा! मूर्ख आईबापांनी कधी अज्ञानाने, कधी लोकापवाद भयाने व कधी लोभाने आपल्या आपल्या अल्पवयस्क मुलांचे आमरण नुकसान करावे, आणि ते करण्याचा हक्क त्यांच्याकडे राहू देण्याबद्दल सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या “थंड्या” सुधारकांनी अखिल वातावरण आपल्या आक्रोशाने भरून सोडावे, याहून अधिक विस्मयजनक देखाव्यांची कल्पना करणे देखील कठीण आहे! दुसऱ्यास कुरूप करण्याचा हक्क! पोटच्या पोरीचे कुंकू पुसण्याचा अधिकार! मुलाच्या बायकोस नापितापुढे बसविण्याचे स्वातंत्र्य! असले हक्क, असले अधिकार, असले स्वातंत्र्य राखण्याबद्दल

अकांडतांडव करणाऱ्यास हक्क, अधिकार व स्वातंत्र्य यांचा अर्थ व उपयोग मुळीच समजत नाही, आणि या संबंधाने यांचे बोल स्वातंत्र्याच्या शुद्ध वल्गना होत, असे म्हणणे भाग आहे.' विवाह संमती वयाच्या बिलाच्या बाबतीत काही लोकांचे मत असे होते, की ब्रिटिश सरकारला आपल्या धर्माचारात हात घालू देणे बरोबर नाही. अशांना ते उपहासाने विचारतात, 'भेकड, प्रतिष्ठाखोर हिंदू लोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनी ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठी कोकणपट्टीत तुमचे अनन्वित हाल केले, त्या वेळेस तुमचा धर्माभिमान कोठे गेला होता?..... आता दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकार बुद्धीने आपल्या लहान पोरींवर जुलूम करू नका, येवढे अदबीने सांगत असता त्यावर तुम्ही आपले धर्मास्त्र सोडता, आणि कामाच्या झपाट्यात निराश्रित कुमारिकांची अंगे विदारण्याचा हक्क आमच्या धर्माने आम्हांस दिला आहे, व जर सरकार तो घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचे फळ भोगावे लागणार, अशी धमकी घालता? धिक्कार असो तुम्हाला, तुमच्या धर्माला, आणि तुमच्या हक्काला!!!'

स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत त्यांचे विचार अगदी स्पष्ट होते. जे स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार पुरूषांना आहेत, ते सारे स्त्रियांना दिले पाहिजेत असे त्यांचे मत होते. शिक्षण नसल्याने स्त्रियांच्या बुद्धीची नासाडी होते त्यामुळे केवळ स्त्रियांचेच नाही तर पुरूषांचे देखील नुकसान होते असे ते म्हणत. पुरुष आणि स्त्रियांना समान शिक्षण आणि तेही एकत्र दिले पाहिजे. 'कित्येक पुरूषांनी घरी बसून मुले खेळविण्याचे, लुगडी धुण्याचे, भांडी घासण्याचे, स्वयंपाक करण्याचे, दळणकांडण करण्याचे काम करावे.' असे त्यांचे म्हणणे होते. केवळ विवाहाच्या वेळीच नव्हे तर नंतरही स्त्री पुरुषांची संमती दिसायला हवी हे सांगून स्त्रीशिक्षण, अर्थार्जन, स्वयंवर, घटस्फोट, पुनर्विवाह, संततीनियमन, इत्यादि सर्व सुधारणांचा, सर्वच जातीच्या स्त्रियांसाठी त्यांनी पुरस्कार केला.

जातिभेद आणि अस्पृश्यता याबाबत सुद्धा त्यांची मते अत्यंत आग्रही होती. 'ब्राह्मणांनी विद्या संपादावी, क्षत्रियांनी राज्य करावे, वैश्यांनी व्यापार करावा आणि शुद्रांनी कनिष्ठ प्रतीची सेवा करावी, या व्यवस्थेतून सर्वाधिक झळ अस्पृश्य वर्गाला पोहोचते. समाजाची घाण उपसून समाजाचे आरोग्य सांभाळणाऱ्या वर्गाबद्दल कृतज्ञता बाळगायच्या ऐवजी त्यांनाच अस्पृश्य मानून वाळीत टाकणे त्यांना मान्य नव्हते. जातीभेदामुळे आपल्यात ऐक्य होणे शक्य नाही आणि त्यामुळे राजकीय लढा यशस्वी होणार नाही आणि ते न्याय्य आणि सुसंगतही ठरणार नाही असे त्यांनी सांगितले. "महारांची सावली पडली असताही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून 'आमचा रंग काळा असला व तुमचं रंग गोरा असला म्हणून काय झाले" रंगावर काही मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाही' वगैरे गोष्टी प्रतिपादू लागले. तथापि, त्यांच्या शब्दास जोर येण्याचा संभव नाही व त्याचा परिणामही होणे नाही. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनी ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, ' ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' हे पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यास

महारास मोकळीक दिली पाहिजे” असे त्यांचे मत होते.

अस्पृश्यांशी स्पृश्यांचा जो निंद्य व्यवहार होत असे त्यावर ते म्हणत, ‘‘जोड्यांचा, आमचा सकाळ संध्याकाळ नित्य सहवास असतो! पण चमत्कार हा की, हा सर्वोपयोगी पदार्थ तयार करणारे चर्मकार अपवित्रतेची खाण होऊन बसले आहेत! त्यांच्या हातातील जोडे घेताना 'अरे दुरून टाक, दूर हो, विटाळ करशील,' अशी एकच ओरड करून दिली पाहिजे! मेलेल्या किंवा मारलेल्या जनावराच्या कातड्यापेक्षा जीवंत मनुष्य विशेष अस्पृश्य काय!‘‘

अस्पृश्यता पाळण्यामुळे धर्मावर आणि देशावर संकट येणार याचा इशारा सुद्धा त्यांनी दिला होता. 'आम्ही चालू हिंदू धर्मावर कितीही तीक्ष्ण प्रहार केले; तथापि आमचा देश ख्रिस्ती व्हावा ही नुसती कल्पनाही आम्हास सहन होणारी नाही. आमच्यातील अतिशुद्र लोकांस आम्ही अगदी दूर टाकल्यामुळे त्यांची एकसारखी ख्रिस्ती धर्माकडे धाव चालू आहे, ही गोष्ट आम्हास अत्यंत उद्वेगजनक आहे व या लोकांना आम्ही जवळ घेऊ लागून त्यांचा तिकडील ओघ परत फिरेल तो सुदिन असे आम्हास वाटत आहे!' अस्पृश्यता निर्मूलनाची त्यांची परखड भूमिका सांगताना ते म्हणतात, 'ब्रह्मणेत्तरांच्या हाताचा चहा पिण्यात आम्हांस दोष वाटत नाही. इतकेच नाही, तर आमच्या नीच मानलेल्या महारांची स्थिती सुधारून त्यांची व वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणांची एक पंगत झालेली आम्हांस पाहता येती, तर आम्ही स्वतःस मोठे कृतार्थ मानले असते ही गोष्ट आमच्या बांधवांपासून आम्ही चोरून ठेवीत नाही.'

एवढे प्रखर बुद्धिवादी आगरकर उपेक्षितच राहिलेले दिसतात. त्यांच्याबद्दल त्या काळात अनेक गैरसमज निर्माण झाले. टिळक आणि ते समकालीन होते. टिळक राष्ट्रीय राजकरणात गाजत असल्याने त्यांची छाया सुद्धा आगरकर यांच्यावर पडली असावी. त्यांचे विचार आणि तत्वज्ञान भारतीय नव्हते असा चुकीचा आक्षेप त्यांच्यावर घेतला गेला. त्यांनी आपले तत्त्वज्ञान पाश्चात्य लोकांकडून उसने घेतले असे म्हणून त्यांना दोष दिला गेला. ते धर्मबुडवे आहेत असा आरोप केला गेला. स्वजनद्रोहाचा देखील आरोप त्यांच्यावर केला गेला. समाजसुधारणांच्या बाबतीत आज एकविसाव्या शतकातली परिस्थिती पाहता एकोणीसाव्या शतकात काय भयाण परिस्थिती असेल याची कल्पना केली जाऊ शकते. तशात अत्यंत अल्प आयुष्य लाभल्याने त्यांना पुढे अधिक कार्य करता आले नाही. ते जरी दुर्लक्षित राहिले तरी आपल्या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन करताना आगरकरांचे विचार देखील समोर ठेवले होते याची जाणीव होते. त्यांना विनम्र अभिवादन.

(समग्र आगरकर वाङ्मय, खंड १ वर आधारित)

■ ■ ■

# संत तुकाराम महाराज आणि अंधश्रद्धा निर्मूलन



हरीदास तम्मेवार
९१७५२ ८२२२३

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पंचसूत्रीमध्ये संत समाजसुधारकांचा वैचारिक वारसा पुढे चालवण्याचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. संत साहित्यातील काही अभंग हे महा. अंनिसचे संविधानच असल्यासारखे वाटतात. महा. अंनिसच्या उपक्रमांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असलेल्या अभंगांची रचना लक्षणीय दिसून येते. संत कबीर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, यांचे अभंग कीर्तनप्रवचनामधून प्रबोधन करणारे कीर्तनकार आवर्जून सेवेमध्ये प्रमाण म्हणून वापरतात.

परिवर्तनवादी चळवळ म्हणून महा. अंनिस जो उपक्रम राबवते त्यातील बहुतांशी उपक्रमांना चपखल बसणारे किंवा पूरक ठरणारे अभंग संत साहित्यामधून पदोपदी पहावयास मिळतात. साधारणपणे साडेतीनशे ते आठशे वर्षापूर्वीचे हे साहित्य आजच्या वातावरणामध्येही तितकीच परिणामकारकता साधतात, हे विशेष !

जातीभेद, पशुहत्या, पुनर्जन्म, नवससायास, देव अंगात येणे, भोंदुगिरी, यज्ञादी कर्मकांड, व्यसनाधिनता, शकून अपशकुन, भविष्य, आत्महत्त्या, भूतबाधा, शक्तीची अघोरी उपासना, तीर्थयात्रा, उपवास, सिंहस्थ पर्वणी, मंत्रतंत्रादी विषयास अनुसरुन तुकाराम महाराजांनी केलेले लिखाण हे तत्कालीन धर्म मार्तंडाविरुद्ध केलेले वैचारिक बंडच म्हणावे लागेल. साडेतीनशे वर्षानंतरही या विचाराचे आजही अनन्यसाधारण महत्त्व आहे. इंद्रायणीमध्ये गाथा बुडवण्यामागच्या अनेक कारणांपैकी उपरोक्त विषय हे प्रमुख कारण आहे. या लेखामध्ये फक्त जातीभेद, वर्णभेदाशी संबंधित अभंगांचीच आपण चर्चा करणार आहोत.

भारतातील सर्वच समाजसुधारकांनी ‘ जातीभेद हा सकल समाजाला लागलेला कलंक आहे,‘ असे प्रतिपादन केले. जाती धर्माच्या नावावर जेवढे समाजाचे नुकसान झाले तेवढे नुकसान कोणत्याही नैसर्गिक संकटांमधून झालेले नाही, ही वास्तवता आहे. समाजातील जातीभेदाची ही दरी दूर करण्यासाठी आंतरजातीय आणि आंतरधर्मिय विवाह हा रामबाण उपाय आहे. म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या विषयावर ‘जोडीदाराची विवेकी निवड‘ या नावाने स्वतंत्र विभागही चालवते. वारकरी सांप्रदायाची पार्श्वभूमी पाहाताना हिंदू- मुस्लिम धर्मातील विविध जातीतील संतानी वारकरी सांप्रदायाची सेवा केली आहे. कबीर, मोमीन म्हणजे विणकर, ज्ञानेश्वर ब्राम्हण, सावता माळी, गोरोबा कुंभार, सजन कसाई, चोखोबा महार, रोहिदास चांभार, नामदेव शिंपी, जनाबाई दासी, शेख महमंद मुस्लिम, तुकाराम कुणबी, जगनाडे

मामा तेली अशी कितीतरी नावे घेता येतील. अशा संतांच्या चरित्र आणि साहित्यिक सेवेमुळेच वारकरी सांप्रदायाची चळवळ आजही परिवर्तनवादी, मार्गदर्शक चळवळ म्हणून काम करते. या संतांना पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शन प्रसंगी बडव्यांकडून नक्कीच चुकीची, वारकरी सांप्रदायिक वचनाशी विपरीत आणि अन्यायकारक वागणूक दिली गेली. त्याचा उल्लेख संत चोखामेळादिकांच्या अभंगांमधून आलेला आहे. संत चोखोबांनी आपल्या अभंगांमधून बडव्यांचा निषेधच केला आहे. तरी पण संतांचे परस्पर संबंध हे प्रेमाचेच होते, म्हणून अभंगांमधून ते एकमेकांचा आदरार्थी उल्लेख करतात. जातीभेद हा विषय तुकाराम महाराजांच्या अनेक अभंगांमधून अत्यंत प्रभावीपणे हाताळलेला दिसतो. हे सर्व जगच ईश्वरमय आहे, त्यामुळे भेदभाव करणे चुकीचे आहे. हे सांगण्यासाठी महाराज आपल्या अभंगांमध्ये म्हणतात...

विष्णूमय जग । वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम । अमंगल ॥

कोणी हलक्या जातीचा किंवा कुणी उच्च जातीचा असे म्हणता येणार नाही. जो समाज एखाद्याला जन्मावरुन अस्पृश्य समजून, गळ्यात मडके आणि कमरेला झाडू बांधतो ते दृश्य पाहून तुकाराम महाराजांच्या संवेदनशील मनाला खूप यातना होत असतील. विविध जातीतील माणसे हे समाजरुपी देहाचे अवयव आहेत . यासाठी महाराज लिहितात...

तुका म्हणे एका देहाचे अवयव ।
सुखदु:ख जीव भोग पावे ॥

शैव आणि वैष्णव यांच्या संबंधातील खूप किस्से आणि दंतकथा आपणास ऐकायला मिळतात. शैव संप्रदाय म्हणजे शिवाचे उपासक आणि वैष्णव संप्रदाय म्हणजे विष्णूचे उपासक परंतू वारकरी संप्रदायाने हा भेद बाजूस सारुन अंगणातील तुळशी वृंदावनामध्ये महादेवाच्या पिंडीला आदराचे स्थान देवून तुळशी बरोबरच महादेवाचीही पुजा करण्याचे नियोजन केले. त्यासाठी तर महाराजांनी एक स्वतंत्र अभंग रचनाच केली.

हरिहरा भेद । नाही करु नये वाद ॥
एक एकाचे हृदयी । गोडी साखरेचे ठायी ॥
भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥
उजवे वाम भाग । तुका म्हणे एकची अंग ॥

माणसाच्या मनातून काहीही करुन जात नाही ती 'जात'. असे जातीचे मार्मिक विश्लेषण केले जाते. वास्तविक पाहता माणसाची किंमत जातीवरुन न करता गुणांवरुन करायला हवी. परंतु कितीही उदाहरणे देऊन प्रसंगी फजिती होऊनही सुधारत नाही, तो माणुस कसला? जात हीच मुळात एक अंधश्रद्धा आहे. संत कबीर आपल्या दोह्यातून सांगतात.

जाती न पुछो साधुकी पुछ लिजीये ग्यान ।
मोल करो तलवार का पडी रहन दो म्यान ॥

तद्वतच महाराज म्हणतात...

यातीकूळ येथे असे अप्रमान ।
गुणाचे कारण । असे अंगी ॥

स्वत:ला उच्च वर्णिय समजणारे लोक इतरजनांच्या अज्ञान, अंधश्रद्धा आणि त्यामुळे आलेल्या अगतिकतेचा फायदा घेऊन त्यांना

नाडतात. अशा वेळी महाराज म्हणतात...

या रे या रे लहानथोर । याती भलती नारीनर

करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥

समाजामध्ये लहान-थोर आणि स्त्री-पुरुष हा भेद तर सगळीकडेच दिसतो. विविध क्षेत्रामध्ये तरुणांचे कौशल्य पहायला मिळत असूनही केवळ वयाचे निकष लावून त्यांना डावलले जाते. सद्यस्थितीमध्ये महिला पुरुषाच्या बरोबरीने काम करत आहेत. तरीपण महिलांना पुरुषांनी विविध कारणे दाखवून डावलले आहे. महाराजांच्या काळी तर अंधश्रद्धा आणि पुरातन चालीरीतींचा समाजमनावर पगडा होता. त्याचा सर्वाधिक त्रास दलित आणि महिलांनाच होत होता. परंतू परमेश्वराची भक्ती करण्यासाठी हे भेद मानण्यात अर्थ नाही.

उच्च नीच काही नेणे भगवंत ।

तिष्ठे भावभक्ती देखोनिया ॥

चातूर्वर्णाचा आधार घेऊन समाजात उच्च-निच भाव ठेवून उच्चवर्णीय लोक इतरांना जवळ येऊ देत नाहीत, परंतु महाराज तर याच्या पुढे जाऊन चांडाळ, बाळे, नारीनर आणि वेश्यांनाही वारकरी सांप्रदायामध्ये अधिकार दिला आहे.

ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शुद्र । चांडाळाही अधिकार

बाळे नारीनर । आदिकरुन वेश्याही ॥

असे सांगीतले आहे.

वर्ण अभिमाने कोण झाले पावन ।

ऐसे द्या सांगुन मजपाशी ॥

असा प्रश्नही विचारतात. ही सर्व सृष्टीच एकाची निर्मिती असेल तर भेदभाव कशासाठी !

अवघी एकाचीच विण । तेथे कैचे भिन्न भिन्न ।

वेदपुरुष नारायण । तेणे केले निवाडा ॥

किंवा

यातायाती धर्म नाही विष्णू दासा ।

निर्णय हा ऐसा वेद शास्त्री ॥

किंवा

सकळासी येथे आहे अधिकार ।

कलीयुगी उद्धार हरी नामे ॥

उंच नीच काही नेणे भगवंत ।

तिष्ठे भावभक्ती देखोनिया ॥

या पूर्ण अभंगाचा विषयच भेदाभेद निर्मूलन आहे.

समर्थासी नाही वर्णावर्ण भेद

सामुग्री ते सिद्ध घरी ॥

तसेच

चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलती याती ॥

किंवा

वर्ण अभिमान विसरली याती

एक एका लोटांगणी जाती

यात चंद्रभागेमध्ये स्नान करताना जातीभेद विसरले जातात, एकमेकांना लोटांगण घालतात. स्त्रीपुरुषांचा पदोपदी माऊली नावानेच उल्लेख होतो. नव्हे, वाक्याची सुरुवातच 'माऊली' या शब्दाने होते. परंतू वारी संपवून आम्ही गावाकडे येतो. मग मात्र वारीचा आणि आमच्या दैनंदिन जीवनाचा काहीही संबंध उरत नाही. पुन्हा येरे माझ्या मागल्या! आमचा वारकरी वारीतल्यासारखेच गावाकडेही वर्तन करायला लागला तर आमचा तर उद्धार होईलच पण वारकरी संप्रदायावर टीका करण्याची कुणाची हिम्मतही होणार

नाही. संत तुकोबारायांच्या अभंग रचनेतील फक्त जातीभेद या विषयाशी संबंधित कांही अभंगांचा या छोटेखाणी लेखामध्ये धावता उल्लेख केला आहे.

याशिवाय महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ध्येयधोरणाशी सुसंगत शेकडो रचना तुकाराम महाराजांच्या अभंगांमधून पहावयास मिळतात. त्याचा पुन्हा कधीतरी विचार करुत !

चला ! विवेकाचा आवाज बुलंद करु या !

■ ■ ■

**■ अभिनंदन ■**

**सुरेश बोरसे यांचे कार्यकर्त्यांना बळ**
**६० हजारांची देणगी महा.अंनिसकडे सुपूर्त**



वाघाडी (ता. शिरपूर, धुळे ) येथील ब. ना. कुंभार गुरुजी माध्यमिक विद्यालयात सुरेश बोरसे हे उपमुख्याध्यापक होते. वयोमानानुसार शाळेच्या नोकरीतून बोरसे सर नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. पण सामाजिक कामात हा लोकशिक्षक अधिक कार्यरत झाल्याचा प्रत्यय सेवापूर्ती समारंभ कार्यक्रमात आला. या कार्यक्रमात सरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला ६० हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला आहे. महाराष्ट्र अंनिसचे पूर्णवेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्याला या देणगीतून मानधन दिले जाणार आहे. स्मृतीशेष कर्मवीर व्यंकटराव आण्णा रणधीर यांच्या शिक्षण संस्थेच्या शाळांमध्ये बोरसे सरांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. व्यंकटराव आण्णा रणधीर हे स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी महाराष्ट्र अंनिसचे अनेक वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. महाराष्ट्र अंनिसने उभारलेल्या शनिशिंगणापूरच्या आंदोलनात त्यांना अटक देखील झाली होती. त्याच पाऊल वाटेने बोरसे सर चालत आले आहेत. बोरसे सर यांनी धुळे नंदुरबार जिल्ह्याचे महा.अंनिसचे कार्याध्यक्ष म्हणून काम केले आहे. तसेच खान्देशचे सरचिटणीस म्हणूनही ते कार्यरत होते. उत्तम चमत्कार सादरीकरण, सर्पतज्ञ, वक्ते म्हणून सरांची ओळख आहे आणि आजही ते कार्यरत आहेत. सरांनी महा. अंनिसच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या मानधनासाठी प्रतिमहा ५ हजार रुपये असे वर्षभरासाठी ६० हजार रुपये देऊन दातृत्वची वेगळी पायवाट निर्माण केली आहे. महा. अंनिसचे सरचिटणीस विनायक सावळे बोरसे सरांच्याबाबत बोलताना म्हणाले की, ' महा. अंनिसच्या जिल्हा संवाद बैठकांमध्ये बोरसे सर सहभागी होते. त्या बैठकीत महा.अंनिसचे कार्यवाह परेश शहा यांनी संघटनेची सद्यस्थिती, कार्यकर्त्यांची मानधनामुळे होणारी गैरसोय या गोष्टी मांडल्यावर अनेकांना गहिवरून यायचे. पण बोरसे सरांचे गहिवरने हे कृतिशील होते. त्या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांच्या मानधनासाठी वर्षभर प्रतिमहा ५ हजार रुपये देणार असल्याचे सांगितले होते. नुकताच त्यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम झाला, त्या कार्यक्रमाला बोरसे सरांनी मला आणि परेश शहा यांना आवर्जून बोलून घेऊन ६० हजार रुपये देणगीचा धनादेश दिला. त्यावेळी बोरसे सर असेही म्हणाले की माझ्या जडणघडणीचे श्रेय महाराष्ट्र अंनिसला जात आहे आणि म्हणून या कार्यक्रमाच्यानिमित्ताने मी थोडीशी रक्कम कार्यकर्त्यांच्या मानधनासाठी देत आहे.

बोरसे सरांच्या या कृतीमूळे पुनर्निर्माणाच्या आशा अधिक प्रफुल्लित होतात. प्रयत्नांना, संकल्पांना बळ मिळाले आहे. अशी माणसे आपल्या संघटनेत आहेत, याचा संघटनेला अभिमान आहे. अनेक कार्यकर्ते कुटुंब सांभाळून पूर्णवेळ संघटनेच्या कामाला देतात. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत व्हावी ह्यासाठी संघटनेकडून अशा कार्यकर्त्यांना थोडेसे मानधन दिले जाते. खरे तर हे मानधन म्हणजे पगार नसतो, या मानधनातून कार्यकर्त्यांचा प्रवास, मूलभूत गरजा भागविण्यासाठी तो केवळ आधार असतो. त्यामुळे बोरसे सरांसारखे दाते हे कार्यकर्त्यांच्या कामाचा जोश वाढवत असतात. परेश शहा म्हणाले की, विचारांची बांधिलकी काय असते, याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बोरसे सर आहेत. बोरसे सर मित्र म्हणून तुमचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. असे एक एक बीनीचे शिलेदार सोबत असताना कितीही प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचे बळ मिळते. आज संघटनेच्या अडचणीच्या काळात केलेली ही मदत स्मृतीशेष कर्मवीर व्यंकटराव आण्णा रणधीर यांची आठवण करून देते. त्यांच्या विचारांचा, दातृत्वाचा वारसा आपण आज कृतीशील पुणे पुढे नेत आहात. त्याबद्दल खूप खूप धन्यवाद !■

# एक उपवास संकष्टीचा



डॉ. नितीन शिंदे
९८६०४ ३८२०८

'आज संकष्टी आहे' आणि 'आज एकादशी आहे' ही दोन वाक्य कानावर पडली, तर कोणाच्या तोंडातून ही वाक्य आलेली आहेत, याचा हमखास अंदाज बांधता येतो. पहिलं वाक्य उच्चशिक्षीत अथवा नोकरदार वर्गाचं, तर दुसरं वाक्य शेतकरी आणि कष्टकरी वर्गाचं प्रतिनिधीत्त्व करतं. दोन्हींचा उद्देश एकच असतो, उपवास करणे. परंतू सदरचा उपवास करण्यामध्ये या दोन्ही वर्गांमध्ये प्रचंड तफावत जाणवते. जुलै महिन्यामध्ये आषाढी एकादशी बरोबरच अंगारकी संकष्टी देखील येत आहे. संकष्टीचा उपवास सोडण्यासाठी ज्या चंद्राचा उपयोग केला जातो, त्या चंद्रावर अमेरिकेच्या नासा आणि भारताच्या इस्रोने राबवलेल्या मोहिमांची सुरवात देखील याच महिन्यात झालेली आहे. केवळ एवढच नाही, तर जुलै महिन्यातील संकष्टीशी दोन भारतीय महिने निगडीत आहेत. असं का? या सर्वांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करूया आणि कालांतराने योग्य काय आणि अयोग्य काय याचा निर्णय आपणच घेऊयात.

सुशिक्षितांवर फार मोठा प्रभाव असलेला कर्मकांडाचा आधुनिक प्रकार म्हणून उपवासाकडे पाहिलं जातं. शिकलेले उपवासाचं समर्थन करताना एक वैज्ञानिक मुलामा देतात. आपण रोज जेवत असतो, त्यामुळे पोटाला एक दिवस विश्रांती असावी म्हणून उपवास. खरं पाहिलं तर उपवासाच्या दिवशी पोटाला विश्रांती देण्याऐवजी खाण्याचं प्रमाण वाढलेलं असतं आणि त्यात विविधतासुद्धा असते. अर्थात निरंकारी उपवास करणारे काही अपवाद असतात हे मात्र नक्की. सुशिक्षितांच्या 'पोटाला विश्रांती' या उपक्रमाची चिकीत्सा केली, तर अनेक पैलू उलगडता येतात. तथाकथित सुशिक्षितांनी केवळ आपल्या पोटावर विश्रांतीचा अन्याय करण्यापेक्षा शरीरातील इतर अवयवांनासुद्धा विश्रांती देण्याची गरज आहे. प्रथमत: हा प्रयोग आपण आपल्या छोट्याशा हृदयावर करून पाहिला, तर बरं होईल. आपलं हृदयसुद्धा वर्षानुवर्षे सारखं आकुंचन- प्रसरण पावत आहे. आठवडयातून त्यालासुद्धा एक दिवस विश्रांती देऊया आणि काय होतंय ते तपासून पाहुया. मला वाटतं, असं करण्याच्या भानगडीमध्ये कोणीही पडणार नाही. त्यामुळे पोटाला विश्रांती म्हणून उपवासाचा पर्याय हे समर्थन योग्य नाही. आपण रोज काम करत असू, तर आपणाला उर्जेची आवश्यकता असते आणि ती भागवण्यासाठी अन्नाची गरज असते. त्यामुळे वैज्ञानिकदृष्टया उपवास ही संकल्पना समर्थनीय

नाही.

उपवासाची संकल्पना कशी आली हे पाहिलं, तर त्याचा योग्य अर्थ समजून येईल. 'उप' म्हणजे जवळ आणि 'वास' म्हणजे राहाणे. उपवास म्हणजे जवळ राहाणारा. पूर्वी रानोमाळ आणि जंगलामध्ये भटकणारा माणूस शिकार करून आणि कंदमुळं खाऊन आपली गुजराण करत होता. अन्न साठवून ठेवण्याची कला त्याच्याकडे नव्हती. आजच्या सारखा फ्रिज किंवा गोडाऊन त्या काळी नव्हते. त्यामुळे रोज सकाळी तो अन्नाच्या शोधात बाहेर पडायचा आणि संध्याकाळी परत यायचा. पुन्हा सकाळी रोजगाराला असं नित्यनियमाने त्याचा दिनक्रम सुरू असायचा. हे करत असताना त्याच्या लक्षात असं आलं की, मी रोज माझ्या उदरनिर्वाहासाठी बाहेर पडतो, परंतु ज्याला देव मानलं त्या पंचमहाभूतांकडे लक्ष द्यायला मला वेळच नाही. त्याची पूजाअर्चा करायचीच राहून जात आहे. त्यामुळे एक दिवस तो पूजाअर्चा करण्यासाठी देवासमोरच बसून राहू लागला. अन्नासाठी त्याला बाहेर जाता येत नव्हतं. त्या दिवशी त्याची शिकार करणं आणि कंदमुळं शोधणं बंद असे. ज्या दिवशी तो अन्नाच्या शोधासाठी बाहेर जात नसे, त्या दिवशी त्याला अन्नापासून वंचित राहावं लागत असे. अन्न न मिळाल्यामुळे त्याचा खरोखरचा उपवास घडत असे. उपवास करायचा म्हणून नव्हे, तर अन्नच नसल्यामुळे प्रत्यक्षात उपासमार व्हायची. कालांतराने परमेश्वराची उपासना करण्यासाठी उपवासाची संकल्पना रूढ झाली.

सुशिक्षित माणसं उपवासाला आणि त्यातही संकष्टीला किती महत्त्व देतात याचा मला आलेला एक अनुभव अत्यंत मजेशीर आहे. दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र परिषदेसाठी आम्ही भौतिकशास्त्राचे काही प्राध्यापक एकत्रितपणे सहभागी होण्यासाठी गेलो होतो. सकाळी हॉटेलवर पोहोचल्यानंतर नाष्टा करण्यासाठी बरोबर आणलेले खाण्याचे साहित्य टेबलवर ठेवून खाऊ लागलो. एका प्राध्यापक मित्राने पोह्याचा चिवडा तोंडात टाकला. त्याचक्षणी दुसऱ्या मित्राने आज संकष्टी असल्याचा उल्लेख केला. क्षणाचाही विलंब न करता सदर मित्राने तोंडातील सर्व चिवडा क्षणार्धात टाकून दिला. पाण्याने खळखळून स्वच्छपैकी तोंड धुतलं आणि केवळ चहा पिऊन त्याने उपवासाला सुरूवात केली. असं करणारा मित्र चक्क चंद्र ताऱ्यांचा अभ्यास करणाऱ्या भौतिकशास्त्र विषयाचा प्राध्यापक! त्याच्या त्या कृतीने आम्हाला हसू आले. नंतर दिवसभर परिषदेला उपस्थित राहिलो आणि सायंकाळच्या जेवणासाठी परिषदेच्या ठिकाणी पोहोचलो. जेवणासाठी शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारची व्यवस्था होती. त्यावेळी मात्र संकष्टीच्या उपवासकर्त्या मित्राने मांसाहारीची रांग पकडत चिकन आणि मटणावर यथेच्छ ताव मारला. उच्चशिक्षित वर्गाच्या उपवासाच्या संकल्पना आणि असलेला बेरकीपणा अधोरेखित झालेला होता. कमी अधिक प्रमाणात सर्वत्र हे चित्र अनुभवायला मिळतं.

आजही चंद्राशी निगडीत व्रतवैकल्यांची भारतीय समाजामध्ये तुफान आवक झालेली आहे. यापैकी संकष्टीचं एक फार मोठ फॅड भारतीय समाजामध्ये आलेलं आहे. शिक्षित आणि त्यातही उच्चशिक्षितवर्ग मोठ्या संख्येनं या कर्मकांडात अडकलेला आहे. अहो, ज्या चंद्राशी संबंधित हा विधी आहे, त्या चंद्राचा आपण कधी अभ्यास केला काय? गॅलिलिओने या चंद्राकडे आपली टेलीस्कोप १६०९ साली रोखली आणि त्याच्या असं लक्षात आल की, चंद्र दिसतो तेवढा सुंदर आणि तेजस्वी नाही. तर चंद्रावरती खड्डे आहेत. म्हणजे चंद्रावर खड्डे आहेत, ही सिद्ध झालेली गोष्ट आहे. तरीसुद्धा आमचं एखादं तरूण पोरगं, दिसली पोरगी की म्हणतं 'चाँद जैसा मुखडा' आणि पोरगीला पण भारावल्यासारखं वाटतं. खरं तर, भारावून जाण्याची गरज आहे काय? जाब विचारला पाहिजे की, ‘बेट्या  माझा चेहरा खड्ड्यासारखा आहे का?‘ पण काय करणार, वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यात आपण फारच एक्स्पर्ट आहोत. आपण समजतो एक आणि असतं वेगळंच. दैनंदिन जीवनातील गैरसमजूतीचे असे असंख्य दाखले देता येतील. एकंदर जागतिकीकरणाने जी एक अनिश्चितता निर्माण केलेली आहे, त्याचं संकष्टी हे एक अपत्य आहे. १९९० पर्यंत या संकष्टीनं समाजाला घेरलेलं नव्हतं. किंबहुना शेतकरी, कष्टकरी आणि शेतमजूर हे बहुजन परंपरेतल्या विठ्ठलाच्या एकादशीलाच महत्त्व देत होते व आजही देतात. एकादशीचा उपवास अत्यंत साधेपणाने साजरा करणारा कष्टकरी वर्ग कोणत्याही प्रकारच्या भपकेपणाला निमंत्रण देत नाही. बहुतेक याला छेद म्हणून संकष्टीचं वारं शिकलेल्या आणि उच्चशिक्षित वर्गामध्ये सोडलं गेलेलं असावं. संकष्टी सोडण्यासाठी तर चंद्राची आवश्यकता असते. आज एकविसाव्या शतकामध्ये या रूढीचं प्राबल्य वाढलेलं असेल, तर तो शिक्षण व्यवस्थेचा दोष म्हणावा लागेल. चंद्राच्या उगवण्याचा आणि आपल्या जेवणाचा काय संबंध? इतर वेळी चंद्र उगवत नाही का? चंद्र रात्री बारा वाजता उगवत असता, तर आपण जेवायचं थांबलो असतो का? अहो, आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठ्या गुरू ग्रहाला जवळपास चौसष्ट उपग्रह आहेत. याचा अर्थ गुरूला चौसष्ट चंद्र आहेत. आपल्या पृथ्वीला एकच चंद्र आहे, म्हणून संकष्टी महिन्यातून एकदा येते. आपण जर गुरू ग्रहावर असतो, तर संकष्ट्या किती आल्या असत्या? चौसष्ट! महिन्यातून चौसष्ट संकष्ट्या कराव्या लागल्या असत्या. याचा अर्थ दिवसाला दोन संकष्ट्या पडल्या असत्या. एक सोडेपर्यंत दुसरी लागली असती. केली असती का? हा मुख्य प्रश्न आहे. आपण काय करत असतो, याचं भानच आपण ठेवत नाही. भारतीयांनी चंद्रावर जाण्याची स्वप्नं पाहाण्यापेक्षा उपवास सोडण्यासाठी त्याचा वापर करावा, यासारखं दुर्दैव नाही.

उपवासाचं प्रमाण महिला वर्गामध्ये जास्त आहे. अर्थात पुरुषप्रधान संस्कृतीतून आलेलं हे कर्मकांड आहे. स्त्रियांच्या माथी

संकष्टीबरोबर श्रावणातले सोमवार, हरितालिकेचा उपवास, नवरात्रीचे उपवास, मार्गशीर्ष महिन्यातील गुरूवार, रथसप्तमीचे उपवास, यल्लमाचा मंगळवार, आंबाबाईचा किंवा संतोषीमातेचा शुक्रवार अशी प्रचंड रेलचेल उपवासाच्या निमित्ताने पाहायला मिळते. आठवड्यातील जवळजवळ सहा दिवस उपवासाचे येतात. प्रत्येक उपवासाच्या पाठीमागे एक कथानक असतं. सदरचं कथानक विज्ञानाच्या कसोटीवर अजिबात टिकत नाही. नवरात्रीचा उपवास तर महाभयानकच आहे. नवरात्रात नऊ दिवस नुसतं फळं खाऊन काहीजण जगतात आणि नवरात्र संपल्यानंतर शुगरचा पेशंट म्हणून डॉक्टरकडे हेलपाटे घालत फिरतात. या काळात अनेकजण चप्पल घालतच नाहीत. कॉलेजला येणाऱ्या मुलांनी चप्पल न घालता फिरणं कसंतरी वाटतं. पूर्वीच्या काळी माणूस अनवानीच फिरत होता. परंतु त्याला चप्पलचं महत्त्व पटल्यामुळेच तो आधुनिक युगात चप्पल घालून फिरतो. नवरात्रीत मात्र अनवानी फिरण हे वेगळंच खूळ उच्चविद्याविभूषितांच्या मनात भरलेलं आहे. स्वत: अनवानी फिरून आपले चप्पल गरीब मुलाला दिले असतील, तर त्या उपवासाचं कौतुकच करायला पाहिजे. पण असे होणे नाही! काहीजण नवरात्रीत मौन व्रत पाळतात. त्यातून ते काय साध्य करतात, हा संशोधनाचा मुद्दा आहे. जनावरं तर कायमस्वरूपीच मौनव्रत धारण करत असतात आणि अनवानीच रानोमाळ फिरत असतात. मग फरक तो काय राहिला?

महिलांमध्ये उपवासाचं प्रमाण जास्त असल्यामुळे जवळपास भारतातील ऐंशी टक्के महिला रक्तपांढरीने आजारी आहेत. त्यांच्यामध्ये हिमोग्लोबीनचं प्रमाण कमी आहे. याचा परिणाम त्यांना ॲसिडीटीच्या त्रासाकडे घेऊन जातो. तसेच हिमोग्लोबीनच्या कमतरतेमुळे रक्तदान करण्यासाठी येणाऱ्या बहुसंख्य मुली रक्तदानासाठी पात्रच ठरत नाहीत. सुशिक्षितांच्या अनेक बाबींचं अनुकरण अशिक्षित करत असतो. त्यापैकी एक, उपवास आहे. अशिक्षित मात्र खरोखरचा उपवास करतो. नेहमी कष्ट करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या महिला अत्यंत तन्मयतेने उपवास करतात आणि स्वत: च्या तब्येतीचं नुकसान करून घेतात. त्यांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. शिकलेला वर्ग मात्र फार मुत्सद्दी आणि धूर्त असतो, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. उपवासाच्या नावाखाली तो काय काय खातो, किती खातो आणि किती वेळा खातो याचा हिशोबच नाही. वेफर्स, खिचडी, शाबूचिवडा, शाबूवडा, डिंकलाडू, राजगिरा लाडू, शेंगदाणे, विविध प्रकारची फळे, इत्यादी. विचारच करायचा नाही असं ठरवलं, तर उत्तरं शोधण्याचा प्रश्नच येत नाही. उपवासाला हेच पदार्थ का चालतात? कोण ठरवतं? याची उत्तरं मिळत नाहीत. आमच्या संस्कृतीतून आणि परंपरेनं हे चालत आलेलं आहे, हे नेहमीचंच उत्तर.

आजच्या आपल्या उपवासाची काय

अवस्था आहे? उपवासाचा मुख्य पदार्थ शाबूदाणा आहे. खरं तर, १४९८ मध्ये वास्को डी गामा ज्यावेळी केप ऑफ गुडहोपला वळसा घालून भारतामध्ये आला, त्यावेळी त्याने शाबूदाणा आणला होता, हे वास्तव आहे. पोर्तुगीज संस्कृतीचा शाबूदाणा हा पदार्थ भारतीय संस्कृतीला कसा चालतो? आणि उपवासाला शाबूदाणाच का? असा प्रश्न कोणाला विचारायचा हा प्रश्नच आहे. शाबूदाणा हा कंदमुळापासून तयार करतात. पचायला अत्यंत जड असलेला पदार्थ खाण्यामुळे पोटाची अवस्था काय होत असेल, याचा विचार न केलेलाच बरा. बदल म्हणून खिचडी किंवा कोणताही पदार्थ खाण्याला विरोध असण्याचं कारणच नाही.

संकष्टीचा उपवास सोडण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या याच चंद्रावर दि. २१ जुलै, १९६९ रोजी पहिलं पाऊल ठेवणाऱ्या नील आर्मस्ट्राँग, एडविन ऑल्ड्रीन, मायकेल कॉलीन्स सहित आजपर्यंत बाराजण चांद्र मोहीम पूर्ण करून सुखरूपपणे पृथ्वीवर परत आलेले आहेत. भारताची चांद्रयान-२ मोहिमसुध्दा याच महिन्यात दि. २२ जुलै २०१९ रोजी राबवण्यात आली होती. शेवटच्या क्षणी ती मोहिम अयशस्वी ठरली असली तरी चंद्रावर पाऊल ठेवण्याची तयारी इस्रो आजही नव्या उमेदीने करत आहे. कल्पना चावला, सुनीता विल्यम्स्, राकेश शर्मा यांची नावं अभिमानाने मिरवणारे आम्ही मात्र संकष्टी सोडण्यासाठी चंद्राच्या उगवण्याची आणि नंतर त्याला ओवाळण्याची वाट पाहात आहे. आपण काय करतो, याची थोडीशी चिकित्सा करून पाहुया. चंद्रावर सध्या माणूस आहे, असं आपण गृहित धरूया. म्हणजे आपल्या गावातील सुनील चांद्रवीराच्या रूपामध्ये सध्या चंद्रावर आहे. सुनीलची चंद्रावर सकाळ झालेली आहे. सकाळी- सकाळी चंद्रावरील माळरानावर सुनील काय करत असेल, हे सांगता येत नाही. नेमकं त्याचवेळी आपली संकष्टी सोडण्याची १०.५१ ची वेळ झालेली आहे. आपण नैवेद्याच ताट घेऊन चंद्राकडे म्हणजे सुनीलकडे पाहून ओवाळत आहे आणि आरती करत आहे. आरती झाल्यानंतर जेवणासाठी फ्री. काय पण आपली कर्मकांड! सुनील काय करतोय आणि आपण काय करतोय. जरा डोकं वापरूया ना! चंद्राला ओवाळत बसण्यापेक्षा चंद्रावर गेलेल्या चांद्रवीरांचा लेखाजोखा पाहुया आणि आपल्या मुलांना अंतराळात झेप घेण्यासाठी प्रवृत्त करूया.

संकष्टी चतुर्थी म्हणजे अमावस्या संपल्यानंतरचा चौथा दिवस. या दिवशी मंगळवार आला तर त्याला अंगारकी संकष्टी म्हणतात आणि गणपतीपुळे येथे गर्दीचा महापूर लोटतो. अस का? मंगळवार आणि अंगारकी याचा काय संबंध? याची उत्तरंच मिळत नाहीत. ठरवलं म्हणजे ठरवलं. संकष्टी दिवशी कोणता भारतीय महिना आहे अस विचारल, तर दोन प्रकारची उत्तर मिळतात हे वास्तव आहे. उत्तर भारतामध्ये वेगळा आणि दक्षिण भारतामध्ये वेगळा.

भारतीयांचे सण अथवा उत्सव हे एकाच तारखेला येत नाहीत. याचं कारण भारतीय पध्दतीने होणाऱ्या कालगणनेमध्ये आहे. या कालगणनेमध्ये भारतीय महिन्याची सुरुवात अथवा शेवट होण्यासाठी अमावस्या अथवा पौर्णिमेचा वापर केला जातो. भारतीय महिन्यांची गणना करण्याच्या आजही दोन पध्दती प्रचलीत आहेत. अमान्त आणि पौर्णिमान्त. प्रत्येक महिन्यात एक पौर्णिमा आणि एक अमावस्या येते. दर पंधरा दिवसानंतर पौर्णिमा आणि अमावस्या या खगोलीय घटना घडतच असतात. महाराष्ट्र आणि दक्षिण भारतामध्ये अमान्त प्रकारे कालगणना होते. या पद्धतीमध्ये अमावस्या संपल्यानंतर महिन्याची सुरूवात होते. पौणिमेपर्यंतचा पहिला पंधरवडा 'शुक्ल पक्ष' किंवा 'शुध्द पक्ष' आणि नंतरचा पंधरवडा 'कृष्ण पक्ष'. उत्तर भारतामध्ये पौर्णिमान्त प्रकारे कालगणना होते. या पद्धतीमध्ये पौर्णिमा संपल्यानंतर महिन्याची सुरूवात होते. अमावस्येपर्यंतचा पहिला पंधरवडा 'कृष्ण पक्ष' आणि नंतरचा पंधरवडा 'शुक्ल पक्ष' असतो. जुलै महिन्यामध्ये ११ तारखेपासून महाराष्ट्र आणि दक्षिण भारतामध्ये आषाढ महिना सुरू होत आहे, तर २५ तारखेपासून उत्तर भारतामध्ये श्रावण महिना सुरू होत आहे. मंगळवार दि. २७ जुलै २०२१ रोजी येणारी अंगारकी संकष्टी महाराष्ट्र आणि दक्षिण भारतीयांच्यादृष्टीने आषाढ महिन्यातील आहे, तर उत्तर भारतीयांच्यादृष्टीने श्रावण महिन्यातील. संकष्टी करणाऱ्यांनी याचा विचार करावा आणि विविधतेचा स्विकार करावा एवढंच. लग्नाच्या अनुशंगाने आषाढ पाळणारे आणि मांसाहाराच्या अनुशंगाने श्रावण पाळणाऱ्यांची यानिमित्ताने म्हटलं तर अडचण आणि म्हटलं तर सोयसुध्दा आहे. आपल्या सोईने संस्कृती आणि परंपरांचा व्यवहार करणाऱ्यांसाठी आणि दुसऱ्यांवर लादणाऱ्यांसाठी ही सोईची कालगणना.

याच महिन्यात दि. २० जुलै रोजी आषाढी एकादशी येत आहे. विठ्ठलाच्या प्रती आपली भक्ती अर्पण करणारी बहुजन जनता ही एकादशी साजरी करते. महात्मा फुलेंच्या आणि संशोधकांच्यामते बळी राजाचा एक सरदार असलेल्या विठ्ठलाशी यानिमित्ताने नातं जोडणारी शेतकरी आणि कष्टकरी जनता. कोणत्याही प्रकारचं अवडंबर न माजवता ती साजरी केली जाते. शिक्षणानंतरही चंद्राच्या उगवण्याशी आपल्या जेवणाचा संबंध लावणाऱ्यांच्या तुलनेत एकादशी ही वास्तवतेशी जवळीक साधणारी आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये.

भारत हा विविध अंगी, विविध रूपी, विविध भाषीक, विविध धार्मिक आणि विविध प्रकारच्या सांस्कृतिक अंगाने नटलेला आहे. परस्परांबद्दल आदर आणि प्रेमाची भावना ठेवूनच मार्गक्रमण करावे लागेल. एकाच धर्माचा आणि संस्कृतीचा हेका न धरता! ' विविधतेने नटलेल्या परंपरांचा पाईक होण्याची' ही प्रतिज्ञा पुस्तकातच न ठेवता

प्रत्यक्षात आचारणात आणावी लागेल. गणेश चतुर्थी दिवशी चंद्राकडे पाहू नये, कारण चोरीचा आळ येतो, अशी सांस्कृतिक वचनं आजही ज्या समाजामध्ये ठाण मांडून बसलेली आहेत त्यांना चंद्रावर पोहचण्यास निश्चितच वेळ लागणार. सर्व संस्कृतीमध्ये चंद्रावर झेप घेण्याची कल्पना निर्मिलेली होती. परंतु त्या कल्पनांना मूर्त रूप देणं, हे पुढील पिढीवर अवलंबून असतं. पाश्चिमात्यांनी या क्षेत्रामध्ये इतरांवर मात केली, ही वस्तुस्थिती आहे. वस्तुस्थितीला प्रमाण मानून नवीन संशोधन करण्याची गरज आहे. मी केलेल्या उपवासाचा समाजाला काहीतरी फायदा झाला; तरच केलेल्या उपवासाच चीज झालं, असं म्हणता येईल. महात्मा गांधी, बाबा आमटे, मेधा पाटकर, डॉ. एन्. डी. पाटील, बाबा आढाव, आण्णा हजारेसुद्धा उपोषणाच्या माध्यमातून उपवास करत होते आणि आजही काहीजण करतात. परंतु या उपोषणामागे सामाजिक हेतू असतो. सामाजिक प्रश्नांसाठी किंबहुना समाजाच्या भल्यासाठी केलेलाच उपवास सार्थकी लागतो. तसा उपवास नक्कीच समर्थनीय असेल. उपोषणाचं महत्त्व हे समाजसुधारकांना फारच चांगलं माहीत होतं आणि आहे. तथाकथित उपवासकर्त्यांना आणि त्याचं समर्थन करणाऱ्यांना ते समजण्याची नितांत गरज आहे.

■ ■ ■



# कोरोना आणि अफवा



डॉ. प्रमोद गंगणमाले
८६००४ २४३९३

आज मितीला अफवांनी अधिकच धोकादायक रूप धारण केल्याचे जगात दिसत आहे. ज्या प्रमाणे कोरोनाचा विषाणू माणसाच्या शरीरात प्रवेश करतो आणि त्याची श्वसनयंत्रना पूर्ण खराब करून नंतर त्याचा जीव घेतो तसे अफवांच्या विषाणूने एकदा का माणसाच्या मेंदूत प्रवेश केला की मग तो त्या माणसाला इतका हिंसक किंवा असहिष्णू बनवतो की तो माणूस कसलाही विचार न करता एखाद्याचा जीव घेतो. अफवांचा विषाणू अधिक घातक होण्याचे कारण म्हणजे, देश आणि विदेशातील प्रमुख राजकीय पक्ष अफवांचा आधार आपली निष्क्रियता झाकण्यासाठी करत आहेत. तसेच विरोधकांना बदनाम करून स्वत:ची राजकीय वाटचाल करत आहेत. अफवा पसरवणे काही लोकांना इतके महत्वाचे वाटत आहे की अशा संघटनांनी आणि पक्षांनी अफवा पसरवण्यासाठी स्वत:चे आय टी सेल विकसित केले आहेत. असे आय टी सेल अफवांचा इतका वाईट वापर करीत आहेत की एखादा जमाव इतका हिंसक होत आहे जो एखाद्या माणसाचा सहज जीव घेईल. लहान मुलांना पळवणारी टोळी आली आहे आणि अशी टोळी लहान मुलांचे अवयव काढून विकते आणि लहान मुलांना निर्दयीपणे मारते अशी एक अफवा पालघर जिल्ह्यात मोबाईलवर फिरत होती. अशाच एका गावात रात्री साधूंची गाडी आली आणि लोकांना वाटले हीच ती लहान मुलांना पळवणारी टोळी आहे. लोकांनी त्या साधूंना जिवंत मारले. ही घटना मागील वर्षी पालघर मध्ये घडली आणि त्यानंतर देशभर राजकीय वातावरण ढवळून निघाले. या साधूंच्या हत्येचा संबंध एका पत्रकाराने थेट इटलीशी जोडला. देश आणि एक राज्य ढवळून काढणाऱ्या या हत्येचे मूळ एका अफवेत असू शकते यावरून अफवा किती धोकादायक असतात हे लक्षात येईल.

सध्या कोरोना आणि अफवा यांची तर अतिशय जबरदस्त युती आहे. कोरोनाचा उगम नेमका कसा झाला? या प्रश्नाचे उत्तर दहा पैकी किमान सहा लोक जे उत्तर देतात ते वैज्ञानिक नसून एक अफवा असते. जागतिक आरोग्य संघटनेने सध्याच्या महामारीत infodemic ही एक नवीन शब्दावली वापरण्यास सुरुवात केली आहे कारण या गोष्टीने कोरोनापेक्षा जास्त प्रमाणात मानवी आयुष्य बिघडवले आहे. अफवा संतुलित नागरी जीवनाला धोका आहेत. अफवा लोकशाही, न्याय, सहिष्णुता, सहजीवन आणि अहिंसा या मानवी मूल्यांना संपवण्याचे काम करीत आहेत.

भारतात माहितीच्या साथीचा हा आजार किंवा अफवांची महामारी बऱ्याच वर्षापासून पसरली आहे. २०१४ नंतर या आजाराने अराजक माजवले आहे. धार्मिक आणि जातीय दंगली घडणे, काही लोक किंवा

संघटना यांच्याबद्दल नको ती खोटी माहिती पसरवणे आणि यातून राजकारण साधने ही भारतात नित्याची बाब झाली आहे. भारतातील जवळपास संपूर्ण राजकारण गेल्या काही वर्षात अफवांच्या आणि फेक बातम्यांच्या प्रसारातच गुरफटले आहे.

अफवांचे अस्तित्व आपल्याला इतिहासात फार पूर्वीपासून दिसते. संशोधकांनी अफवांचे दोन प्रमुख प्रकार केले आहेत. एक आहे misinformation आणि दुसरी आहे disinformation. यातील पहिलीचा अर्थ चुकीची माहिती असा आहे आणि ही कमी धोकादायक आहे. कारण चुकीची माहिती दुरुस्त होऊ शकते. लोकांना हे मान्य असते की ही चुकीची माहिती आहे. यातील दुसरी अत्यंत धोकादायक आहे, कारण हिचा अर्थ आहे ' अपप्रचार' . ही मुद्दाम पसरवली जाते. पसरवणाऱ्याला हे माहित असते की, ही माहिती चुकीची आहे पण तो जाणीवपूर्वक सत्य लपवून हा अपप्रचार करत असतो. ऐकणारा सुरवातीच्या टप्प्यात निष्क्रिय असतो. तो खर काय आणि खोट काय याची शहानिशा करत नाही. हळूहळू अपप्रचार त्याच्या भावना आणि विचार याचा ताबा घेतात. त्याच्या मनात कोणाबद्दल तरी द्वेष, राग, असूया तयार होत असते. धर्म, जात, प्रांत, लिंग, किंवा इतर कोणत्याही आधारावर तो एखाद्याचा राग राग करू लागतो आणि शेवटी तो हिंसक होतो. अफवांच्या आधारे असे हिंसक झालेले लोक अधिक धोकादायक असतात आणि एकट्या माणसापेक्षा जमाव अधिक धोकादायक असतात.

जगात अफवांचा शास्त्रशुद्ध अभ्यास अगदी पूर्वीपासून केला जातो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रोबेर्ट न्याप या मानसशास्त्रज्ञाने महायुद्धाच्या काळात पसरलेल्या एक हजार अफवांचा अभ्यास करून यावर आपला ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. यामध्ये त्यांनी अफवा माणसाला अधिक अविवेकी बनवतात असा निष्कर्ष काढला आहे.

जगात प्रत्येक देशात सध्या या माहितीच्या साथीने धुमाकूळ घातलेला आहे. खोटी आणि चुकीची माहिती ही एखाद्या साथीच्या आजारासारखीच पसरते म्हणून याला साथ असे संबोधले आहे. अफवांची ही महामारी किंवा खोट्या माहितीची साथ म्हणजे कोरोनाबद्दल, त्याच्या जन्माबद्दल, प्रसाराबद्दल किंवा औषध आणि उपचाराबद्दल चुकीची माहिती पसरणे. अफवा (Rumor) आणि खोटी माहिती किंवा बातम्या (fake information or news) यांच्या माध्यमातून हि साथ सध्या जगभर पसरली आहे. माहितीची किंवा अफवांची ही साथ कोरोनापेक्षा भयंकर आहे. कोरोना होण्यासाठी निरोगी माणसाला रोगी माणसाच्या किमान तीन फुट जवळ जावे लागते. पण अफवांची साथ तशी नाही. ती सोशल मेडियाच्या माध्यमातून एका माणसाकडून हजारो किलोमीटर दूर जाऊ शकते. क्षणात हजारो, लाखो माणसांना आपल्या जाळ्यात ओढू शकते. ही माहितीची साथ पसरण्याचे मुख्य माध्यम आहे सोशल मीडिया. जागतिक आरोग्य संघटनेने माहितीची साथ किंवा अफवांची महामारी पसरण्यासाठी सोशल मीडीयाला जास्त जबाबदार धरले आहे. खोट्या माहितीची ही साथ एवढ्या वेगाने पसरत राहिली कि यावर मात करण्यासाठी

जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या संस्थेच्या कार्यालयात यावर एक वेगळे कार्यालय सुरु केले आहे. जगात कोणीही या कार्यालयाशी संपर्क करून आपल्याला मिळालेली माहिती बरोबर आहे का? याची खात्री करू शकतो. कोरोनाच्या काळात अशा अफवा किंवा चुकीची माहिती पसरवून एकमेकाबद्दल गैरसमज निर्माण होण्याचे प्रमाण प्रचंड आहे. कोव्हीड - १९ चा कोरोना विषाणू हा मानवनिर्मित आहे आणि  कोरोनाचा विषाणू तयार केला आहे ही आत्ताची जगात सर्वात जास्त पसरलेली अफवा किंवा फेक बातमी आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

भारतातल्या ऐंशी टक्के लोकांचे मत सुध्दा हेच आहे की,  कोरोनाचा विषाणू हा चीनने निर्माण केला आहे. भारतामधील अफवांचे जन्मदाते तर कमालीचे कल्पक आहेत. चीनने हा विषाणू तयार केला, हे सांगण्यासाठी जपानच्या नोबेलप्राप्त शास्त्रज्ञाचे नाव वापरले गेले. तासुकू होण्जो या नोबेल प्राप्त शास्त्रज्ञाने चीनच्या वूहान मधील प्रयोगशाळेत काम केले असून चीननेच हा विषाणू तयार केला असल्याचे त्यांनी सांगितले आहे, असा फेक मेसेज पसरवला गेला. आणि कहर म्हणजे हे जर खोटे ठरले तर मी माझा नोबेल पुरस्कार परत देईन असं त्या शास्त्रज्ञाच्या वतीने फेक बातमिदारानेच जाहीर केले. (फेक आणि खोट्या ज्ञानावर भारतीय लोकांना एवढा विश्वास ठेवायची सवय असल्यामुळेच कदाचित या बातमीदाराला भारतात नोबेल प्राप्त शास्त्रज्ञ मिळाला नाही आणि त्याने त्याची खोटी बातमी सत्य भासावी यासाठी जपानच्या शास्त्रज्ञाचे नाव वापरले असावे!) या बातमीची सत्यता काही संस्थांनी तपासली तेंव्हा लक्षात आले कि तासुकू होण्जो यांनी कधी चीनमध्ये कामच केले नाही आणि त्यांनी हा विषाणू कसा तयार झाला यावर काहीही भाष्य केलेले नाही. रशियामध्ये हा विषाणू मानवनिर्मित असून एका मायक्रोचिपमध्ये हा बसवला जातो आणि लोकसंख्या नियंत्रणासाठी पसरवला जातो अशा आशयाची एक फेक बातमी आणि यू ट्यूब व्हिडिओ पसरत होता. यासाठी बिल गेट्स यांना जबाबदार धरण्यात आले. यावर रशियन सरकारला हे खोटे आहे हे सांगण्यासाठी समोर यावे लागले. एवढेच नव्हे तर रशियामध्ये अफवांचा आणि खोट्या बातम्यांचा पाऊसच सुरु झाला. यावर रशियन सरकारला खोट्या बातम्या आणि अफवा पसरविणाऱ्यांविरोधी कायदा करावा लागला. असा कायदा भारतात असता तर कदाचित जपानच्या शास्त्रज्ञाचे नाव वापरून खोटी बातमी पसरवणाऱ्याला आपल्या इथेही अटक झाली असती. पण भारतात करोनाची आणि त्यावरील उपचाराची चुकीची माहिती पसरवण्याविरोधी असा कायदा होणार नाही कारण असा कायदा करणारेच अर्धे अधिक लोक तुरुंगात जाण्याची भीती!

जगभर एवढ्या अफवा पसरत आहेत हे पाहून जागतिक आरोग्य संघटनेला समोर येऊन खोट्या प्रचाराला उत्तर देण्यासाठी आपल्या वेबसाईट वर 'myth busters' असे एक वेगळे पेज सुरु करावे लागले. यातून WHO ने आत्तापर्यंत अफवा आणि खोट्या बातम्यावर खुलासे प्रसिद्ध केले आहेत. WHO च्या मतानुसार जेवणात मिरी वापरून, कीटकनाशक आपल्या शरीराच्या आत

वापरून, मिथेनोल किंवा इथीनोल पिल्यामुळे, उन्हात उभा राहून, दारू पिल्याने, गरम पाण्याने अंघोळ केल्याने, न्यूमोनिया या आजारावरील औषध घेतल्याने, लसून खाल्याने अशा कोणत्याही उपायाने कोरोना बरा होणार नाही. सर्व धर्माच्या धर्म गुरुंनी आपल्या धर्माच्या जीवनपद्धती कोरोनापासून माणसाला वाचवू शकतात हे सांगण्यासाठी अफवा आणि खोट्या बातम्याचा भडिमार सुरु केला. पण कोरोनाने त्यांचे पितळ असे उघडे पाडले की सर्व धर्माची प्रार्थनास्थळ गेली एक वर्ष बंद आहेत. कुणी हवन आणि यज्ञ करून कोरोना जातो असे सांगितले, कुणी अल्लाच्या नावाचा जप करायला सांगितला, तर कुणी क्रॉस फिरवला कि कोरोना पळून जातो असले प्रयोग सांगितले. गेल्या वर्षी आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी टाळी वाजवून आरोग्य कर्मचाऱ्यांचे आभार मानायला सांगितले पण यावर आय टी सेल लगेच आता शुक्ल पक्ष सुरु होणार आणि आजच थाळी वाजवली की हवेत लहरी तयार होऊन कोरोनाचा शेवट होणार अशा अफवा पसरवत होता. पहिल्या लाटेत लोक मरण पावले. दुसऱ्या लाटेत लोकांना ऑक्सिजन मिळाला नाही, औषधोपचार मिळाले नाहीत अंत्यसंस्कार करायला जागा मिळाली नाही. यावरून हेच दिसते की आपण मागील वर्षात कोरोनाबरोबर वैज्ञानिक लढाई लढलोच नाही.

कोरोनाच्या निमित्ताने खोट्या बातम्या, चुकीची माहिती, आणि अफवा पसरवणे हा विषय जगाच्या विचारपटलावर पुढे आला आहे. यानिमित्ताने जागतिक आरोग्य संघटना आणि युनो या जगातील दोन मोठ्या जागतिक संघटनांना पुढे यावे लागले. अफवा हे तसे किरकोळ वाटणारे संकट आज जगात कोरोनापेक्षा भयंकर रूप धारण करत आहे. यावर जगातील देशांनी वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. बऱ्याच देशातील आणि वेगवेगळ्या समाजातील वादांना धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, भाषिक आणि लैंगिक अफवा आणि खोटी माहिती जबाबदार आहे, असे संशोधनातून समोर येत आहे. भारतासारख्या समाजात अफवांची महामारी फक्त कोरोनाच्या काळात आलेली आहे असे नाही तर आपल्याकडे हि साथ कायमच असते. धर्म, जात, श्रद्धा, परंपरा, भाषा, प्रांत यांच्या माध्यमातून आणि यांच्या नावाखाली बऱ्याच अफवा पसरवल्या जातात. भारतासारख्या देशात अफवांचे राजकारण करून सत्ता हस्तगत केल्या जातात. कोरोनाच्या निमित्ताने फेक बातमी, फेक माहिती आणि अफवा हे विषय आपण सर्वांनी समजून घेणे महत्वाचे आहे. फक्त कोरोनाच्या काळात अफवा आणि खोटी माहिती यापासून आपल्याला वाचवण्याची गरज नाही तर सतत यापासून आपण सावध असले पाहिजे. आपल्या समाजात अफवा या अंधश्रद्धा वाढवण्याचेच काम करत असतात. अफवा आणि फेक बातम्या या एक प्रकारच्या अंधश्रद्धाच आहेत. पण अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या जातात याची आपण नोंद घेतली पाहिजे.

आजच्या अफवा उद्याच्या जगात सत्य बनून लोकांची मनं आणि मतं कलुषित करत असतात. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. उदा. जेम्स लेन या लेखकाने जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांच्याबद्दल लोक कानात असे असे पुटपुटतात म्हणून अफवांच्या जीवावरच

आपल्या पुस्तकात भारतीय समाजातील एका आदर्श स्त्रीचे, एका आदर्श मातेचे चारित्र हनन करण्याचा प्रयत्न केला. त्यासुध्दा अफवाच होत्या. आपल्याकडे इतिहास संशोधनाच्या वैज्ञानिक पद्धती अस्तित्वात नाहीत त्यामुळे आपला इतिहास म्हणजे अफवांचा काळ्या पाण्याचा समुद्रच भासतो. छत्रपती शिवजी महाराज यांच्या इतिहासात एवढी फेक माहिती भरली आहे की, त्यांचे खरे रूप आणि कार्य लोकांना कळूच नये अशी व्यवस्था आहे. म गांधी आणि पंडित नेहरू हे अफवा आणि फेक माहितीने सर्वात जास्त बदनाम केलेले लोकनेते आहेत. हीच अवस्था संत तुकाराम महाराजांच्या पुष्पक विमानाची आणि संत ज्ञानेश्वर यांच्या भिंत चालवण्याची. संत आणि महापुरुष यांच्या जीवनाला चमत्कार आणि रंजकता जोडून त्यांचे खरे कार्य लपवले जाते आणि असे संत आणि महापुरुष फक्त प्रतिकं म्हणून वापरली जातात. एका बाजूला अफवा आणि फेक इतिहासाच्या जोरावर महापुरुषांच्या नावावर दंगली घडवल्या जातात आणि समाजात फुट पाडली जाते तर दुसऱ्या बाजूला अफवा आणि फेक इतिहास सांगून काही संत आणि महापुरुष यांच्याबद्दल समाजात राग आणि द्वेष निर्माण केला जातो.

अफवा किंवा चुकीची माहिती पसरवण्यामध्ये मोठा वाटा हा सोशल मेडीयाचा आहे. सोशल मेडीयामुळे अफवा भयानक रूप धारण करतात. अगोदरसुद्धा अफवा पसरत असत पण काही एक किलोमीटरच्या अंतरात, या अफवेचे अस्तित्व संपून जात होते. पण आता सोशल मेडीयामुळे अफवा क्षणात हजारो किलोमीटरचे अंतर पार करतात. कोणतरी जाणीवपूर्वक एखादी अफवा तयार करत असते. ही अफवा पहिल्यांदा सोशल मीडियाच्या एखाद्या माध्यमात येते. तिथून मग ती व्यक्ती कडून व्यक्तीकडे पसरत जाते. मग सोशल मेडियाच्या ग्रुपवर पसरत राहते. इथूनच हि अफवा भयानक रूप धारण करायला सुरुवात करते. जास्त लोकांनी एकमेकांना हि माहिती पाठवली कि लोक मग यावर सत्य म्हणून विश्वास ठेवतात. नंतरच्या टप्प्यात हि अफवा सत्याचे स्वरूप घेते. लोकांच्या मनात भीती निर्माण होते. भीतीतून सावध राहण्यासाठी लोक मग स्वरक्षणाचा मार्ग निवडतात. यातून समूह हिंसक होतो आणि कोणाचातरी जीव घेतो. Indian What's app lynching असे एक विकिपीडिया पेज आहे यामध्ये मे २०१७ ते मे २०१९ या दोन वर्षातील अफवांच्यामुळे झालेल्या ५७ मॉब लीन्चींगच्या गुन्ह्यांची माहिती दिली आहे. त्यानुसार भारतात या दोन वर्षात ५२ माणसांचा बळी फक्त अफवांनी घेतला आहे. आणि धक्कादायक म्हणजे यातील ५७ गुन्ह्यांच्यापैकी ३० ठिकाणी कोणालाही अटक झालेली नाही. अफवा समाजातील अल्पसंख्याक आणि मागास समूहाबद्दल लवकर पसरतात आणि विरोधी जमाव अशा लोकांच्याविरोधी लवकर हिंसक होत असतो. वरील ५२ मृत लोकांच्यापैकी जवळपास २५ लोक मुस्लीम आहेत. इतर लोक भिकारी, दलित, आदिवासी, आणि समाजातील मागास घटक आहेत.

अफवांच्यामुळे समूहाचे रुपांतर गर्दीत होते. गर्दीला विचार आणि विवेक नसतो. गर्दी आपल्या डोक्यात एकाचवेळी राग आणि हिंसा घेऊन फिरत असते. गर्दी कायदा, पोलीस, कोर्ट,

किंवा इतर कोणत्याही विवेकी मार्गावर विश्वास ठेवत नसते. तिला विचार नसतात. तिला प्रशिक्षण नसते. ती लगेच हिंसक होत असते. गर्दीला राष्ट्रभक्ती, धर्म, जात, आपले गाव, कुटुंब यांचे रक्षण करायचे आहे, असल्या भावनांनी घेरले तर मग ती जास्तच विषारी होते. आपल्या कुटुंबाच्या, गावाच्या, समाजाच्या, देशाच्या, धर्माच्या, आणि जातीच्या रक्षणाच्या भ्रमात अशी गर्दी क्षणात कोणाचाही जीव घेऊ शकते. मुळातच अफवा फक्त खोटी माहिती देत नाहीत तर त्यासोबत सदर माहिती वाचणाऱ्या माणसाच्या मनात प्रचंड राग निर्माण करत असतो. फक्त मुलं पळवणारी टोळी आली आहे एवढी अफवा सांगून चालत नाही तर ही टोळी मुलांचे अवयव काढून विकते, डोळे फोडते, मुलांचे लैगिक अवयव काढते, त्यांचे डोळे काढून त्यांना भीक मागायला लावते, असल्या भीतीदायक गोष्टींसोबत सांगितल्या जातात. अशी रागावलेली गर्दी एखाद्या बॉम्ब सारखीच असते. एखादा दुर्बल किंवा अशक्त माणूस मग अशा गर्दीचा शिकार होतो. गर्दी सहसा कधी श्रीमंत किंवा ताकद असलेल्या माणसाला मारत नाही किंवा गर्दी कधी सत्तेला प्रश्न विचारत नाही. गर्दी कायम फक्त गरीब आणि अशक्त माणसाला लक्ष्य करत असते, याचे कारण आहे अफवा किंवा ही चुकीची माहिती या लोकांच्याबाबतच पसरवली जाते.

भारतात अफवा किंवा चुकीच्या माहितीमुळे दिवसाला किमान एकतरी बळी जात असेलच. हे बळी असतात समाजातील गरीब, भीक मागून जगणारे, भटकणारे लोक, गोसावी, मजूर. वर हे कृत्य एका विशिष्ट अशा नैतिक भावनेतून केल्याची समाधानाची आणि आनंदाची भावना गर्दीला उन्मादी बनवते. मग गर्दी, मारलेल्या माणसाच्या मृतदेहाभोवती नाचू शकते, विजयाची भावना मनात घेऊन जल्लोष करते, मिरवणूक काढली जाते. पालघरमध्ये मारले गेलेले साधू, लातूरमध्ये मारले गेलेले भिकारी, उत्तरप्रदेश आणि बिहार येथे मारले गेलेले भिकारी, पेहलू खान याने गाईचे मटन घरात आणले आहे अशी पसरवली गेलेली अफवा, गुजरात मध्ये दलित तरुणांना झालेली मारहाण या मागील काही वर्षात अफवांच्या मुळे घडलेल्या घटना आहेत ज्यात बहुतांशी ठिकाणी लोकांचा जीव गेलेला आहे आणि गर्दीचे उन्मादी चित्र पाहायला मिळालेले आहे. काही वेळेला अपघाताने घडलेल्या घटनांना अफवा आणि खोटी माहिती पसरवून सदर अपघात म्हणजे सुनीयोजित कट होता अशी भलावण केली जाते.

राजकारणामध्ये चुकीची माहिती देण्यामध्ये दोन उद्देश असतात. एक आपल्या बद्दल लोकांचे मत चांगले तयार करायचे आणि दुसरे म्हणजे विरोधकांना बदनाम करायचे. जगातल्या बहुतांशी मोठ्या देशात निवडून आलेली सरकारं याचाच उपयोग करून निवडून आलेली दिसतात. अशा चुकीच्या माहितीमुळे लोकशाहीची संपूर्ण प्रक्रियाच संपून जाण्याच्या मार्गावर आहे. राजकारणासाठी तयार केलेल्या फेक बातम्या या जास्त विखारी आणि अमानवी असतात. एक नेता प्रामाणिक आहे आणि विरोधक अप्रामाणिक आहेत, एक नेता देशभक्त आहे आणि विरोधकं देशविरोधी आहेत, एक नेता देशासाठी सर्वस्व त्याग करायला तयार असतो विरोधकं मात्र स्वतःच्याच हिताच्या गोष्टी पाहतात, एका

नेत्याच्या हातातच देश सुरक्षित आहे विरोधकांच्या हातात देश असुरक्षित आहे, एका नेत्याला शत्रू राष्ट्र सतत भीत असते तर विरोधक शत्रू राष्ट्राला मिळालेले आहेत, एक नेता म्हणजेच देश आहे आणि विरोधक म्हणजे देशद्रोही आहेत असे भ्रम निर्माण करणारी चुकीची माहिती किंवा अफवा पसरवली जाते. उदा. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प त्यांच्या प्रचारात सांगायचे की, त्यांच्याविरोधी उमेदवाराला चीनची मदत आहे, भारतात विरोधक निवडून आले तर पाकिस्तानात फटाके वाजतील आणि पेढे वाटले जातील, असा प्रचार केला जातो. इस्त्राईल मध्ये झालेल्या निवडणुकीत एका उमेदवाराने जाहीर केले कि विरोधकांना मत देणाऱ्या माणसाला कोरोना होण्याची जास्त शक्यता आहे (हा उमेदवार निवडून आला आणि देशात मंत्री झाल्यावर यालाच कोरोना झाला हा भाग वेगळा).

**अफवा आणि फेक बातमीपासून सरंक्षण करण्याचे उपाय:**

१. अफवा जरी पसरत असल्या तरी त्यांची सत्यता तपासणाऱ्या खाजगी यंत्रणासुद्धा विकसित झालेल्या आहेत. बऱ्याच वेबसाईट सत्य काय हे उघड करत असतात. आपल्याकडे आलेली कोणतीही संशयास्पद माहिती आपण चेक केली पाहिजे. तपासून घेतली पाहिजे. अफवा किंवा फेक माहिती पासून वाचण्याचा हा सर्वात चांगला मार्ग आहे.  उदा. युनेस्कोने भारतीय राष्ट्रगीताला जगातील सर्वोत्तम राष्ट्रगीत असा दर्जा दिला आहे, मा. नरेंद्र मोदींना सर्वोत्तम पंतप्रधान असे घोषित केले आहे, आणि २००० रुपयांच्या नवीन नोटेला जगातील सर्वोत्तम चलन म्हणून दर्जा दिला आहे. अशा फेक बातम्या भारतातील सर्व लोकांच्या मोबाईलवर आलेल्या आहेत. युनेस्कोच्या नावाने फिरणाऱ्या या बातम्यांची सत्य पडताळणी आपण करू शकतो. या बातम्या खऱ्या आहेत का खोट्या हे तपासण्यासाठी गुगलवर जाऊन तिथे Fact Check असा शब्द टाईप करायचा आणि त्यापुढे आपल्याला मिळालेली माहिती लिहायची. लगेच आपल्याला वेगवेगळ्या Fact Check करणाऱ्या वेबसाईट दिसतात. त्या वेबसाईटवर बटन दाबले की खरी बातमी काय आहे हे समजते. भारतातील प्रमुख सर्व वर्तमानपत्र ऑनलाईन fact check करत असतात. snopes.com, scroll.com अशा काही वेबसाईट fact check करण्याच्या क्षेत्रात आपली विश्वासार्हता टिकवून आहेत. ज्यांच्या नावाने अफवा पसरवल्या जातात त्या संस्था किंवा व्यक्तीकडे अगोदर चौकशी केली पाहिजे. नासाने असे असे जाहीर केले म्हणून बऱ्याच अवैज्ञानिक गोष्टी सत्य म्हणून नासाच्या नावाने पसरवल्या जातात. अशी एखादी बातमी आपल्याकडे आली तर नासाच्या वेबसाईटला भेट देऊन सत्य जाणून घ्यावे. अशा बातम्यांची सत्यता संबंधित संस्थेला विचारून लगेच तपासली जाऊ शकते. काही वेळेला ज्या संस्थेच्या नावाने ही बातमी पसरत आहे, त्या संस्थेच्या वेबसाईटवर संबंधित संस्थेने सत्य काय आहे याचा खुलासा केलेला असतो.

२. अफवा किंवा फेक माहिती आणि बातम्या सुशिक्षित लोकांच्याकडून अधिक पसरतात असा अनुभव आहे. समाजातील या लोकांची जबाबदारी अधिक आहे. आपण पाठवलेल्या

माहितीवर इतर लोक लगेच विश्वास ठेवतात कारण सुशिक्षित माणसाची एक विश्वासार्हता असते. समाजातील या घटकाने आपल्याकडे आलेली संशयास्पद माहिती सरसकट चौकशी न करता फॉरवर्ड करू नये.

३. कोणत्याही अफवेच्या किंवा फेक महितीच्या जाळ्यात अडकून कधी कायदा हातात घेऊ नये. कोणताही न्याय, पोलीस आणि न्यायालय यांच्या माध्यमातून केला गेला पाहिजे. आपणच पोलीस आणि न्यायाधीश होण्याचे टाळावे. अफवा माणसांना भावनिक बनवत असतात आणि कायदा हातात घ्यायला उद्युक्त करत असतात. आपण कधी आपला विवेक ढळू देता कामा नये. काही संशयास्पद दिसले तर पोलिसांना कळवणे हे सर्वात चांगले असते.

४. भिकारी, दलित, आदीवासी आणि अल्पसंख्याक या लोकांच्याबद्दल आपल्या मनात असलेल्या गैरसमजुती काढून टाकायला हव्यात. गावात असे लोक आले म्हणजे ते मुलांना पळवून न्यायला आले आहेत असे समजून त्यांना मारू नये. आपल्याला संशय आल्यास गावात आलेल्या अनोळखी माणसांची चौकशी जरूर करावी. गावातील ग्रामसेवक किंवा पोलीस पाटील किंवा इतर जबाबदार यंत्रणेला याची माहिती द्यावी. पोलिसांना कळवणे हा उत्तम आणि सुरक्षित मार्ग.

५. सरकारने अफवा आणि चुकीची माहिती पसरवण्यावर कडक कायदे करावेत. कायद्याचा धाक असल्याशिवाय या गोष्टी नियंत्रनात येणार नाहीत. अफवा पसरवणाऱ्यावर कडक कारवाई होत नाही किंवा कायदा नाही यामुळे लोक अशा अफवा पसरवत असतात.

६. अफवांचे आणि खोट्या माहितीचे राजकारण असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यासाठी सतत वाचन करणे आणि नेमकी माहिती घेणे, हे आपले नागरिक म्हणून कर्तव्य आहे. आपण नेमकी माहिती घेत नाही म्हणून अफवा लगेच पसरत असतात. विशेष करून सोशल मीडीयावर कोणताही विश्वासार्ह संदर्भ न देता अफवा किंवा फेक बातम्या जास्त पसरवल्या जातात. सोशल मीडीयावरच्या बातम्यांच्यावर खात्री केल्याशिवाय विश्वास ठेऊ नये. व्हॉटस् अप, फेसबुक, ट्विटर यावरून आलेल्या बातम्या या खोट्या असण्याची जास्त शक्यता असते.

■ ■ ■

कोरोनाने सर्वत्र उच्छाद मांडला आणि यातच येणारे सण समारंभ यावर बऱ्याच अंशी निर्बंध आले. वटपौर्णिमा हा सण स्त्रिया आपले सौभाग्य अबाधित राहण्यासाठी वडाच्या झाडाची पुजा करतात. या कोरोना काळात कित्येकांचे संसार, कुटुंबे सौभाग्य उध्वस्त झाली. पण कुठलीही भिती न बाळगता आज देखील कोरोना काळात बहुसंख्य स्त्रिया आपल्या सौभाग्यासाठी वडाची पुजा करण्यासाठी गेल्या. कित्येक जणींनी ना मास्क वापरला, ना सॅनीटाईझर, ना सोशल डिस्टन्सींगचे पालन केले.जणु कोरोनाला त्यांनी निमंत्रणच दिले. यामुळे अखंड सौभाग्यासाठी पुजन, व्रत करणारी सावित्रीच धोक्यात आली. कोरोना काळात अशा पुजनाने ना सावित्री वाचेल ना सत्यवान. वाचेल फक्त वटवृक्ष आणि कोरोना असे न होवो हीच अपेक्षा...... सण ,संमारंभ आवश्य करा पण वास्तवाचे भान ठेवा.

प्रकाश हिरेमठ ९०४९६२४५७२

# काय बाय सांगू , कसं ग सांगू ?



डॉ. राणी बंग
९४०४८ ७०४३४
- शब्दांकन : सुशीला मुंडे
९८७०७ ३०३६८

महिला सहभाग व सोशल मीडिया व्यवस्थापन विभाग यांच्या पुढाकाराने 'स्त्री आरोग्य आणि गैरसमज' या विषयावर पद्मश्री डॉक्टर राणी बंग यांचे व्याख्यान घेण्याचे ठरले. पण एवढ्या मोठ्या व्यक्तीला वेळ असेल का? हा प्रश्न आम्हाला पडला. पण प्रयत्नांती त्यांची वेळ मिळाली. त्यांचा सखोल अभ्यास, नम्रता, शांतपणे विषय मांडण्याची हातोटी, सहज-सोपी ओघवती भाषा शैली याच अप्रुप वाटलं. व्याख्यानाच्या सुरुवातीलाच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मंचावर बोलताना मला विशेष आनंद वाटतो आणि मला ही एक मोठी संधी वाटते, असे त्यांनी नमुद केले. यावरून समितीच्या कामाला असलेले वलय, डॉ. नरेंद्र दाभोळकर आणि कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी विस्तारलेले संघटनेचे कार्यक्षेत्र याची महती पटते.

स्त्री आरोग्य आणि गैरसमज हे डॉक्टर राणी बंग यांच्या व्याख्यानातून ऐकताना अनेक शास्त्रीय सिद्धांत स्पष्ट झाले. स्त्री ही दुर्बल, अबला, बौद्धिकदृष्ट्या अकार्यक्षम, स्वतःचे निर्णय घेऊ न शकणारी, सर्व क्षेत्रात दुय्यम असणारी असे वारंवार समाजाकडून, माध्यमातून, मालिकांतून अधोरेखित केले जाते. या बाबी निव्वळ गैरसमज पसरवणाऱ्या आहेत, कारण स्त्रियांचा मेंदू हा जास्त विकसित झालेला आहे, हे विज्ञानाने सिद्ध केलेले आहे. महिलांमधील न्यू लिंबिक सिस्टिम पुरुषांच्या तुलनेत जास्त कार्यक्षम असते. उत्क्रांतीच्या टप्प्यावर पुरुषाचा मेंदू हा स्त्रीच्या मेंदूपेक्षा अकरा टक्क्याने मोठा असला, तरीही सूक्ष्म विचार करणे, योग्य तो निर्णय घेणे, तर्क करणे, संशोधन करणे इत्यादी बाबतीत स्त्री ही अधिक सक्षम आहे, हा समज आपण स्त्रियांमध्ये अधिक विकसित केला पाहिजे. समाजामध्ये पुरूष शारीरिकदृष्ट्या जास्त सक्षम आहेत अस बिंबवल जातं. याचे कारण लहानपणापासून त्यांना तशा प्रकारची समज व शिकवण दिली जाते. स्वाभाविकच स्त्रियांना असे वाटू लागते की, खरोखरच आपण अबला आहोत. मात्र संधी, स्वातंत्र्य, अवकाश याबद्दल कुटुंबियांकडून आणि समाजाकडून प्रोत्साहन मिळाले की, त्या कुठेही कमी पडत नाहीत. हे आजवर सिद्ध झालेले आहे.

मूल न होण्यामागे आजही मोठ्या प्रमाणात स्त्रियांनाच दोषी धरले जाते. परंतु निष्कर्ष असा सांगतो की, ७५ टक्के दोष हा पुरुषांकडेच असतो. पण हे वास्तव स्वीकारतो कोण? वंशाचा दिवा हा मुलगाच असू शकतो, ही प्रतिमा आजही आपल्या समाजामध्ये अगदी दृढ आहे. त्याचे दुष्परिणाम स्त्रियांना भोगावे लागतात. यातूनच पुढे बुवाबाजी, अंधश्रद्धा,

नवस-सायास, पूजा-अर्चा, व्रतवैकल्ये, उपवास या सगळ्या गोष्टींमध्ये स्त्री अडकली जाते. मग शिक्का बसतो की, स्त्रिया या अंधश्रद्धांच्या वाहकही आहेत आणि पूजकही आहेत. अवघे पंधरा टक्के पुरुष कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करायला तयार होतात, बाकीचे होत नाहीत. कारण काय तर या शस्त्रक्रियेने पुरुष कमजोर होतात, लैंगिक सुख उपभोगू शकत नाहीत. पण हे आजवर कुठेही सिद्ध झालेले नाही. याउलट ८५ टक्के या तुलनेने कुटुंब नियोजनाच्या अवघड शस्त्रक्रियेस सामोऱ्या जातात. या काळात घरकाम करतात, बाल संगोपन करतात, शहरी भागात तर अडीच ते तीन महिन्यानंतर कामावरही जातात, दगदगीचा प्रवास करतात. वेळोवेळी मर्दानगी, मर्दपणाची भावना जोपासणारे पुरुष छोट्याशा नसबंदीच्या ऑपरेशन पासून मात्र स्वतःला दूर ठेवतात. त्यांच्या या कृतीमधून त्यांचा महिलांप्रती अविश्वास व संशयही व्यक्त होतो. स्त्रियांनी तांबी बसवली तर वजन वाढते, या गैरसमजाला छेद देताना राणी मॅडम म्हणाल्या की, व्यायामाचा अभाव आणि अयोग्य आहार ही खरंतर वजनवाढीची कारणे आहेत.

स्त्रीला मातृत्व आणि स्त्रीत्व बहाल करून देणाऱ्या आणि सृजनशक्ती प्राप्त करून देणाऱ्या मासिक पाळीची कटकट स्त्रियांना का वाटावी? पुरुषवर्ग कधी तरी आपल्या दाढीमिशी बाबत तक्रार करतात का? उलट त्यांना त्यामुळे आपल्या पुरुषत्व आणि मर्दानगीची विशेष जाणीव होते. आपण अत्याधुनिक आहोत, हे भासवण्यासाठी मुलींमध्ये वाढणारी व्यसनाधीनता याबद्दल डॉ. राणी बंग म्हणाल्या, ड्रिंकिंग आणि स्मोकिंगमुळे आपण आधुनिक ठरत नाही, तर आपली विचार प्रणाली, आपलं वर्तन, एकमेकांना समजून घेणं, सहाय्य करणं ही खरी आधुनिकता होय. व्यसनांचे दुष्परिणाम सांगताना त्या पुढे असेही म्हणाल्या की, सततच्या व्यसनामुळे प्रजननक्षमता कमी होते. अवेळी गर्भपात होतात. मेंदू बधिर होतो. अपत्याच्या वाढीवर व मेंदूवर दुष्परिणाम दिसून येतो. नीतीचे नियम स्त्री पुरुष दोघांसाठीही समान असायला हवे, यावरही त्यांनी भाष्य केले.


नवजात बाळाच्या जन्मवेळेला अवास्तव महत्त्व दिले जाते. जन्मवेळ ही अचूक असू शकत नाही, त्यामुळे त्यांचा ग्रह गोलाच्या फिरण्याशी काहीही संबंध नाही. आम्ही डॉक्टर मंडळी डिलिव्हरी करण्यात इतके व्यस्त असतो, की बाळ बाळंतीण कसे सुखरूप राहतील याकडे आमचा कल असतो. आमचं घड्याळाकडे लक्षही नसतं. डिलिव्हरी झाल्यानंतर हात-पाय स्वच्छ धुतल्यानंतर केव्हातरी आम्ही घड्याळाकडे बघतो आणि अंदाजाने वेळ नोंदवत असतो. त्यामुळे त्या बाळाच्या जीवनाचा, जीवनातील यश अपयशयशाचा ग्रह गोल ताऱ्यांशी सुतराम संबंध नाही.

जाहिरातींचा भडिमार आणि फॅशन यामुळे, बांधा सुडौल ठेवण्यासाठी केल्या जाणाऱ्या अनावश्यक सर्जरी विविध आजारांना आमंत्रण देतात. जसे की कॅन्सर. चित्रपटसृष्टीच्या माध्यमातून झिरो फिगरचे फॅड आपल्यापर्यंत पोहोचते. चित्रपटातील नायिका आपल्या रोल मॉडेल ठरू लागतात. मात्र अति कृषपणा किंवा अति लठ्ठपणा या दोन्ही गोष्टी

आजारांना आमंत्रण देणाऱ्या ठरतात.

दीड तासाच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या भाषणामध्ये डॉ. राणी मॅडम यांनी प्रश्नांची उत्तरे देतानाही अचूक मार्गदर्शन केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आयोजित केलेल्या या व्याख्यानात पाचशेहून अधिक श्रोते सहभागी झाले होते.

■ ■ ■



# कसा गं बाई जातीचा ह्यो किला



ॲड.रंजना पगार-गवांदे
८७८८६ ७७४६८

प्रत्येक जाती धर्मात पाप-पुण्य, पवित्र-अपवित्र्याच्या कल्पना स्त्रीशी जोडलेल्या आहेत. आदिम समाजात स्त्रीच मानव वंशाचे पुनरुत्पादन करते, असा समज होता. त्यामागील शास्त्रीय कारण माहीत नव्हते. तेव्हा स्त्री आदिशक्ती, देवी म्हणून पूजनीय झाली. काही समाजात मुलगी वयात आली, प्रथम पाळी आली की जाहीर पद्धतीने उत्सव साजरा केला जात होता आणि आजही करतात. शेती किंवा निसर्गातील उत्पादन स्त्रियांच्या प्रजनन क्षमतेशी जोडण्याची जुनी परंपरा होती. शेतात, पाळीच्या काळातील रक्त आणि बीज यांचे मिश्रण करून ते पूजण्याची पद्धत होती. पुढे पुरुषाच्या सहभागाशिवाय पुनरुत्पादन शक्य नाही, हे उमगले. तिथूनच पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेकडे वाटचाल सुरु झाली. स्त्रीची प्रजनन प्रक्रिया आणि पाळी यांची अवहेलना सुरु झाली. वंशशुद्धी आणि रक्तशुद्धी टिकवण्याच्या पराकाष्ठेतून योनिशुचिता संकल्पनेची निर्मिती झाली. ती जपण्यासाठी स्त्रियांची लैंगिकता नियंत्रित करणं आणि योनिशुचिता जपणं महत्वाचं ठरलं.

जातींची निर्मिती झाल्यानंतरच्या काळात अनेक वर्षे समाज तुकड्या-तुकड्यांनी विखुरला गेला. जातीचे अस्तित्व टिकवणं, संरक्षण, आपसातील वाद मिटविणे या सर्व गोष्टींसाठी त्याकाळी जातपंचायतीची निर्मिती झाली. जी आजमितीला भारतीय राज्यघटनेअंतर्गत निर्माण झालेल्या न्यायव्यवस्थेला समांतर ठरू पाहाते. जातपंचायती या शोषक आहेत का? जातपंचायत म्हणजे देवाचा अवतार? जातपंचायतीची मनमानी रोखण्यासाठी कायदा अस्तित्वात आहे का? कायदा असेल तर मग कायदा काय म्हणतो? या सर्व प्रश्नांची उत्तरे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामातून शोधण्याचा प्रयत्न करत आहोत.

जातपंचायती आपल्या समाजातील विविध प्रथांचे नियमन करते. सदस्यांच्या सामाजिक किंवा वैयक्तिक वर्तवणुकीवर नियंत्रण ठेवते. तोंडी फतवे काढून सदस्यांमधील किंवा कुटुंबातील वाद सामुहिकपणे सोडविते किंवा निर्णय देते. जातपंचायत ही वेगवेगळया ठिकाणी गावकी, भावकी, कांगारू कोर्ट, सालारू कोर्ट व खाप पंचायत अशा वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. थोडक्यात त्या-त्या समाजातील वर्चस्ववादी मनोवृत्तीच्या लोकांचा समूह जो की, समाजावर संपूर्ण नियंत्रण ठेवतो. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सर्व विधी कोणी, कधी आणि कोठे करायचे? तसेच भाषा, पेहराव या सर्वच बाबी नियंत्रीत करतो.

सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे जात-वंशशुद्धी ह्या बाबींनी त्या-त्या जातीत

महत्वाच्या ठरू लागल्यानंतर पावित्र्याच्या कल्पनांमध्ये स्त्रियांना जखडून ठेवले. या कल्पनेतून लैंगिकता नियंत्रित करताना स्त्रियांना अनेकवेळा जातपंचांच्या मनमानीचीही शिकार व्हावी लागते. विदर्भात पारधी बेड्यावर राहणाऱ्या रुश्मिताचे त्याच पारधी बेड्यावरील अमृत कुमारशी प्रेमसंबंध जुळले. पुढे निसर्गदत्त तेच घडले. दोघे एकत्र आले. रुश्मिता गरोदर झाली. जातपंचायतीने रुश्मिताला जात बहिष्कृत केले. पारधी बेड्याबाहेर हाकलले. सात महिन्यांची गरोदर रुश्मिता अन्न-पाण्याविना सहा दिवस जिवंत राहून नंतर मरून गेली. तिच्या वडिलांनी जातपंचायतीच्या भीतीने 'फिट्याळ' करुन ( फिट्याळ म्हणजे ' ज्याने पाप केलं तोच पापाचा धनी, ' आमचा संबंध नाही.) जातपंचायतीचा दंड भरला. अमृतकुमारने जातपंचांना 'हेल्याचे' जेवण दिले. तो जातीतच राहिला. अमृतकुमारशी संबंध ठेवल्याने गरोदर झालेल्या रुश्मिताला पोटातल्या बाळासह जग सोडावे लागलं. पोट आणण्याच्या क्रियेत तेवढाच भागीदार असलेला अमृतकुमार मात्र हेल्याचे जेवण देवून उजळमाथ्याने समाजात मिरवू लागला. जळगावला नाथपंथी डवरी गोसावी समाजातील घटस्फोटीतेने दुसरा विवाह मान्य नसताना, दुसरा विवाह केला. म्हणून दुसऱ्या नवऱ्यापासून झालेल्या मुलीला मारून टाक किंवा सोडून दे. पुन्हा पहिल्या नवऱ्याकडे नांदायला जा. शिक्षा म्हणून केळीच्या पानावर थुंकलेली थुंकी चाटण्याची क्रूर शिक्षा पंचांनी सुनावली.

जातीव्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रीच्या योनिशुचितेला महत्व प्राप्त झाले. त्यातूनच क्रूर व स्त्रीची मानहानी करणाऱ्या प्रथा सुरु झाल्या. प्रजनन प्रक्रियेचा भाग असणाऱ्या मासिक पाळीचा स्त्राव अपवित्र समजून स्त्रीचं खच्चीकरण करून तिचं महत्व कमी करण्यात आलं. या भावनेतूनच स्त्रियांना शनिशिंगणापूर किंवा शबरीमालासारख्या ठिकाणी जाण्यासाठी रोखण्यात आले होते. एक प्रकारे समाज पंचायतीने तिच्यावर टाकलेला तो बहिष्कारच होता. शानिशिंगणापूरच्या स्त्री-पुरुष भेदाविरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १८ वर्षे लढा दिला.


लग्नानंतर पहिल्या संबंधाचे वेळी जातपंचांनी दिलेल्या पांढऱ्या कपड्यावर रक्ताचा लाल डाग पडला नाही तर 'माल खोटा' असे पतीने सांगितल्यानंतर ते लग्न जातपंचायत रद्दबादल ठरवते. स्त्रीची अवहेलना करणारी, तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवणारी ही जातपंचायत! आजही जातपंचायतीचे अस्तित्व असलेल्या समाजात जातपंच म्हणजे देव, असा समज आहे. त्यांचा हुकुम डावलता येत नाही, अशी भावना लोकांमध्ये आहे. जातपंच हे पद कुठल्याही निकषावर ठरत नसून ती वंशपरंपरेने मिळालेली देणगी आहे. जातपंचांच्या निर्णयाविरुद्ध कोर्टकचेरी करता येत नाही. जातपंचांच्या अमानवी, क्रूर व मानवी हक्क पायी तुडविणाऱ्या शिक्षांच्या विरोधात अंधश्रद्धा निर्मुलन समितीने २०१३ मध्ये लढा सुरु केला. दोन वर्षे सतत मागणी, पाठपुरावा केल्यामुळे एप्रिल २०१६ साली महाराष्ट्र शासनाने कायदा विधेयक मंजूर केले. ३ जुलै २०१७ ला कायदा राजपत्रात प्रसिद्ध झाला. या कायद्यानुसार धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा,

पाळण्यासाठी विरोध करणे, अडथळा आणणे, विवाह, अंत्यविधी, धार्मिक समारंभ करण्याचा हक्क नाकारणे, वाळीत टाकणे, एखाद्याचे जगणे दुखी-कष्टी होईल अशी कृती करणे, सक्ती करणे, सदस्यांमध्ये भेदभाव करणे, समाजातून काढून टाकणे या सर्व कृती या कायद्यान्वये गुन्हे आहेत.

महाराष्ट्रात कायदा झाल्यानंतर सुमारे दीडशे गुन्हे या कायद्यांतर्गत दाखल झालेले आहेत. परंतु कायद्याचा प्रचार-प्रसार होण्यासाठी शासकीय यंत्रणा सक्रिय होणे आवश्यक आहे. तरच स्त्रियांची उकळत्या तेलातून नाणे काढणे, डोरलं तापवून जिभेवर चटका देणे, योनीमार्गात मिरचीपूड टाकणे, थुंकी चाटणे अशा अमानवी शिक्षांपासून सुटका होईल.

■ ■ ■



# जाहिरात, मालिका आणि स्त्री प्रतिमा



दर्शना पवार
९०७५५ ७०५१०

चाळीसगाव येथे लिंगभाव समानता या विषयावर तासभर मुला-मुलींसोबत संवाद करण्यासाठी मला एका शाळेत आमंत्रित केले होते. मुलांसोबत बोलण्याआधी त्यांच्याकडून काहीतरी समजून घ्यावे या नेहमीच्या पद्धतीमुळे मी त्यांना त्यांच्या वहीवर चित्र काढायला सांगितले. पाच जणांचा ग्रुप मिळून आई-बाबांचे एक चित्र तयार केले. तुम्हाला आश्चर्य वाटेल एकूण दहा ग्रुप होते. म्हणजे साधारण पन्नास मुलेमुली. त्यांनी आई-बाबांचे चित्र काढले पण प्रत्येक चित्रात बाबांचे मनगटावर घड्याळ, पायात बुट, खिशाला पेन, हातात ऑफिस बॅग होती किंवा पेपर वाचताना दाखवले.आईच्या हातात झाडू, म्हणजे वेगवेगळे घरकाम करणारी, साडी, पदर, मेक-अप, अशी आई होती. इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेतील ही मुले! त्यांच्यापैकी काहींची चौकशी केल्यावर लक्षात आले की त्यातील निम्म्यापेक्षा जास्त मुलांची माता, म्हणजे घरातील महिला या नोकरी-व्यवसाय करणाऱ्या होत्या. अगदी डॉक्टर वैगेरे पण होत्या. मग मुलांनी पेपर वाचणारी किंवा डॉक्टर वेषात असलेली, ऑफीसला जाणारी, जीन्स, टि-शर्ट, सलवार कुडता घातलेली आई का नाही काढली? आजूबाजूच्या अशा अनेक प्रश्नांची उकल आपल्याला करायची आहे. कुटुंबव्यवस्था व समाजमाध्यमांचा म्हणजे सिरीयल्स आणि जाहिराती यांचा हा एकत्रित परिणाम होता.

मागील अनेक वर्षात स्त्रियांनी जवळपास सर्वच क्षेत्रात पुढाकार घेतला आहे. राजकारण, सामाजिक क्षेत्र, वकील, डॉक्टर, संशोधक, उत्तम शेतकरी, उद्योग, व्यवसाय इत्यादि सर्वच क्षेत्रात. पण जाहिराती, सिनेमा, समाजमाध्यमं यांनी स्त्रीयांची प्रतिमा ही स्वयंपाक घर, बाळाचे संगोपन, संडास बाथरूम साफ करणे, कपडे-धुणे-भांडी करणे एवढीच ठेवली. म्हणजे सर्व कुटूंबातील लोकांच्या सेवेसाठी सतत उभे असणारे यंत्र! पण यंत्र बिघडल्यावर दुरूस्तीसाठी माहेरी पाठवतात बरं...

तुम्ही जाहिरातीच्या जगात फिरलात, तर अनेक ठिकाणी गरज नसताना तरूण स्त्रीयाच दाखवल्या जातात. गाडी, दाढीची क्रिम, निकर, बनियान, डिओ अशा अनेक जाहीराती तुम्हाला आठवतील. जिथं बाई फक्त शोभेची वस्तू म्हणून वापरली जाते एखाद्या वस्तूसाठी स्वाभिमान गहाण टाकून पुरूषांच्या अवतीभवती लटकणारी, अशी प्रतिमा स्त्रीयांची उभी केली जाते. तिच्या आत्मसन्मानापेक्षा वस्तूची किंमत अधिक, असे या जाहिरातींनी सिद्ध केले आहे. शिवाय या वस्तू मिळवण्यासाठी ती स्त्री मेहनत करेल, स्वकर्तृत्वावर ती मिळवेल असे नाही. तर ते मिळवण्यासाठी ती स्त्री पुरूषांच्या

अवतीभवती फिरेल, त्यांच्यामागे लागेल. असा बाईचा व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून अपमान करणारा, तिच्या क्षमतांचे खच्चीकरण करणारा संदेश जाहिरातीतून दिला जातो. बायकांना जर काही पाहिजे असेल तर असे वर्तन केल्याशिवाय पर्याय नाही. बायका असेच करतात. खरंतर सरळ-सरळ कर्तृत्व नाकारून पुन्हा तुटपुंज्या महिला सक्षमीकरणावर बोलणे, हा संदेश येणाऱ्या पिढीसाठी खूप घातक आहे. आपण उलटा प्रवास करतो आहोत.

बाईची बौद्धिक मान्यता स्वीकारा, तिला शिकवा. ती सक्षम आहे, असे म्हणणारे आपण तिचे शरीर अधिकाधिक लक्षात ठेवायला लागलो. आपण कसा उलटा प्रवास करतोय ते लक्षात येईल पहा. पंचवीस तीस वर्षापूर्वी मजबूत, दणकट, कष्ट करणाऱ्या स्त्रीचे कौतुक होत होते. पण आज दणकट मजबूत स्त्री ही विनोदाचा विषय झाली आहे. आज बाजारपेठ, जाहिराती, सिनेमा यांनी बाईच्या शरीराचे मापदंड ठरवले. तिची छाती, पोट, मांडी, कुल्ले असे सर्वांचे प्रमाण ठरले. त्याप्रमाणात शरीर असेल तर तुम्ही सुंदर. मग त्या मापदंडांत बसण्याची धडपड मोठ्या प्रमाणात सुरू झाली. काही उपाशी राहू लागल्या. निसर्गतः लाभलेल्या शरीरयष्टीमुळे स्त्रिया अहंगडात गेल्या. थोड्या लठ्ठ स्त्रीया न्यूनगंडात गेल्या. मुली कुपोषणाकडे गेल्या. चार बायका एकत्र जमल्या की त्यांच्या गप्पांमध्ये तुझी स्कीन, लठ्ठ- बारीकपणा, काळा-गोरा रंग, साडी-ब्लाऊजचे डिझाईन, सॅन्डलची उंची, नेलपॉलीश, दागिने, मॅचिंग वैगेरे विषय येऊ लागले. फेअर अँड लव्हली सारख्या क्रीम पासून ते बाईचे शरीर रंगवण्याचे सारे मार्केट्स जोर धरू लागले. ती नखशिखांत सुंदर दिसण्यासाठी प्रयत्न करू लागली. त्या प्रयत्नातच ती अडकून गेली.

हे बघा, नीटनेटके स्वच्छ राहणे, आपला पेहराव स्वच्छ नीट असणे, चालायला सोपे जाईल अशी पादत्राणे असणे, शरीर चरबीमुक्त असणे ही विचारधारा योग्यच! आपण शरीराचा मेकअप केला पाहिजे. शरीर तंदुरुस्तीसाठी व्यायाम केला पाहिजे. योग्य पोषक आहार घेतला पाहिजे. शरीरविज्ञान समजून घेतले पाहिजे. तुमच्या शरीरावर तुम्ही आधी प्रेम करा. तुमचा जो काही रंग, नाक, कान असेल ते मनापासून स्वीकारा. शरीराचा आधी तुम्ही आदर करायला शिका. त्यासोबत बुद्धीचा मेकअप झाला पाहिजे. रोज पेपर वाचणे, पुस्तक वाचणे, चिकित्सा, चिंतन, मनन करणे, वेगवेगळे छंद जोपासणे, हे करा. सौदर्य प्रसाधनांच्या जाहिराती स्त्रीचे शिक्षण, अर्थाजन, कर्तृत्व यापेक्षा स्त्रीचे सुंदर दिसणं कसं गरजेचं आहे, हे मनावर बिंबवतात. या मापदंडांच्यामागे लागून आपण फक्त शरीर आहोत, असा संदेश स्वतःच मनापासून स्वीकारला, तर शरीराचे काम काय? sex - re production एवढंच! पुरूषांच्या डोळ्यांना मी आकर्षक दिसावे एवढेच माझे काम आहे का? मग बाळाच्या जन्मानंतर सैल झालेले स्तन, गर्भाचे भार वाहणारी सुटलेली कंबर हे या सौंदर्य व्याख्येत बसत नाही. चार लोकांत उठून दिसण्यासाठी आपल्याला या सौंदर्य प्रसाधनांची गरज आहेच, छान दिसलो तरच आपली ओळख निश्चित होईल, हा भ्रम जाहिराती आपल्या मनात निर्माण करतात. वयात येणाऱ्या मुलीदेखील अभ्यास, वाचन,

छंद याऐवजी जाहिरातीत अडकतात. खरंतर तुम्ही कितीही प्रयत्न केले तरी एका टप्प्यावर तुमचे वय दिसू लागते. तारुण्याचा काळ संपायला लागतो. मग आपली गरज संपली, आपल्याला आता कोणी विचारणार नाही, या चिंतेने ती ग्रासली जाते. स्वयंपाक घर व बेडरूममध्ये ती संपायला लागते. पण तुम्ही किशोर वयापासून वाचनाचा छंद लावला, योग्य आहार, योग्य व्यायाम केला, छंद जोपासला, पेपर वाचले, नवनवीन माहिती संग्रहीत केली, रोज बुद्धीचा मेकअप केला, तर तुम्ही बौद्धिक सौदर्याने उजळून निघता. रोजची नवीन माहिती विचारांनी तरूण करते. तुमच्यासोबत बोलू इच्छिणाऱ्यांची संख्या वाढते. उदासीनता येत नाही. कर्तृत्वाच्या निखाऱ्याने तुम्ही उजळून निघता. म्हणून सर्वच जाहिरातींचा आपण शांतपणे विचार करायला हवा. अपमान करणाऱ्या जाहिरातींचा, गाण्यांचा निषेध करायला हवा.

या जाहिराती व सिनेमा-सिरीयल्स मधून स्त्री शरीर हे मनोरंजन व उपभोगाचे साधन आहे, असे वारंवार ठसवले जाते. तुम्ही आयपीएल मध्ये नाचणाऱ्या चिअर गर्ल्स बघा किंवा 'मैं तदूंरी मुर्गी मुझे विस्की से गटकाले' ही गाणी बघा. आयटम साँग मध्ये नाचणारी बाई ही आयटम असते म्हणून त्याला आयटम साँग म्हणतात. 'तू चीज बडी है मस्त मस्त', चीज, वस्तू, माल वगेरे, अतिशय गलिच्छ शब्द महिलांसाठी बिनधास्त वापरले जातात. 'ये उसका स्टाईल होंगा ओठोंपे ना दिल मे हा होगा', 'अंजली तूम मूझे भूल जा, ये मै होने नही दूंगा', 'तू होकार नाही दिला तर मी जीव देईल', 'तुझ पे मेरा राईट है', ही स्त्रिचे शरीर आणि आस्तित्वाचा ताबा मिळवू पाहणारी गाणी आहेत. शांतपणे ही गाणी ऐकली, तर या गाण्यांवर केस देखील दाखल करता येईल. ही गाणी मुलांच्या रोजच्या जगण्यातदेखील आली आहेत. नायिकेसोबत जबरदस्ती करणे, तिला धक्का मारणे, किस करणे, तिच्या नकारात होकार गृहीत धरणे हे नायक करतो. आपण लहानमोठे सारेच बाईचे गृहीत धरणे, व्यक्तित्व नाकारणे हे, जाणते अजाणतेपणे शिकत असतो. प्रेमाचे फारच विद्रुपीकरण सिनेमांमधील गाण्यांनी केलेले आहे. प्रेम संकुचित आणि मर्यादित केले आहे. एकमेकांना स्वतः व्यतिरिक्त जगू न देणे, संशय घेणे, नायिकेला दारू पिऊन मारणे ही दृश्ये नित्याचीच झालेली आहेत. सिनेमा आणि जाहिरातींनी स्त्रीचं व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य या संकल्पना मोडीत काढल्या. स्वैराचार म्हणजेच स्वातंत्र्य हे लोकापर्यंत पोहचवले. एका पिढीचे लोक मग स्वातंत्र्याच्या संकल्पनेला विरोध करायला लागले. स्वैराचार, बेजबाबदारपणा या वर्तनाला मुले-मुली स्वातंत्र्य म्हणायला लागले आणि स्वातंत्र्याच्या मूळ संकल्पनेपासून दूर गेले.

नायिकेने फक्त नाजूक असणे, वाचवा - वाचवा ओरडणे, नायकाने नेहमी तिचा सुरक्षारक्षक असणे, म्हणजे बाई तिचे रक्षण सक्षमपणे करू शकत नसून तिला पुरुष सुरक्षारक्षक पाहीजेच, हे समाजमनावर बिंबवले जाते. एका सिनेमात नायिका लहान भावासोबत बाजारात जातांना काही मुले तिची छेड काढतात. ती घाबरते व तिला वाचवण्यासाठी तिचा लहान भाऊ हातात दगड घेतो. 'राजा कि आयेगी बारात' या सिनेमातील

नायिका बलात्कार करणाऱ्या सोबतच माझे लग्न लावून द्या, अशी मागणी कोर्टात करते. बाईची अब्रू काचेचे भांडे असते. बलात्कारानंतर स्त्रीचे पावित्र्य भंग होते. ते जपण्यासाठी बलात्कार करणाऱ्यासोबत तिचे लग्न लावून देणे हा पर्याय कुटुंब, कोर्ट आणि तिलादेखील मान्य असतो. बाईचे पावित्र्य तिच्या योनीत, शरीरात सामावलेले आहे. पुन्हा योनीशुचितेचा मुद्दा येतो. समाजसुध्दा तशीच चर्चा करतो. सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिन्ट मीडिया तशीच भाषा वापरतात. बाईचा विनयभंग झाला! खरंतर 'पुरूषाचा विनयभंग झाला' अशी बातमी दिली गेली पाहिजे. चर्चचे स्वरूप बदलायला पाहिजे. 'आज पुन्हा देशात १०० महिलांवर बलात्कार झाले' अशी भाषा आता बंद करा. 'आज पुन्हा देशातील १०० पुरूषांनी बलात्कार केला', आज पुन्हा दारू पिऊन पुरूषांनी मारहाण केली'. 'आज पुन्हा चार पुरूषांनी ॲसिड अटॅक केला', अशा बातम्या असायला हव्यात. समाजातील आदर्श, सभ्य पुरूषांनी यावर भूमिका घ्याव्यात. आम्ही हा प्रयत्न चाळीसगाव शहरात केला. तुमच्या मदतीने संपूर्ण देशातील मीडिया पर्यंत हे जाऊ द्या.

स्त्रीची दोन टोकं दाखवली जातात. कमालीची सोशिक किंवा कमालीची बिनडोक. आक्रस्ताळी, उग्र स्वभावाची किंवा घरातल्या घरात नटून थटून सतत भांडण निर्माण करणारी. भांडणासाठी कारण असलेली, सहन करणारी व अत्याचार करणारी अशी वास्तवाशी फार संबंध नसलेली स्त्री - प्रतिमा उभी केली जाते. यात स्त्रीयांनादेखील चूक वाटत नाही. त्या स्वतः ची प्रतिमा मलीन करणाऱ्या मालिका आनंदाने पाहतात. बुद्धीला पटणार नाही अशा घटना तिथे घडताना दाखवतात. आपण बुध्दीचे सर्व दरवाजे बंद करून त्या मालिका पाहतो व स्वतः चेष्टेचा विषय होतो का? या विषयावर विचार करून या मालिकांचा निषेध नोंदवला पाहिजे. बोलताना आपण नेहमी आंतरिक सौंदर्याबद्दल बोलतो पण भुरळ मात्र बाह्य सौंदर्याचीच पडते. या आपल्या वर्तनाला तपासले पाहिजे.

सिनेमांबद्दल बोलायचे तर काही सिनेमे हे खुप छान आहेत. आपण ठरवून अशा सिनेमांना पसंती दिली पाहिजे. 'अस्तित्व', 'अमृत', 'द ग्रेट इंडियन कीचन', 'सांड कि आँख', 'थप्पड' किंवा मला माहीत नसलेले पण तुम्ही पाहीलेले काही सिनेमे असतील, ते एकमेकांना सांगा. ते का बघावे? त्यातले काय आवडले? त्यासंदर्भात चर्चा करा. सर्वच सिनेमांवर बोलणे शक्य नाही. पण 'दंगल' हा फार विचारपूर्वक बनवलेला सिनेमा आहे. दंगल सिनेमावरदेखील काही लोकांनी टीका केली. मुलींना जबरदस्तीने कसरत करायला लावली, केस कापले म्हणून! हा आमिर खान 'तारे जमीन पर' मध्ये मुलांना त्यांच्या पद्धतीने, क्षमतांप्रमाणे, आवडीप्रमाणे, खुलू द्या म्हणत होता. मग आता याला काय झाले. 'ये रॉंग नंबर है' हा डायलॉग त्यावेळी फेमस झाला होता. पण दंगल या सिनेमामधील वडीलांच्या भूमिकेचे मी समर्थन करते. लहानपणापासून बाईवर झालेला बाईपणाचा संस्कार तीचं माणूसपण नाकारते. समाजमाध्यमं, जाहिराती, कुटुंब आणि सिनेमा त्याला खतपाणी घालतात. बाईपणाच्या संस्कारातून तिला बाहेर काढायचे असेल, तर तुम्हाला आग्रही राहावे लागेल.

काही मते तिच्यावर लादावी लागतील. आपल्या मुली उत्तम कुस्ती खेळू शकतात. त्या शरीर सौंदर्याच्या कल्पनेत अडकून पडू नयेत, त्यात त्यांनी वेळ घालवू नये, यासाठी तो आग्रही होता. स्वतःची मते तो मुलींवर लादतो. त्याचा परिणाम म्हणून त्या स्वतंत्र व्यक्ती म्हणून उभ्या राहतात. ओळख निर्माण करू शकतात. दंगल सिनेमातील एक वाक्य सरळ माझ्या हृदयाला हात घालतं. "तेरा बाप तेरे बारे मे कम से कम सोचता तो हैं!",आमच्या पालकांनी आमचा विचार केला पण, जन्माला आल्यापासून लग्नाचा. अगदी शासनानेदेखील विचार केला, कन्यादान पॉलीसी काढून. मुलांच्या शिक्षणासाठी, तर आमच्या लग्नासाठी कर्जाची तरतूद केली. एलआयसीसारख्या मोठ्या कंपन्यादेखील, हुंडा व लग्नातील चंगळवादासाठी लागणाऱ्या पैशाची तरतूद करतात सामाजिक संस्थादेखील आमच्या लग्नाचा खर्च भांडीकुंडीच्या माध्यामातुन उचलतात. लग्नानंतर आम्ही टिकून रहावे, सहनशक्ती वाढावी यासाठी सारे कुटुंब आणि समाजव्यवस्था जन्मापासून एक आराखडा ठरवतात. पुरूषाला आवडेल असे, लग्नाच्या बाजारात लवकर पसंतीस पडेल असे, शरीर सौंदर्य वाढवण्यासाठीचे सर्व प्रयत्न करतात. त्यात आम्हीदेखील सहभागी होतो. हळूहळू बाईचे माणूसपण मरत जाऊन तिचे शरीर मादी म्हणून उरते. जन्माला आलेल्या बाई - माणूस मधला माणूस मरून शिल्लक उरते फक्त 'बाई'. म्हणून ती मुलगी म्हणते, 'तेरा बाप तेरे बारे मे कम से कम सोचता है! सारे जमाने से लढता हैं! जमानेभरकी बातें ताने सुनता है..' असे विचार करायला लावणारे काही सिनेमे आपल्याला दिले तरी ती संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. पालक म्हणून आपण जरूर विचार करावा. कोणते सिनेमे बघावेत आणि कोणते नाकारावेत.

महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या स्त्रीयांची योग्य प्रतिमा आजपर्यंत माध्यमांना नीट दाखवता आली नाही. तुम्हाला माहीत नसेल, तर जाणून घ्या आमच्या भूमिका. आमचा आग्रह बाईचा 'माणूस' म्हणून स्वीकार व्हावा हा आहे. पुरुष विरोधी किंवा पुरूष द्वेषाचा नाही. स्त्री पुरूष दोघांचे माणूस म्हणून जगणे समृद्ध व उन्नत होण्यासाठी आहे. पण या विषयावर काम करणाऱ्या महिलांची प्रतिमा सिनेमाने फारच खराब केलेली आहे. अतिशय आग्रही, आक्रस्ताळी, भावनाशुन्य, भांडखोर, स्वैराचारी, बेजबाबदार दाखवलेली आहे. असे वास्तव अजिबात नाही. वास्तव समजून घ्यायचे असेल तर आमच्या सोबत काही काळ संवाद करा. प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेऊ. त्यानंतर तुम्ही त्या भूमिका अधोरेखित करा. 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमाने हे सर्व वास्तव चित्र अभ्यासपूर्ण पद्धतीने लोकांसमोर आणले. काही ठिकाणी आम्ही संतापतो कारण, रात्री दारू पिऊन आक्रस्ताळपणे तिच्या मर्जी विरूद्ध संभोग करून तिला आनंद देण्याऐवजी शरीर, मनाने जखमी करणारा पुरूष आम्ही पाहातो. मार खाल्ल्यानंतरच्या जखमा पदराखाली झाकून, घराण्याची प्रतिष्ठा टिकवण्याचे ओझे डोक्यावर घेऊन चालणाऱ्या स्त्रीला बघून आमचे मन हेलावते. बलात्कारानंतर तिलाच दोष देणाऱ्या, तिचे जगणे नाकारणाऱ्यांवर आणि तिचा विनयभंग झाला अशा बातम्यांमुळे आम्ही संतापतो. चोर

सोडून संन्याशाला फाशी असा काहीसा प्रकार! याही परिस्थितीत नव्याने लढायला उभे राहतो.

लेख लिहितांना माझे हात थांबत नाहीत. मनातील वादळ अधिकाधिक अस्वस्थ करते. हे अस्वस्थ होणे गरजेचे आहे. तरच आपण स्वस्थ समाजाची स्वप्न बघू शकू. वेगवेगळ्या प्रकारचे लेख लेखक लिहितात. लोक वाचतात देखील. पण कार्टून, जाहिराती, सिरीयल, सिनेमा यांचा परिणाम मात्र समाज मनावर मोठ्या प्रमाणात होतो. लिखित साहित्यापेक्षा दृकश्राव्य माध्यमांचे परीणाम मनावर जास्त होतात म्हणून पुढील काळात ही सर्व माध्यमे जबाबदारीने हाताळली गेली, तर नक्कीच आपला प्रवास योग्य आणि विवेकाच्या दिशेने होईल. म्हणून आपण सर्व फिल्म, सिरीयल निर्माते, जाहिरात, कार्टून, निर्माते यांना विनंती पत्र देऊया. ही माध्यमं चालवताना आपण पैशाचा विचार करू नका असे म्हणणार नाही, पण समाजाची वाटचाल विवेकाच्या दिशेने होईल, असे काहीतरी धोरण ठरवा.

■ ■ ■

**नमस्कार विवेकसाथी**

**संकटे दाही दिशा, जडली झुंजायाची नशा..**
**घेऊ हातामध्ये हात, फुलू पुन्हा एकसाथ..!**

या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र अंनिस वाटचाल करीत आहे.
सध्याच्या डिजिटल युगात आपण करत असलेल काम लोकांपर्यंत पोहचवणं अत्यंत महत्वाचं आहे. आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन करणे हे गरजेचे आहेच तसेच सोशल मीडिया च्या माध्यमातून करणे सुद्धा महत्वाचे आहे आणि हि काळाची गरज सुद्धा आहे. ही गरज लक्षात घेत **महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती** आता **फेसबुक** आणि **युट्यूब** सोबतचं **इंस्टाग्राम(Instagram)**, **ट्विटर(twitter)** आणि **टेलिग्राम(Telegram Channel)** या माध्यमांवर सुद्धा आपण उपलब्ध केल आहे. चला तर मग आपण देखील हि चळवळ जाणून घेऊयात, खालील लिंक वर जाऊन नक्की फॉलो करा.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**
**सोशल मीडिया विभाग**

| | |
|---|---|
| **Website** | mans.org.in |
| **Facebook** | https://www.facebook.com/pg/MaharashtraANiS/ |
| **YouTube** | https://www.youtube.com/c/MahaANIS_MANS?sub_confirmation=1 |
| **Twitter** | https://twitter.com/MahaANIS_MANS?s=08 |
| **Instagram** | https://instagram.com/mahaanis_mans?igshid=137xkx748slhy |
| **Telegram Channel** | https://t.me/mahaANIS |
| **Soundcloud** | https://www.soundcloud.com/mans-social-media |

Like us on facebook pg/MaharashtraANiS
Follow us on YouTube @MahaANIS_MANS
Follow us on Instagram @mahaanis_mans
Join us on Telegram /t.me/mahaANIS
Follow us on twitter @MahaANIS_MANS

# कधी संपणार जात पंचायतीचा जाच?



कृष्णा चांदगुडे
९८२२६ ३०३७८

२०१३ साली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ' जात पंचायत मूठमाती अभियान' सुरू केले. त्यानंतर केवळ पंधरा दिवसांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा निर्घृण खून झाला. तेंव्हा या अभियानासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. मात्र त्यानंतर राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जात पंचायत मूठमाती अभियान सुरू राहिले. त्याअंतर्गत जळगाव, पुणे, महाड या ठिकाणी जात पंचायतीचे पिडीत कुटुंबाला एकत्र आणुन परिषदांचे आयोजन करण्यात आले. तेव्हापासून आत्तापर्यंत हे अभियान सुरु आहे. या अभभियानाचा प्रवास चित्त थरारक असा आहे.

आजपर्यंत दोन जातीतल्या अत्याचाराच्या विरोधात अनेक लढे झाले आहे. परंतु एकाच जातीतल्या पुढारी लोकांनी आपल्या जातबांधवांवर केलेल्या अत्याचाराविरोधात संघटीतपणे लढा झाला नव्हता. राज्यात तो लढा प्रथमच महाराष्ट्र अंनिसने उभारला. महाराष्ट्र अंनिसच्या लढ्यामुळे बहुतांश जातींमध्ये जात पंचायत व गावकीचे अस्तित्व असल्याचे निदर्शनास आले. परंपरेने चालत आलेले लोक जात पंच होतात. काही देशात राजाला देवाचा अंश असल्याचे मानले जात असे. आपणाकडे 'पाचामुखी परमेश्वर' अशी एक म्हण आहे.काही समाजात पंचांना देवाचा अवतार मानले जाते. किंबहुना तसा गैरसमज जाणीवपुर्वक करुन दिला जातो. त्यामुळे त्यांचा शब्द अंतिम समजला जातो. पंच आपल्या समाजातील व्यक्तींचे जीवनमान नियंत्रित करतात. जन्मापासुन ते मरणापर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांवर ते नियंत्रण ठेवतात. ते कायदे बनवतात, स्वतः न्याय निवाडे करतात व स्वतःच शिक्षा करतात. त्यांचे न्यायनिवाडे हे अंधश्रद्धेवर आधारित असतात. पंचांच्या शिक्षा या अघोरी व अमानुष असतात. कधी शारीरिक किंवा दंडाच्या स्वरुपात शिक्षा करून तर कधी समाजबांधवांचा जीव घेऊन किंवा जीव देण्याची मानसिकता तयार करून पंच समाजबांधवांवर वचक निर्माण करतात. दंडाची बेहिशेबी रक्कम पंच स्वतःसाठी वापरतात. शिक्षा करताना अनेकदा ते जात बहिष्कृत करण्याचे सर्वात मोठे शस्त्र उगारतात. अशा वाळीत टाकलेल्या व्यक्तींशी इतर जातबांधवांनी संबंध तोडण्याचा फतवा निघतो. कुणी त्यांच्याशी बोलले तर त्यांनाही दंड आकारला जातो. सामुहिक कार्यातून त्यांना हुसकावून बाहेर काढले जाते. अशा कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास त्याच्या मृतदेहाला खांदा देण्यासाठी कुणी जातबांधव पुढे येत नाही. बहिष्कृत परिवारातील मुला-मुलींशी लग्न करण्यास कुणी तयार होत नाही. बहिष्कृत व्यक्तीने आई वडील अथवा रक्ताच्या नात्यातील इतर व्यक्तींना भेटणे अशक्य असते. जातीतील कोणताही विवाह पंचाच्या

संमतीशिवाय करता येत नाही. मुला-मुलीच्या मागील पाच पिढ्यांचा शोध घेत त्यात काही खोटं निघाल्यास पंच तो विवाह फेटाळून लावतात. कुणी मुलीने आंतरजातीय विवाह केल्यास तिच्या मयताचे विधी आईवडिलांना तिच्या जिवंतपणीच घालावे लागतात. मुलगी मेली असे समजुन तिच्याशी संबंध तोडले नाही तर त्यांनाही गावातून किंवा जातीतुन बहिष्कृत केले जाते. आपल्या जातीत इतर जातीचा संकर होऊ नये, आपली जात शुध्द रहावी याची काळजी पंच घेतात. त्यामुळे कुणी आंतरजातीय विवाह केल्यास ते देवाच्या इच्छेविरुध्द आहे असा पंचांचा गैरसमज असतो. त्यामुळे अशी नवी पिढी जगात येण्याअगोदर गर्भवती महिलांना संपवल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.वाळीत टाकलेल्या कुटुंबातील व्यक्तीशी कुणी बोलत नाही. तो समोर आले की, लोक थुंकतात. त्यांची मुले शाळेत जातांना व खेळताना वेगळी असतात. वाळीत टाकलेल्या कुटुंबाची जनावरसुद्धा सार्वजनिक ठिकाणी गवत चरताना वेगळी ठेवली जातात. नळावर पाणी भरतांना ते पहिल्या नंबरला आले असले तरी सर्वात शेवटी पाणी घ्यावे लागते. घरात कुणी मयत झाले तर त्यांना खांदा द्यायला कुणी पुढे येत नाही. शेजारच्या गावातून पैसे देऊन माणसे आणावी लागतात. त्यांच्या अंत्ययात्रेत कुणी सहभागी होत नाही. घरासमोरून पालखी जाताना पुजा करण्यास मज्जाव करण्यात येतो. प्रार्थनास्थळी येण्यास मज्जाव केला जातो. वाळीत टाकलेल्या कुटुंबाला गावात कुणी किराणा देत नाही. शेजारच्या गावातून किराणा आणावा लागतो. सार्वजनिक वापराची लग्नाची भांडीसुद्धा वापरण्यासाठी मिळत नाही. अनेक वाळीत टाकलेले पिडीत गाव सोडून दुसऱ्या गावी राहतात. गावकीचे प्रस्थ केवळ कोकणात दिसुन येते. तर राज्याच्या इतर भागात जात पंचायतीचा कारभार चालु आहे.

जातपंचायत व गावकीमध्ये महिलांचे शोषण अधिक होते. एखादा अपवाद वगळता कोणत्याच जातपंचायतीमध्ये महिलांना सहभागी होता येत नाही. तिच्या वतीने दुसरा पुरुष तिची बाजू मांडतो. त्यामुळे तिला न्याय मिळण्याची शक्यता कमी असते. पंचांच्या विरोधात बहिष्कृत व्यक्तीने घटनात्मक न्यायालयीन लढाई लढणे हे मोठे आव्हान असते. बहिष्कृत व्यक्तीस पोलिसांकडून फारशी मदत मिळत नाही. जात पंचायत व गावकीचे फतवे हे तोंडी असतातच.बहिष्कृत होण्याच्या भीतीने साक्ष देण्यासाठी इतर कुणीही पुढे येत नाही. महाराष्ट्र अंनिसच्या मोहीमेतुन जातपंचायत व गावकीचे दाहक वास्तव समाजासमोर आले. जात पंचायत व गावकीचे न्यायनिवाडे व शिक्षा वाचून अनेकांना ते खरे असल्याचे वाटत नाही, अनेक वाचक फोन करुन असा संशय व्यक्त करतात. मात्र हे सर्व प्रकार प्रसारमाध्यमांतुन समोर आले आहेत. अथवा पोलीसांत नोंद झाली असल्याचे लक्षात घेणे गरजेचे आहे. काही उदाहरणे वाणगीदाखल देत आहे.

कोकणात एका कुटुंबाने सार्वजनिक वर्गणी न भरल्याने त्यांना वाळीत टाकण्यात आले होते. गावकीच्या जाचाने त्या कुटुंबातील मोहिनी तळेकर या महिलेने आत्महत्या केली. पोलादपुर येथील एव्हरेस्टवीर राहुल एलंगे

यांच्या पत्नीने जिन्स पँट घातली म्हणून वाळीत टाकण्यात आले. गावातील लोकांनी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींशी अबोला धरला. इतकेच नाही तर त्यांच्या जनावरांचा गोठा जाळण्यात आला.रायगड येथील एका शेतकऱ्याचे बैल दुसऱ्याच्या शेतात चरण्यासाठी गेल्याने गावकीची बैठक झाली. त्यांनी पिडीत परीवारास दंड केला. त्या दंडाची रक्कम न भरल्याने पिडीत परीवारास बहिष्कृत करण्यात आले.गुन्हा दाखल झाल्यानंतर एका साक्षीदाराच्या अंगावर गाडी घालून गावकीच्या लोकांनी त्याचा जीव घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्थेत प्रवेश घेतल्याने बौद्ध गावकीने अनेकांना रायगड जिल्ह्यात वाळीत टाकले आहे. गोल्ड मेडल मिळविणारी मुलगी व कारगिल युद्धाचे जवान यांना बौद्ध गावकीने बहिष्कृत केले आहे.कोकणात तर क्षुल्लक कारणावरून वाळीत टाकण्याचे प्रकार समोर आले. सार्वजनिक कार्यक्रमाचे तांदुळ निवडण्यास आले नसल्याने, प्रसाद एकट्याने खाल्ल्याने, बहिष्कृतांच्या प्रेतासाठी बांबु दिल्याने, एकाच आडनावात लग्न केल्याने, जातीवर आधारित व्यवसाय नाकारल्याने, निवडणूकीत विशिष्ट पक्षाला मतदान केल्याने, अशा विविध कारणांमुळे वाळीत टाकले जाते. पालखीची किंवा सार्वजनिक कार्यक्रमाची वर्गणी न भरल्याने अनेकांना कोकणात वाळीत टाकण्यात आले आहे. अशी शेकडो उदाहरणे समोर आली आहेत.

जात पंचायतीच्या प्रकरणात शारीरीक शिक्षा केल्या जातात. जात पंचायतीच्या अनेक दाहक घटना समाजासमोर आल्या आहेत. एका समाजात लग्नानंतर पंचांनी दिलेल्या पांढऱ्या वस्त्रावर नवऱ्या मुला-मुलीनी झोपल्यावर रक्ताचा डाग असेल तरच लग्न ग्राह्य धरण्यात येण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मुलींना कौमार्याच्या परीक्षेत पास होण्यासाठी तिचा इतर समाजातील सहभाग टाळण्यासाठी शिक्षणावर बंदी आणली जाते. पंचांचे व्याजाचे पैसे फेडण्यासाठी बायकोची मागणी करण्याचा प्रकार मराठवाड्यात उघड झाला.एका विवाहीत महिलेचे चारित्र्य शुध्द असल्याचे सिद्ध करण्यासाठी तिला हात न भाजता उकळत्या तेलातून नाणे बाहेर काढण्यास पंचांनी सांगितल्याची घटना बीड व उस्मानाबाद जिल्ह्यात घडली. अकलूज येथे तर पोलीस ठाण्याच्या आवारात असाच प्रकार घडला. अनेक जातीत पोलीस व न्यायालयात जाणे हे पाप असल्याचे पंच सांगतात. न्यायालयाने निर्दोष सोडलेल्या अहमदनगर येथील एका गुन्ह्यातील संशयितांना पंचांनी न्यायनिवाड्यासाठी तोंडात तांदूळ चघळण्यास दिले, ते थुंकल्यानंतर अधिक ओलसर निघाल्याने त्यातील एका महिलेस गुन्हेगार ठरविण्याचा प्रकार अंनिसने उघडकीस आणला. मुलांच्या लग्नासाठी, पुन्हा जातीत येण्यासाठी पंधरा लाख रुपयांची मागणी पंचांनी केली होती. जातीचे निर्णय जातीतच होतील. त्याचा आधिकार इतर कुणालाही (पोलीस व न्यायाधीश यांनाही) नाही, असा अनेक पंचांनी नियम बनवला आहे. पुणे जिल्ह्यातील एका जातपंचायतीच्या निर्णया विरोधात इतर जातीतील लोकांनी हस्तक्षेप करण्यास लावल्याने पंचांनी एका कुटुंबास जबरदस्त जीवघेणी मारहाण केली. त्या

परीवारातील महिलेच्या योनी मार्गात मिरचीची पूड कोंबली. धुळे जिल्ह्यात बलात्कार झालेल्या मुलीचा गर्भपात करण्याचा आग्रह जात पंचायतीने धरला. पिडीता पोलीस ठाण्यात गेल्याने अकरा हजार रुपयांचा दंड करून बहिष्कृत करण्यात आले. वहाबचा ठपका ठेवून पंचवीस मुस्लिम कुटुंबांना बहिष्कृत करण्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यात घडली. सातारा जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीवर पित्याने अत्याचार केले. जात पंचायतीने तिला दोरीने बांधुन सर्वांसमोर काठीने फटके मारण्याची शिक्षा केली. प्रसार माध्यमांनी सदरची चित्रफीत दाखविल्याने पंचांची अमानुषता समोर आली.सांगली जिल्ह्यात आणखी एका महिलेला बांधून मारण्याची चित्रफीत प्रसारित झाली. प्रसार माध्यमांनी ती दाखवल्याने मंत्रालयही हादरले.जळगाव येथे एका महिलेने पुनर्विवाह केल्याने तिला पंचांची थुंकी चाटण्याची शिक्षा देण्यात आली.

नंदुरबार येथे एका महिलेच्या चारीत्र्यशुद्धीसाठी तिच्या बारा वर्षाच्या मुलाच्या हातावर दोऱ्याने रुईच्या झाडाची पाने बांधून त्यावर लालबुंद केलेली कुऱ्हाड ठेवण्यात येणार होती. सात पाऊले चालुन ती फेकल्यावर  हात भाजला नाही, तर आईचे चारीत्र्य शुद्ध असे समजले जाणार होते. अन्यथा आईला पंचांसमोर नग्न आंधोळ घालण्याची शिक्षा करण्यात येत होती. महाराष्ट्र अंनिसच्या हस्तक्षेपामुळे ते थांबले गेले. अशा परीक्षा द्यावी लागणे हे उठसूठ पुरोगामीत्वाच्या गप्पा मारणाऱ्या राज्यासाठी लांच्छनास्पद बाब आहे. अहमदनगर जिल्ह्यात दोन वर्षाच्या मुलीचे लग्न पंचांनी जबरदस्तीने चाळीस वर्षाच्या खुन्याशी लावले होते. पुढे ती मुलगी सतरा वर्षांची झाल्यावर तिने लग्नाला नकार दिल्याने घटस्फोट मिळण्यासाठी पंचांनी तिला एक रात्रभर त्या म्हाताऱ्या सोबत झोपण्याची अट घातली होती. महाराष्ट्र अंनिसने मोठ्या संघर्षाने तो प्रकार थांबवला. सांगलीत पिडीत महिलेस जातीत घेण्यासाठी पंचांनी शरीरसुखाची मागणी केली होती. अहमदनगर जिल्ह्यात एका नवविवाहित तरुणीची लग्नाच्या दिवशी कौमार्याची परीक्षा घेतली. नवऱ्यासोबत शरीर संबंधाच्यावेळी रक्त पडले नाही, म्हणून लग्न रद्द करण्यात आले होते. महाराष्ट्र अंनिसच्या प्रयत्नाने त्या तरुणीला न्याय मिळाला. अशाच कौमार्य चाचणीला विरोध करणाऱ्या तरुणाच्या आजीच्या अंत्ययात्रेवर बहिष्कार टाकण्याची घटना ठाणे जिल्ह्यात घडली. पंचांबरोबर शारीरिक संबंध ठेवण्याचे आदेश दिल्याची घटना जालना जिल्ह्यात घडली.चर्च कडुन बहिष्कृत केल्याची घटना मुंबई येथे घडली. वाशीम जिल्ह्यात चार व्यक्तींनी जात पंचायतीच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्या. तक्रार दाखल केल्याच्या रागातून जळगाव जिल्ह्यात पंचांनी गर्भवती महिलेस अमानुष मारहाण केली. अनेक ठिकाणी तक्रारदारांना पोलीस संरक्षण देण्यात आले होते. जातपंचायत बंद करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या तरुणास त्याच्याच पंचांनी चाकुने हल्ला केल्याची घटना अहमदनगर जिल्ह्यात घडली.

आंतरजातीय विवाह केल्याने पंचांनी बहिष्कृत केल्याच्या शेकडो तक्रारी दाखल झाल्या आहेत. धुळे जिल्ह्यात आंतरजातीय

विवाह केल्याने जिवंत मुलीचा दशक्रियाविधी घालण्याचा प्रकार महाराष्ट्र अंनिसने थांबवला. मुंबईत एकट्या दाभोलखाडीत भोई समाजाचे चारशे बहिष्कृत कुटुंबीय रहातात. पुणे काँग्रेसचे पदाधिकारी सह अनेक परीवारांनी आंतरजातीय विवाह केल्याने श्रीगौंड ब्राह्मण जात पंचायतीने बहिष्कृत झाल्याची तक्रार केली आहे. बोलीभाषे ऐवजी मराठी बोलल्याने एका जातपंचायतीने सांगलीच्या नवविवाहितेला घटस्फोट सुनवला. पतीच्या निधनानंतर बायकोला अशुभ समजून अंधाऱ्या खोलीत डांबून ठेवण्याच्या कुप्रथेला विरोध करणाऱ्या महिलेला पुण्याच्या पंचांनी बहिष्कृत केले. आईच्या पोटात असताना लग्न लागले परंतु तरूणी आयटी क्षेत्रात व तरुण सातवी पर्यंत शिकला असतांना लग्नास नकार देणाऱ्या मुलीला पंचांनी दंड करत जात बहिष्कृत करण्याचा प्रयत्न केल्याची घटना जोगेश्वरी येथे घडली. पंचांवर अंधश्रद्धेचा पगडा इतका आहे की, काही जातीत अजूनही स्त्रीयांना परपुरुषाचा झालेला स्पर्श हा पाप समजला जातो. बाळंतपणात बाळ किंवा आई दगावली तरी चालेल परंतु डॉक्टरच्या स्पर्शाच्या भितीने दवाखान्यात न जाण्याची माहिती उघड झाली आहे. जातीची शिक्षा म्हणून पंच आर्थिक दंडही करतात. इतरही प्रकरणात पंच खव्याची वाटणी करणाऱ्या बोक्यासारखे न्याय निवाडे करतात. काही जातीत पोलिसांत जाणं हाच मोठा गुन्हा समजला जातो. त्यामुळे मोठय़ा हिंमतीने कुणी पोलीसात गेले असता त्यांना शिक्षा दिली जाते. महाराष्ट्र अंनिसच्या मोहिमेमुळे सामान्य पिडीत व्यक्तींना न्यायाची अपेक्षा निर्माण झाली. महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते पिडीत कुटुंबाला भेटुन त्यांना मानसिक आधार देत, प्रसंगी पोलीसांत तक्रार दाखल करण्यात मदत करतात. त्यामुळे राज्यात शेकडो तक्रारी दाखल झाल्या. दाखल झालेल्या तक्रारींचा सरकारी आकडा एकशेचार असला तरी अनेक गुन्हे मागे घेतले आहेत. त्यामुळे गुन्हे दिडशे पर्यंत आहेत.


जातपंचायती ही संविधान विरोधी समांतर (अ) न्याय व्यवस्था आहे. या देशात कितीतरी वर्षे मनुचा कायदा चालला. कधी काळी संस्थाने किंवा राजे न्यायनिवाडे करत असत. देशपांडे, कुलकर्णी, देशमुख, पाटील हे न्यायव्यवस्थेचे घटक होते. देश स्वतंत्र झाल्यावर न्यायदानाच्या या अनेक पध्दती बंद झाल्या. संस्थानेही खालसा करण्यात आली. परंतु जात पंचायतीचे अस्तित्व अजूनही कायम आहे. खरे तर घटनेच्या कलम २१ नुसार, व्यक्तीला मानवी प्रतिष्ठेसह जीवन जगण्याचा अधिकार आहे. कलम १९ नुसार व्यक्तीला मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतू जात पंचायतीच्या कार्यपद्धतीमुळे यावर गदा येते. अनेक तक्रारींमध्ये कार्यकर्त्यांनी पंचांशी सुसंवाद साधून बहिष्कृत कुटुंबांना सन्मानाचे जीवन जगण्यास सहकार्य केले. पंचांना विरोध नाही तर विरोध त्यांच्या शोषक प्रवृत्तीशी आहे. कार्यकर्ते त्यांच्याशी सुसंवाद साधून त्यांच्या चांगुलपणास साद घालत प्रबोधनाच्याव्दारे जात पंचायत बरखास्त करण्याची विनंती करतात. त्यास काही प्रमाणात यश येत आहे. राज्यातील विविध सतरा जात पंचायती बरखास्त करण्यात महाराष्ट्र अंनिसला यश आले आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात एक महत्वाचे पाऊल असल्याचे बोलले जाते.

मुंबईच्या जोगेश्वरी येथील वैदू जात पंचायत बरखास्त करून तिचे रूपांतर सामाजिक सुधारणांचे मंडळात करत बहिष्कार घातलेल्या व्यक्तींना त्यात सन्मानाने स्थान मिळाले आहे.त्यातही जाणिवपूर्वक महिलांना निम्मे प्रतिनिधीत्व दिले आहे. काही जात पंचायतींनी अनिष्ट प्रथा बंद करण्याचे जाहीर केले आहे. काही जात पंचायतींनी बालविवाहास बंदी घालत मुलींच्या शिक्षणास परवानगी दिली आहे. भटके विमुक्त समाजातील अनेकांनी सामाजिक सुधारणांची कास धरली आहे. त्यामुळे दोन वर्षांपासुन मढी (अहमदनगर), माळेगाव (नांदेड) व जेजुरी (पुणे) येथील यात्रेत अनेक समाजातील जात पंचायती झाल्या नाहीत.कोकणातील काही गावकी बंद झाल्या आहेत. इतर राज्यातील जात पंचायतीच्या प्रकरणात प्रभावीपणे हस्तक्षेप करत बहिष्कृत कुटुंबांना सन्मानाने जगण्यासाठी पाठबळ दिले आहे. हे आश्वासक वाटत असले तरी दुसऱ्या बाजूने हजारो जात पंचायतींचे कामकाज अदृश्य स्वरूपात चालु आहेत. त्यासाठी सक्षम कायद्याची गरज अधोरेखित होत होती

महाराष्ट्र अंनिसने प्रसार माध्यमांना सोबत घेऊन हा विषय लावून धरला. मोठा सामाजिक दबाव तयार झाला. महाराष्ट्र अंनिसची वेळोवेळी मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, इतर मंत्री व सचिवांशी चर्चा झाली. शासनाच्या बार्टी या संस्थेसोबत महाराष्ट्र अंनिसने कायद्याचा मसुदा बनवला व तो सरकारला सादर केला. १३ एप्रिल २०१६ रोजी युती सरकारने 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' संमत केला. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरी नंतर ३ जुलै २०१७ पासून कायदा अंमलात आला.

सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण करणारा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले. महाराष्ट्र, सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण ( प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम २०१६ असे या कायद्याचे नाव आहे. हा नविन कायदा आल्याने जात पंचायतींना चाप बसला आहे. सामाजिक बहिष्कार रोखण्याबरोबरच पिडीतांसाठी दिलासादायक तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.या कायद्याने सामाजिक बहिष्कार हा गुन्हा मानला गेला आहे. सामाजिक बहिष्कार घालणाऱ्या व्यक्तींना तीन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा एक लाख रुपये द्रव्यदंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा एकत्र होतील. अपराध करण्यास, अपप्रेरणा देणाऱ्याससुद्धा अशीच शिक्षा होईल. वसुल करण्यात आलेली द्रव्यदंडाची संपूर्ण रक्कम किंवा रकमेचा काही भाग पिडीत व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबाला देता येईल. हा अपराध दखलपात्र व जामीनपात्र असेल.

पिडीतांना तात्पुरता निवारा मिळावा, सरकारकडून नुकसान भरपाई मिळावी व इतर मुद्दांसाठी महाराष्ट्र अंनिस आग्रही आहेत. याबाबत विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनासोबत महा. अंनिसची एक बैठक झाली. येणाऱ्या काळात कायद्याची नियमावली बनवतांना या सुचनांचा विचार करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र अंनिस विशेष मोहीम राबवत आहे. या कायद्याने महाराष्ट्राची पुरोगामीत्वाची परंपरा आणखी उजळ झाली आहे.



'जातपंचायत मूठमाती अभियान'
जातपंचायतीने अन्याय केला
असल्यास आमच्याशी संपर्क करा.
मा. कृष्णा चांदगुडे - 9822630378
' जात पंचायत मूठमाती अभियान '
राज्य कार्यवाह,
महाराष्ट्र अंनिस
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
https://www.facebook.com/MaharashtraANIS/ --- avinashpatilmans@gmail.com




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे क्रियाशील कार्यकर्ते,
फलज्योतिषाचे परखड अभ्यासक, प्रसिद्ध वक्ते
डॉ. नितीन शिंदे
यांची अत्यंत साध्या सोप्या भाषेत आणि रंजक शैलीत
खगोलविज्ञान व फलज्योतिष उलगडून सांगणारी पुस्तके
खास सवलतीच्या दरात उपलब्ध.
सहा पुस्तकांचा ₹६५०/- किंमतीचा संच
सवलतीमध्ये केवळ ₹४५०/- मध्ये घरपोच...
संपर्क : प्रा. विष्णू होनमोरे ९४२११२२६९२६

# चुंबकमॅन अज्ञानाची फसवेगीरी



नंदकिशोर तळाशीलकर
९८६९१ ७००६२

नाशिक मधील सिडको परीसरातील अरविंद सोनार यांना कोरोनाची लस (कोविशिल्ड) घेतल्यानंतर त्यांच्या अंगावर नाणी, चमचे, भांडी चिकटू लागले असा दावा मीडियाद्वारे करण्यात आला. बातमीरुपाने व्हिडिओ प्रसारित करण्यात आले. चोविस तास ब्रेकिंग न्युज प्रसारित करणाऱ्या चॅनलनी, चुंबकीय तत्व शरीरात निर्माण होवून चुंबक मॅन तयार झाला, चमत्कार घडला, असे वातावरण निर्माण केले. त्यांचे प्रतिनिधीही त्या ठिकाणी गेले. वस्तू चिकटवून बघितल्या आणि हे सत्य आम्ही तपासले अस म्हणत फेकिंग न्युज चर्चासत्रे चालवली.

सुरूवातीला तथ्य आहे, अशा बातम्या पसरविणारी माध्यमे त्यानंतर सत्यता तपासण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मदत घेऊ लागले. नाशिकचे साथी डॉ. ठकसेन गोराणे, कृष्णा चांदगुडे यांनी प्रत्यक्ष सोनार यांच्या घरी जाऊन प्रयोग केले आणि माध्यमांसमोर ठामपणे सांगितले की वस्तू चिकटण्यामागे चुंबकीय तत्व निर्माण झाले, हा दावा खोटा आहे. त्यामागे वैज्ञानिक कारणे आहेत. ती कारणे शोधली पाहिजेत आणि तपासली पाहिजेत. महाराष्ट्रात हे प्रयोग मुंबई, ठाणे, नगर, नाशिक, सांगली, जळगाव आणि इतर जिल्हयातही केले गेले. विज्ञान तपासले गेले. नगरहून ॲड. रंजना गवांदे यांनी आपल्या पतीच्या अंगावर वेगवेगळी नाणी, चमचे आदी वस्तू चिकटवून त्यामागील सत्य सांगणारा व्हिडिओ तयार केला. तसेच मुंबईहून नंदकिशोर तळाशिलकर यानीही असा व्हिडिओ तयार केला. महाराष्ट्र अंनिसतर्फे हे व्हिडीओ, समाज माध्यमावर प्रसारित करण्यात आले. जळगावचे साथी दिगंबर कट्यारे यांनी वरील प्रयोग तर जिल्हाधिकारी व प्रशासनासमोर आणि मेडीकल कॉलेजमध्येही करुन त्यामागील सत्यता पुढे आणली.

मुळात लस ही कोरोनाच्या विषाणूंना मारुन वैज्ञानिक पध्दतीने शरीराची प्रतिकार शक्ति वाढवण्यासाठी केली गेलेली आहे. कोरोनाच्या लसीत कुठलाही मॅग्नेट किंवा मॅग्नेटीक पदार्थ वापरलेला नाही. अस असेल तर शरीरात मॅग्नेटिक तत्व येणारच कसे? चुंबकत्व असेल तर लोखंडी वस्तू चिकटू शकतात. स्टेनलेस स्टीलमध्ये लोखंडाचे प्रमाण अल्प असते त्यामुळे मॅग्नेट चिकटत नाही. म्हणूनच तर स्टिलची भांडी घेताना चुंबक लाऊन तपासतात. इतर अधातू लाकूड, प्लॅस्टिक, रबर चिकटतात का? हे कार्यकर्त्यांनी करुन पाहिले. कृष्णा चांदगुडे यांनी वाहिनीवरील जाहीर कार्यक्रमात लाकूड, प्लॅस्टिक वस्तू मा. सोनार याना चिकटवून दाखवल्या.

वस्तू चिकटण्यामागे वैज्ञानिक कारण आहे. आपल्या शरीरातून वेगवेगळे द्रव बाहेर पडत असतात. शरीराला घाम येत असतो त्यामध्ये 'सिबम' नावाचा चिकट द्रव असतो. प्रत्येकाच्या शरीरात या द्रवाचे प्रमाण कमी-जास्त असू शकते, त्यामुळे शरीरावर थोडासा दाब देऊन अशा वस्तू चिकटून राहू शकतात. तसेच वस्तू खाली पडण्यामागे गुरुत्वाकर्षण बल कार्यरत असते. वस्तू व गुरुत्वाकर्षण यामध्ये नव्वद अंशाचा कोन असेल तर वस्तू न चिकटता खाली पडतात. पण हा कोन पंचेचाळीस अंशापेक्षा कमी असेल आणि त्याला आधार मिळत असेल, तर वस्तू चिकटू शकतात. आपली छाती व पाठ फुगीर आणि मांसल असते. त्यामुळे वस्तूला विशिष्ट अंशात आधार व दाब देऊन मिळून वस्तू चिकटू शकतात. अशाप्रकारे विज्ञानाच्या वेगवेगळ्या नियमांनुसार वस्तू चिकटू शकतात. जगभर असे प्रयोग यापूर्वी झाले आहेत.

प्रत्यक्षात हे न आलेले चुंबकत्व आपण घालवू शकतो. फोलपणा उघड करून भांडाफोड करु शकतो. त्यासाठी काही महत्वाच्या सुचना १) विज्ञानाच्या नियमाप्रमाणे चुंबकीय क्षेत्रात होकायंत्र आणले, तर चुंबकसुई हालते. २) शरीरावर कपडे, कागद ठेवले तर अशा वस्तू चिकटत नाहीत कारण, सिबम द्रवाचा संपर्क तुटतो. ३) शरीराच्या कमरेच्या वर मांसल भागात वस्तू जास्त प्रमाणात चिकटतात. कमरेखाली अथवा पायावर चिकटू शकत नाही. ४) शरीरावर केस असलेल्या भागावर वस्तू चिकटत नाहीत. ५) मॅग्नेट निर्माण होवून अशा वस्तू चिकटतात असा दावा करणारे असतील, तर त्यांच्या शरीरावर पावडर लावा वस्तू चिकटणार नाहीत. ६) आपली त्वचा जास्त कोरडी असेल, तर वस्तू चिकटणार नाहीत. पण नाणी, चमचा अथवा इतर वस्तू ओली केली तर चिकटू शकते. ७)लोखंडी सळी चिकटवायचा प्रयत्न केला तर ती वजनाने जड असल्याने व गुरूत्वाकर्षण बल कार्यरत असल्याने चिकटत नाही खाली पडते. ८) चमचा आडवा, पसरट बाजुने चिकटू शकतो. पण तोच चमचा साईडने चिकटवायचा प्रयत्न केला तर पडतो. ९) विज्ञान नेहमी सांगते कुठलीही गोष्ट तपासा. त्याचप्रमाणे लस घेतल्यावरही तसेच न घेतल्यावरही हे प्रयोग केले तर दोनही वेळेस वस्तू चिकटू शकतात.

आजही आपल्याकडे कोरोना लसीकरणाबाबत बरेच गैरसमज, अंधश्रद्धा आणि अज्ञान आहे, त्यामुळे लोक लस घ्यायला टाळतात. लशी बाबतच्या अफवा टाळल्या पाहीजेत. एक मात्र विशेष झालं, मा. सोनार यांनी लस घ्या असे आवाहन केले होते. महाराष्ट्र अंनिसच्या या भांडाफोडीनंतर माध्यमांनीही लस व चुंबकीय तत्व यांचा संबध नाही, असे जाहिर केले. सरकारनेही याबाबत पुष्टि दिली आहे. आपणही वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगुया. शरीरावर कुठलीही वस्तू चिकटू शकते हे मान्य करूया, पण ते विज्ञानाच्या नियमाने हे पण मान्य करुया. या वैज्ञानिक युगात लसीमुळे मॅग्नेटिक तत्व निर्माण होते हे छद्मविज्ञान आहे. हे लक्षात ठेवा!

■ ■ ■



ॲड. गवांदे (संगमनेर) चुंबकीय तत्वाचे
प्रात्यक्षिक करुन भांडाफोड करताना



नंदकिशोर तळाशिकर (मुंबई) चुंबकीय तत्वाचे
प्रात्यक्षिक करुन भांडाफोड करताना




जळगाव जिह्याधिकारी कार्यालय येथे दिगंबर कट्यारे चुंबकीय तत्वाचे
प्रात्यक्षिक करुन भांडाफोड करताना

# मुस्लीम समाजातील भानामती प्रकरण



माधव बावगे
९४०४८ ७०४३५

गेली दोन वर्षे कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर कधी सौम्य, तर कधी कडक अशा जमावबंदी आदेशामुळे शाळा महाविद्यालये, उद्योग, व्यावसाय, खाजगी, सरकारी, निमसरकारी कार्यालये, मंदिरे, सांस्कृतिक, मनोरंजनाचे उपक्रम, क्रीडांगणे, ग्रंथालये, दुकाने, सार्वजनिक वाहतूक इत्यादी क्षेत्रं अगदी कडेकोट बंद राहीले. त्याला पर्याय म्हणून कंपन्यांनी 'वर्क फ्रॉम होम' सुरू केले. त्यामुळे सर्व लोक घरातच अडकून राहिले. पर्यायाने गरीब, कष्टकरी, कामकरी, मजूर, खाजगी व्यावसायातील कर्मचाऱ्यांचे हाल झाले. सरकारी यंत्रणा कितीही सज्ज असली, तरी त्यांनी घेतलेले निर्णय संबधित लोकापर्यंत पोहोचणे, तेही सरकारी दरबारी नोंद असलेल्यांपर्यंतच मर्यादित होते, बाकीच्यांचे काय? अशी भयावह परिस्थिती न दिसणाऱ्या व्हायरसमुळे जगाला अनुभवायला मिळाली.

आरोग्य विषयक अज्ञान, मर्यादित आरोग्य सुविधा, मोडलेलं आर्थिक नियोजन यातून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. घरातील कर्ती मंडळी सोडून गेली. या सर्व परिस्थितीत घराघरात अंतर्गत कलह, भांडणं आणि महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले. याचा परिणाम कुटुंबातील व्यक्तींच्या मनावरील ताण वाढले. कौटुंबिक आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडले. कुटुंबात असूनही जवळचा माणूस मनाने आणि अंतराने दूर झाला. या सर्व परिस्थितीत अतार्किक आणि अवैज्ञानिक सल्ले आणि कृतीही वाढल्या. बंदी असूनही छुप्या पद्धतीने बुवाबाजी चालूच राहिली.

अशा परिस्थितीत महा. अंनिसने संपूर्ण राज्यात विभागनिहाय 'मानसमित्र' ही हेल्पलाइन चालवली. याचा फायदा शेकडो लोकांनी घेतला. प्रशिक्षित कार्यकर्त्यांकडून प्रश्न ऐकून आणि समजून घेतले जात होते. ओढवलेल्या परिस्थितीत शांतपणे कशा प्रकारे मात करायची या बाबतचा सल्ला दिला जात असे. प्रसंगानुरूप मानसोपचारतज्ज्ञांचा उपचार घेण्याचे संबंधितांना कळवले जात असे.

पानगाव ता. रेणापूर जिल्हा लातूर मधील हे एक वानगी दाखल मुस्लीम समाजातील 'भानामती' प्रकरण. गावातील टकार गल्लीतील एका मुस्लीम कुटुंबात जादूटोणा व भानामतीचा प्रकार घडू लागला. काही दिवसांनी शेजारील दुसऱ्या, तिसऱ्या घरात असे प्रकार वाढतच चालले. त्यावर उपाय शोधण्यासाठी म्हणून दिनाक ०३ एप्रिल २०२० रोजी परभणी जिल्ह्यातील मौजे पेडगाव येथील

भोंदूबाबा शेख मजहर यास संबधित भानामतीग्रस्त कुटुंबियांकडून बोलावण्यात आले. भोंदूबाबाने डाव मांडून, डोळ्यात लिंबू पिळून आणि डोळ्याला काळी पट्टी बांधून तंत्र मंत्राच्या सहाय्याने शेजारील सय्यद हसीना इब्राहिम या महिलेने जादूटोणा करून भानामती केली असल्याचे सांगितले. तिच्या घरात नारळ, हिरवा कपडा, बांगड्या, बाहुल्या, सुया, बिबे आजही आहेत असे सांगितले. अगोदरच या भानामतीग्रस्त कुटुंबीयांचा त्यांच्यावर संशय होता. त्यात बाबांनी असे सांगितल्याने संशय आणखीनच वाढला. दिनांक २२ ऑक्टो. २०२० रोजी भानामतीग्रस्त कुटुंबातील शेख हजू इस्माईल, शेख एजाज हाजू, शेख हीना हाजु, शेख साजिद इब्राहिम, शेख जोहराबी इब्राहिम, शेख बेगम हजु, शेख रुक्याबी खाजमिया, शेख नसीर खाजामिया आणि शेख इब्राहिम गरिबशाह या सर्वांनी सय्यद हसिनाबी यांच्या घरावर हल्ला केला. जादूटोणा, करणी, भानामती का करतेस? म्हणून परिवारातील सदस्यांना दगड आणि काठीने जबर मारहाण केली. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध पिडीत सय्यद हसिनाबी यांनी रेणापूर पोलिस ठाण्यात दिनांक २३ ऑक्टो. २०२० रोजी रीतसर तक्रार केली. पोलिसांनी मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

आमच्यावर मारहाणीचा गुन्हा का नोंद केला, अस म्हणत वरील सर्व लोकांसहीत गल्लीतील अठरा कुटुंबीयांनी मिळून पिडीत महिलेला व कुटुंबीयांना गावाबाहेर हाकलून दिले. त्यामुळे सय्यद हासिनाबी यांचे कुटुंब उघड्यावर आले. शेवटी जीवाच्या आकांताने आणि भीतीपोटी त्यांनी शेतात मुक्काम ठोकला. पिडीत महिलेला मधुमेह आणि रक्तदाबाचा आजार असल्यामुळे कुटुंबावर मानसिक ताण येणे स्वाभाविक होते. पीडीत महिलेचा मुलगा शेख शहेनशहा इब्राहिम यांनी महा. अंनिसच्या मानसमित्र हेल्पलाईनवर संपर्क केला. महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा असताना देखील पीडितांना असे जीवघेणे जीवन जगावे लागते. पीडितेच्या व्यथा ऐकून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून प्रशासनाकडे पुन्हा तक्रार अर्ज दाखल करण्याची सूचना दिली. तसेच महा. अंनिसच्या राज्य महिला विभागाच्या सहकार्यवाह रुक्साना मुल्ला व जिल्हा प्रधान सचिव बाबा हालकुडे यांना भेटून तक्रार अर्जाची प्रत त्यांच्याकडे देण्याचे सांगितले. अंनिस प्रतिनिधींना प्रकरणाची सत्यता पडताळून योग्य ते मार्गदर्शन करण्याची सूचना केली. पीडीत महिलेने घडलेल्या प्रकरणाचा सविस्तर वृत्तांत कथन करीत दिनांक ०५ नोव्हे. २०२० रोजी मा. जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपअधीक्षक, महा. अंनिस, पोलिस निरीक्षक, गावचे सरपंच, पोलिस पाटील आणि तंटामुक्ती अध्यक्ष यांचे नावे आरोपींवर कारवाई होण्यासाठी लेखी तक्रार अर्ज दिला.

सदर अर्जावरून महा. अंनिसने हे प्रकरण अतिशय गंभीर असून या प्रकरणी मारेकऱ्यांवर जादूटोणाविरोधी व सामाजिक

बहिष्कारविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हे नोंद करण्याची मागणी केली. तसेच प्रकरण सामूहिक असल्याने जादूटोणा विरोधी व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा प्रबोधन कार्यक्रम आयोजनाची विनंती केली. पोलिस निरीक्षकांनी सत्वर लक्ष घालून महा. अंनिस प्रतिनिधी रणजित आचार्य, मधुकर गालफाडे व संबंधीत कुटुंबांची बैठक घडवून आणून हे प्रकरण सामोपचाराने थांबले नाही, तर नाईलाजास्तव दोन्ही कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करावा लागेल असे सांगितले. तेंव्हा आरोपींनी कबूल केले की, पेडगाव जिल्हा परभणी येथील भोंदूबाबाच्या फसवणुकीला आम्ही बळी पडून आमच्या हातून हे कृत्य घडले. आम्ही आता असे लिहून देतो की, आम्हाला यावेळी माफ करावे. सय्यद हसीना इब्राहिम यांना यापुढे आम्ही कुठलाही त्रास देणार नाही. जर आमच्याकडून पुन्हा या कारणास्तव त्यांना त्रास झाला, तर आमच्यावर कायदेशीर कारवायी करावी. तसेच जादूटोणा, करणी, भानामती या कायद्याबाबत आमच्या गल्लीत जाणीव जागृती करावी, असा विनंती अर्ज १०० रुपयाच्या बाँड पेपरवर बंधपत्रात लिहून दिला.


दिनांक १९ नोव्हेंबर २०२० रोजी सायंकाळी जाणीव जागृती कार्यक्रम घेण्याचे सर्वानुमते ठरले. ठरल्याप्रमाणे ग्रामपंचायत पानगाव व तंटामुक्ती अध्यक्ष यांच्यावतीने जादूटोणा, करणी, भानामती, भूत, देवी अंगात येणे, जादूटोणाविरोधी व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा प्रबोधन जाहीर सप्रयोग कार्यक्रमाचे आयोजन, सरपंच सुकेश भंडारे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. पोलिस निरीक्षक गोरख दिवे यांनी पाण्याचा दिवा पेटवून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. करणी भानामती या बाबत सर्वांनी शांतपणे ऐकावे आणि समजून घ्यावे. गैरसमज दूर करून घ्यावेत. यापुढे याबाबत असे प्रकार घडले, तर कायदेशीर कारवाई करावी लागेल. त्याचे परिणाम काय होतील तेही त्यांनी सांगितले. राज्य प्रधान सचिव माधव बावगे यांनी करणी, भानामती, भूत, देवी अंगात येणे, भुताने झपाटणे, याबाबत वैचारिक भूमिका, प्रात्यक्षिकासह मांडली. करणी, भानामती, भूत, या जगात अस्तित्वात नाही. करणी भानामती कोणीही करू शकत नाही आणि कोणाला करताही येत नाही, किंवा तसा कुठलाही मंत्र तंत्र या जगात अस्तित्वात नाही. ज्या घरात भानामती होते, त्या घरातील वातावरणच त्याला जबाबदार असते. ज्या घरात भानामती होते अशा घरातील भानामतीची केस आम्ही तपासायला तयार आहोत. आमच्या कार्यकर्त्यांवर करणी भानामती करून दाखवावी असे आव्हान दिले. भानामती होत नसते. डोक्यातली भानामती जात नसल्यामुळे अनेकांची घरं उद्ध्वस्त होत आहेत, हे सर्वांनी समजून घ्यावे. गेल्या तीस वर्षात भानामती करण्याचे आव्हान कोणीही स्वीकारलेले नाही. माधव बावगे यांनी जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्याची माहिती देवून

शिक्षेच्या तरतुदीही सांगितल्या. ज्या कुटुंबाला मारहाण करून बाहिष्कृत केले आहे, त्या कुटुंबाला सन्मानाने घरी आणून स्वाभिमानाने जगू देण्याची जबाबदारी गाव प्रशासनाची आहे. यापुढे त्यांना या संदर्भात कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे गरजेचे आहे, हे निक्षून सांगितले. रुक्साना मुल्ला यांनी मुस्लिम समाजातील अंधश्रद्धा बाबत, तर बाबा हालकुडे व सुधीर भोसले यांनी भोंदू बुवा, बाबा, मांत्रिक लोक काही प्रयोग करून सामान्य माणसाची कशी लूट करतात त्याबाबतचे प्रयोग करून दाखवून, त्या मागचे वैज्ञानिक सत्य सांगितले. तंटामुक्ती अध्यक्ष कुलभूषण संपते व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुकेष भंडारे यांनी या जाणीव जागृती कार्यक्रमाने गावकऱ्यांचे डोळे उघडले. सर्व गैरसमज दूर करून मनातील भीती दूर केली आहे. विनाकारण अशा घटनेमुळे आपली, आपल्या कुटुंबाची व पर्यायाने गावची होणारी बदनामी टाळावी. काही प्रश्न असतील तर आम्हाला सांगा आम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घडवून आणू, परंतु असे प्रकार यापुढे होणार नाहीत याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे असे सांगून गावकऱ्यांना दिलासा दिला.

यावेळी विचारपिठावर प्रा. डॉ. दशरथ भिसे, रणजित आचार्य, पत्रकार अहिल्या कस्पटे होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर गालफाडे यांनी केले, तर आभार चांद पठाण यांनी मानले. याबाबत पीडीत कुटुंबाशी सतत पाठपुरावा करण्यात आला असून परिणामी हा प्रश्न संपूर्णतः मिटला आहे. महा. अंनिसने केलेले प्रबोधन आणि त्याला प्रशासनाची साथ मिळाली तर सामंजस्याने प्रश्न कसे मिटू शकतात याच हे ज्वलंत उदाहरण आहे!

■ ■ ■

# अध्यात्मिक बुवाबाजीचा बिनभांडवली धंदा



डॉ. ठकसेण गोराणे
९४०३५ ५१३४५

नाशिक जिल्ह्यात कळवण हा आदिवासी बहुल तालुका आहे. या तालुक्यातील बऱ्यापैकी मोठ्या असलेल्या गावातील एका घरात अध्यात्माच्या नावाने भोंदूगिरी चालते, मोठी आर्थिक कमाई केली जाते. अशी माहिती महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांना मिळाली.

अम्मा-भगवान या तथाकथित आध्यात्मिक गुरू असलेल्या जोडप्याच्या फोटो फ्रेममधून आपोआप मध, तेल, तांदूळ, विभूती, हळद-कुंकू असे पदार्थ पाझरतात, असं जाणीवपूर्वक सांगितलं जाते. या दैवी चमत्काराचा बोलबाला अत्यंत कमी कालावधीत पंचक्रोशीत मोठ्या प्रमाणात झाला. ज्या इसमाच्या घरी छोटेखानी दरबार भरतो, तेथे दररोज सकाळ आणि संध्याकाळ दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागतात.

खरंच हा चमत्कार घडतो का? हे कुतूहलापोटी पाहायला, लोक गर्दी करत असत. खरंच चमत्कार घडत असेल तर, आपलेही प्रश्न सुटतील या विचाराने लोक अशा ठिकाणी जात असतात. तेथील फोलपणा लक्षात आल्यावर किंवा अपेक्षाभंग झाल्यावर, काही महिन्यांनंतर ही गर्दी आपोआप ओसरते, असाही अनुभव येतो. मात्र तोपर्यंत भोंदूगिरी करणारा कमाई करून तृप्त झालेला असतो. दुसरीकडे भोंदूगिरीचे दुकान सुरु करण्याची तयारी त्याने अगोदरच करून ठेवलेली असते. आदिवासी भाग असलेल्या गावातील हा भोंदूगिरी करणारा इसम, घरातच दरबार भरवतो. श्रद्धेपोटी लोक यथाशक्ती दान, दक्षिणा म्हणून छोटीमोठी रक्कम फोटो समोर ठेवतात. दिवसभरात दोन ते तीन हजार रुपये सहज जमा होतात. पूजा, आरती प्रीत्यर्थ पेढे, नारळ, कपडे आणि इतर काही मौल्यवान वस्तूही अम्मा-भगवानला अर्पण केल्या जातात. अध्यात्मिक बुवाबाजी, भोंदूगिरी समाजातील तळागाळापर्यंत आणि त्यातही आदिवासी भागात कशी फोफावते, याचे हे उत्तम उदाहरण. त्यामुळे त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन, या चमत्काराचा भांडाफोड करून, नागरिकांचे होणारे शोषण थांबवायचे, असे नियोजन करण्यात आले.

नाशिकपासून साधारणतः सत्तर किलोमीटर अंतरावरील या आदिवासी गावात एक दिवस पोहचलो. गाव आदिवासी भागात असले तरी, भर दुपारीही गावात बऱ्यापैकी गजबज चालू असल्याचे दिसून येत होते. मुख्य बाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, पोलीस स्टेशन व इतर शासकीय कार्यालये अशा सुविधा गावात असल्याचे कळून आले. जवळपासचे आठ ते दहा आदिवासी खेडे, वाड्या, पाडे यांच्या आर्थिक व्यवहाराचे, दळण-वळणाचे हे गांव, केंद्र असल्याचे चौकशीअंती समजले.

गावातील भरवस्तीत एका कनिष्ठ मध्यमवर्गीय दुमजली चाळीसारख्या वस्तीतील दोन, तीन खोल्या असलेल्या एका छोट्याशा अरूंद घरात अध्यात्माच्या नावाने दरबार भरून, भोंदूगिरी चालते, त्या ठिकाणाचा शोध घेतला. खरं तर त्याची जास्त विचारपूस करावीच लागली नाही, कारण गावात दरबाराचा श्रद्धामय बोलबाला चांगलाच झाला असल्याचे जाणवले. आम्ही अम्मा-भगवानचे भक्त आहोत, दर्शनासाठी खूप लांबून आलो आहोत, असं सांगीतल्यानंतर आदराने, घर दाखविण्यासाठी काहींनी घरापर्यंत सोबत केली. किती मोठा हा श्रद्धेचा महिमा.

वेळ भर दुपारची. घराच्या दारापुढे कार्यकर्ते जाऊन थांबले. घराचा दरवाजा आतून बंद होता. मात्र चाळीतील इतर घरे आणि हे तथाकथित आध्यात्मिक दरबाराचे घर यात फरक होता. अम्मा-भगवानचे काही पोस्टर्स, झेंडे ठळकपणे घराच्या दर्शनीवर लावलेले दिसत होते. नवीन येणाऱ्या भाविकाला घर शोधण्यात अडचण येऊ नये, यासाठी ही सोय केलेली असावी. घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे लक्षात आले. हळूच कडी वाजवली. मध्यमवयीन महिलेने दरवाजा उघडला. आम्ही अम्मा-भगवानांचे शिष्य असून दर्शनासाठी आलो आहोत, असे कार्यकर्त्यांनी सांगितले. त्या महिलेने आदराने घरात बोलावले. तोपर्यंत त्यांचे पतीही पुढच्या खोलीत आले. दुपारची विश्रांती घेत असावेत, असे लक्षात आले. कार्यकर्त्यांनी जुजबी ओळख देऊन, अम्मा-भगवानच्या दर्शनासाठी आम्ही आतुर झालो आहोत, असे सांगितले. त्या जोडप्याने अम्मा-भगवानची चमत्काराची महती आणि सध्या येथे कधीपासून दरबार भरतो, किती भक्तिभावाने लोक येतात, चमत्कार कसे घडले, याचे रसभरीत वर्णन सुरू केले. कार्यकर्त्यांच्या खिशात चालू असलेला टेपरेकॉर्डर इमानेइतबारे त्याचे काम करीत होता. ज्या खोलीत अम्मा भगवानचा फोटो व इतर पूजा साहित्य ठेवले होते, तेथे कार्यकर्ते गेले. दोन बाय दोन फूट आकाराची अम्मा-भगवान यांची ती फोटो फ्रेम होती. तिच्यातून कोणत्या दिवशी, कोणत्या वेळी, काय, काय पदार्थ पाझरले, ते दाखवायला जोडप्याने सुरुवात केली. फोटो फ्रेमची मागील बाजू तपासण्याचा प्रयत्न कार्यकर्त्यांनी केला. मात्र तसे करू नका, फोटो पालथा केला, तर अम्मा भगवानचा अपमान होतो, असे त्यांनी सांगितले. फोटोच्या समोर पूजा साहित्य, एका मोठ्या ताटात पाच, दहा, वीस, शंभराच्या काही नोटा, काही नाणी आणि त्यासोबतच घडी घातलेली नवी साडी ठेवलेली होती. सदर साडी त्या महिलेने तिला, तिच्या माहेराहून काल मिळाल्याचे सांगितले. मात्र अम्माला न विचारता साडी कशी नेसणार? प्रथम अम्मा साडीची घडी मोडतील, म्हणून रात्रभर ती साडी अम्माच्या फोटोसमोर ठेवली आहे. रात्री कधीतरी अम्मा फोटोतून बाहेर येतील आणि साडीची घडी मोडतील. त्यानंतर ती साडी सदर महिला नेसणार होती, अशी महत्वपूर्ण माहिती सदर महिलेने सांगितली. खरंतर ,फोटोतून एखादी व्यक्ती बाहेर येऊन, साडी नेसते, हा सदर महिलेने केलेला चमत्काराचा दावा, कार्यकर्त्यांना भांडाफोडीसाठी पुरेसा पुरावा ठरला असता. मात्र कार्यकर्त्यांनी घाई न करता, तिथून काढता पाय घेण्याचे ठरवले.

सायंकाळी दरबाराच्या वेळी पुन्हा पूजेसाठी येऊ, असे सांगून कार्यकर्ते निघाले. त्यांनी तडक त्याच गावात असलेले पोलीस स्टेशन गाठले. तेथील प्रमुख पोलीस अधिकारी काही कार्यालयीन कामासाठी बाहेरगावी गेल्याचे समजले. कार्यकर्त्यांनी टेपरेकॉर्डर चालू करून, तेथील पोलीसांना संभाषण ऐकवले मात्र हे प्रकरण फार गंभीर आहे आणि तातडीने त्याचा तपास केला पाहिजे, असे काही विशेष या प्रकरणात नसल्याचा पोलिसांनी अभिप्राय दिला. कार्यकर्त्यांनी अशा भोंदूगिरीचे समाजात काय वाईट परिणाम होतात, भक्तांचे कसे शोषण होते? ते का थांबवले पाहिजे? असे सर्व स्पष्टीकरण केले. शेवटी हा इसम कोण आहे? हा प्रकार गावात कुठे चालतो? याबाबत कार्यकर्त्यांनीच पोलिसांना माहिती दिली. भोंदूगिरी करीत असलेल्या इसमाचे नाव, घराचे ठिकाण सांगितले. ते ऐकून एका पोलीसाने इसमाला लगेच ओळखले. सदर इसमाचा प्रवासी वाहतुकीचाही व्यवसाय असून, तो चारचाकी गाड्या बाळगून आहे. पोलिसांची रीतसर परवानगी न घेता, तो धंदा करतो. अनेक वेळा निरोप देऊनही, तो पोलिसांना भेटायला आलेला नाही. म्हणून त्याच्यावर पोलीसांची करडी नजर असल्याचे जाणवले.

या निमित्ताने का होईना आता त्याला झटका दाखवू, या विचाराने तीन पोलीस दादांनी सोबत येण्याची तयारी दाखवली. अम्मा-भगवानच्या नावाने ज्या घरात दरबार भरतो, तेथे सर्वजण पोहचले. पोलीसांनी दरवाजा उघडण्यासाठी हाक मारली. महिलेने दरवाजा उघडला. पोलिसांना पाहताच, भोंदूगिरी करणारे ते जोडपे चपापले. थोड्या वेळापूर्वी त्यांच्याकडे येऊन गेलेल्या कार्यकर्त्यांनाही त्यांनी लगेच ओळखले. सोबत पोलीस गाडी आणि पोलिस पाहून , ते जोडपे काही क्षण गोंधळले. मात्र लगेच सावध होऊन, अरेरावीची भाषा बोलू लागले. यामध्ये महिलेने जास्त पुढाकार घेत, कांगावा सुरु केला. हा सारा प्रकार पाहून चाळीतील शेजारचे काही पुरुष, महिला, शाळकरी मुलं जमा झाली. दरबाराची जागा दाखवण्यासाठी पोलीसांनी जोडप्याला फर्मावले. कार्यकर्ते, तीन पोलीस, ते दोघे आणि आणखी काही शाळकरी मुलं असे आठ-दहा लोक घरातील फोटो फ्रेम असलेल्या खोलीत पोहोचले. कार्यकर्त्यांनी जोडप्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरु केली. चमत्काराच्या नावाने तुम्ही लोकांना फसवता, त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेता, दक्षिणेपोटी त्यांच्याकडून पैसे घेता, मोठी रक्कम जमा करता, चमत्काराचा प्रचार आणि प्रसार करून लोकांना दैववादी बनविता, अशा प्रश्नांनी दोघेजण पुरते गोंधळले. पण तरीही ते मान्य करायला तयार नव्हते.

अम्मा-भगवान यांच्या फोटोसमोर काल ठेवलेली साडी, रात्री अम्मा फोटोतून बाहेर येऊन नेसणार होती, असं तुम्ही म्हणाला होता. मात्र आज दुपार झाली तरीही साडीची घडी जशीच्या तशीच दिसते, हे कसे काय? असा प्रश्न कार्यकर्त्यांनी सदर महिलेला विचारला. आता आपले पितळ उघडे पडण्याची वेळ जवळ आली आहे, असे त्या दोघांच्या चेहऱ्यावर दिसत होते. तिथे एक शाळकरी मुलगा उभा होता. त्याला कार्यकर्त्याने आपुलकीने नाव विचारले. कोणत्या वर्गात शिकतो, हे विचारल्यानंतर

सहावीत शिकतो, असे तो म्हणाला. विशेष म्हणजे तो त्या महिलेचा पुतण्या असल्याचे समजले. कार्यकर्त्यांनी मुलाला विश्वासात घेत शांतपणे विचारले की, या फोटो समोर ठेवलेली ही नवी साडी, या फोटोत दिसणाऱ्या अम्मा, फोटोच्या बाहेर येऊन साडी नेसतील का ? पोरगा तात्काळ नाही म्हणाला. फोटोतील व्यक्तीला फोटो बाहेर येताच येणार नाही ना ! त्या बालबुद्धीने सर्वांसमोर कार्यकारणभाव स्पष्ट केला होता.

कार्यकर्त्यांनी सदर महिलेला 'फोटोतील व्यक्ती बाहेर येऊन साडी नेसू शकत नाही, हे सहावीत शिकणाऱ्या मुलाला समजते तर, तुम्हाला का नाही'? अस विचारल्यावर सदर महिलेची बोलतीच बंद झाली. बिचारा तिचा पती काहीही बोलू शकला नाही. स्वतः च्या फायद्यासाठी जाणूनबूजून ते लोकांना सांगत असलेल्या चमत्काराचा भांडाफोड पोलीसांसह, सगळ्यांसमोर झाला होता. पुढील काम पोलीसांनी सुरू केले. त्या जोडप्याला पोलीस स्टेशनला आणले. पुढे काय कायदेशीर कारवाई करायची, असा प्रश्न उभा राहिला. कारण अध्यात्माच्या नावाने अशी फसवणूक व शोषण करणे, या विरोधात थेट कारवाई करण्यासाठी कायदाच त्यावेळी अस्तित्वात नव्हता. म्हणून त्यांचा माफीनामा पोलीसांनी लिहून घेतला. दरबार तात्काळ बंद करून, असे पुन्हा न करण्याबाबतची तंबी पोलीसांनी त्या जोडप्याला दिली. पुन्हा असे चमत्काराचे दावे करून लोकांना दैववादी बनवू नका, फसवू नका, असे कार्यकर्त्यांनी त्या पतीपत्नीला समजावून सांगितले. निदान पोलिसांसमोर तरी त्यांना ते मान्य करण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय नव्हता.

■ ■ ■

# माताजींच्या अजब लीला,
# क्षणात केला पाण्यापासून बर्फाचा गोळा



प्रा. मंच्छिद्रनाथ मुंडे
९९६९४ ७३७०२

महा. अंनिसच्या कल्याण शाखेतील कल्पना बोंबे यांना त्यांच्या मैत्रिणीकडून अशी माहिती मिळाली की, गुरूमाँ नावाच्या माताजी पाण्यापासून तीन सेकंदाच्या आत बर्फाचा गोळा तयार करतात. त्यांच्या अंगी दैवीशक्ती असून त्यांना हिमदेवता प्रसन्न झाल्याचे लोक सांगतात. हिमालयात तीस-बत्तीस वर्ष तपस्या केल्याने माताजीना देवता प्रसन्न झाली. याचा परिणाम म्हणून त्यांच्या अंगी थंडावा निर्माण करणारी शक्ती प्राप्त झाली, असं लोक उघड-उघड बोलतात. काही लोक असेही सांगतात की; त्यांच्या घरामध्ये पंखा किंवा एसी लावलेले नाही, पण माताजी घरात असल्या की, एका क्षणात थंडावा निर्माण होतो. केवळ तोंडातून त्यांनी वाफ सोडताक्षणी असं घडतं. माताजीबद्दल अधिक माहिती समजून घेण्यासाठी कल्पना बोंबे यांनी चौकशी केली. चौकशीअंती असे समजले की, माताजी हातामध्ये दोन स्टिलचे ग्लास घेतात. एका ग्लासामध्ये पाणी व दुसरा ग्लास रिकामा असतो. त्यानंतर माताजी रिकामा ग्लास उलटा करून दाखवतात, त्यामध्ये काहीही नसते. मग माताजी हातातील एका ग्लासातील पाणी दुसऱ्या ग्लासात अर्धवट भरेपर्यंत ओततात. तद्नंतर तोंडाने पाण्यावर फुंकर मारून एका क्षणात त्या पाण्याचे रुपांतर रबरासारख्या बर्फाच्या गोळयात करतात. तो हाताला लुसलुशीत, जेलीसदृष्य लागतो.

हे ऐकताच कल्पनाताईंच्या डोक्यात कल्पनेचे चक्र सुरू झाले. क्षणार्धात कल्पनाताईंनी आपल्या मैत्रिणीला फोन करुन स्वतःच्या घरी येण्याचे निमंत्रण दिले आणि त्यांना सांगितले की, मी सुद्धा तुम्हाला एका क्षणात पाण्याचा बर्फ करून दाखविते. या चमत्कारासाठी कोणत्याही दैवी शक्तीची गरज नाही. हे ऐकून त्यांच्या मैत्रिणीला धक्काच बसला. खरोखरच असे काही घडते का ते पाहण्यासाठी त्या दुसऱ्या दिवशी सकाळी कल्पनाताईंच्या घरी गेल्या. कल्पनाताईंनी दोन ग्लास हातात घेऊन एका ग्लासात पाणी आणि दुसरा ग्लास रिकामा ठेवला. दुसऱ्याच क्षणी रिकामा ग्लास उलटा करुन दाखवला आणि त्यात काही नसल्याची खात्री करुन दिली. दुसऱ्या ग्लासातील थोडं पाणी स्वतः प्याल्या आणि थोडं मैत्रिणीलाही पिण्यास सांगितले. अशा प्रकारे ते पाणीच आहे याची खात्री करून दिली. त्यानंतर दुसऱ्या ग्लासातील पाणी रिकाम्या ग्लासात ओतले. पाणी ओतताच, सेकंद-दोन सेकंदातच पाण्याचे रुपांतर पांढऱ्या बर्फरुपी गोळ्यामध्ये झाले. गुरुमाँच्या चमत्काराचा भांडाफोड होताच मैत्रिणीने अधिक समजून सांगण्यासाठी कल्पनाताईला विनंती केली. हे तुम्ही कसं करता? कल्पनाताई त्यांना म्हणाल्या, असं करण्यासाठी कुठेही

हिमालयात जावं लागत नाही. कोणतीही तपस्या करावी लागत नाही. तुमची गुरुमाँ फसवी आहे. भक्ताला कशी फसवते त्याचा प्रयोग मी तुला समजावून सांगते.

## रहस्यभेद

या प्रयोगामध्ये एका रिकाम्या ग्लासाच्या तळाला थोडासा 'गम' टाकून त्यावर बाजारात मिळणारी स्लॅश पावडर म्हणजे सोडियम पॉली ॲक्रिलेट (sodium poly acrylate) नावाची "रासायनिक वॉटर जेली पावडर" टाकली. ग्लास उलटा केला तरी, ग्लासमधील गममुळे पावडर खाली पडत नाही. त्यामुळे ग्लासमध्ये काही नसल्याचा भास होतो. स्लॅश जेली पावडरचे वैशिष्ट्य असे आहे की; ती आपल्या वजनाच्या पाचशे ते आठशे पट पाणी शोषून घेते व एक ते तीन सेकंदात पाण्याचे रूपांतर जेली सदृश्य बर्फामध्ये करते. सदरची जेली रबरासारखी मऊ आणि बर्फासारखी दिसते. (स्लॅशजेली पावडर बाजारात विविध रंगात उपलब्ध असते) चिमूटभर स्लॅश पावडर अर्धा ग्लास पाण्याचे क्षणार्धात रूपांतर रबरासारख्या जेलीमध्ये करते. बर्फासारखा दिसणारा हा गोळा सहज काढून हातावर घेता येतो. स्लॅश पावडर लहान मुलांच्या डायपरमध्ये कापसाच्या घडीत देखील वापरलेली असते. ज्याक्षणी मुलांना लघवीला होते त्यावेळी मुत्र या पावडरमुळे शोषुन घेतले जाते. मुत्राचे रबरासारख्या मऊ गोळ्यामध्ये रुपांतर होते. नंतर ते डायपर आपल्याला बदलावे लागते व त्या मुलांना नवे डायपर चढवले जाते. यामध्ये कुठेही दैवीशक्ती नाही ही साधी रासायनिक प्रक्रिया आहे. अशा रीतीने अनेक बाबा, बुवा, मांत्रिक, तांत्रिक व माताजी अनेक लोकांना वेगवेगळ्या तऱ्हेने फसवतात. तरी यापासून आपण सावध राहावे.

■ ■ ■




कोरोना कधी संपणार
ही भविष्यवाणी करणारे
अनेकजण वरती गेलेत,
कृपा करून हा मास्क घाला
आणि तोंड बंद ठेवा...!

# प्रतिगामी ते परिवर्तनवादी



सुयश तोष्णीवाल
९०२१५ ९१३२६

११ एप्रिल २०१५ हा दिवस. ठिकाण इस्लामपूर. हा दिवस आजही जशास तसा डोळ्यासमोर उभा राहतो. मी शिक्षण घेत असलेल्या आरआयटी महाविद्यालयात आम्ही विवेकवाहिनीच्या वतीने “वैज्ञानिक दृष्टीकोन” या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. तो दिवस खूपच छान गेला. महिनाभरची मेहनत कामी आल्याचा भाव मनात होता. रात्री आवरा आवर करून छोट्या छोट्या गोष्टींचे केलेले नियोजन, टीममधील प्रत्येकाने जीव ओतून पार पाडलेल्या जबाबदाऱ्यांवर चर्चा करत जेवणासाठी आम्ही सर्वजण निघालो. तेवढ्यात बनसोडे सरांचा फोन आला, की कुडाळमधील प्रयोग झाला आणि आम्ही येथेच मुक्काम करत आहोत. दुसऱ्या दिवशीचा प्रयोग रत्नागिरीमध्ये होता. त्याबाबत विचारले तर समजले की तिथे काही लोकांनी नाटकाला प्रचंड विरोध केला असून कार्यक्रम बंद पाडण्याच्या आणि नाटकातील कलाकारांना मारहाण करण्याच्या धमक्या देत आहेत. मी खूप अस्वस्थ झालो. मी देखील नाटकाचा एक भाग होतो पण कार्यशाळाही त्याच दिवशी असल्यामुळे नाटकासाठी जाऊ शकलेलो नव्हतो. अशा वेळी टीम सोबत असणे मला महत्वाचे वाटले म्हणून एका मित्राला सोबत घेऊन रात्री ११ वाजता मी रत्नागिरीला जाण्यासाठी निघालो. मध्यरात्री ३.३० वाजता आम्ही रत्नागिरी बस स्थानकावर पोहचलो. सकाळपर्यंत स्थानकावरच झोपलो. सकाळी लवकरच कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचलो. टीम अजून पोहचली नव्हती. त्या जागेला छावणीचे स्वरूप आले होते. कडेकोट बंदोबस्त होता. एकंदरीत वातावरण अतिशय तणावाचे वाटत होते. पण आम्हाला त्याची पर्वा नव्हती. नाटक सादर करायचेच हा निर्धार पक्का होता. थोड्याच वेळात टीम पोहचली. सर्वांच्या डोळ्यात एकच निश्चय दिसत होता. 'सॉक्रेटिस ते दाभोलकर, पानसरे व्हाया तुकाराम' या रिंगण नाटकाचा प्रयोग सुरू झाला. चार्वाक, सॉक्रेटिस, संत तुकाराम, दाभोलकर, पानसरे या एकेका व्यक्तीची भूमिका करताना स्टेज वरील प्रत्येकाच्या अंगात प्रचंड ऊर्जा संचारली होती. बुद्धापासून चालत आलेली ही विवेकी विचारांची परंपरा या नाटकातून उलगडली गेली. नाटक संपले तेंव्हा फक्त टाळ्यांचा कडकडात आणि लढेंगे-जितेंगे, विवेकाचा आवाज बुलंद करूया अशा घोषणांचा आवाज घुमत होता. नाटकास विरोध करण्यासाठी आलेले लोक शांतपणे विचार करत परत जाताना दिसले. या हिंसक वातावरणात विचारांची लढाई विचारांनी लढण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये कुठून आली? या कार्यकर्त्यांना स्वत: चा जीव धोक्यात का घालावासा वाटला, स्वत: चा वेळ, श्रम, वेळप्रसंगी पैसा खर्च करून

संपूर्ण महाराष्ट्रात हे कार्यकर्ते का काम करत आहेत, यांना काय फायदा होतोय? असे अनेक प्रश्न परतीच्या प्रवासात मला पडत होते.

मी अंबाजोगाईला शिक्षण घेत होतो तेव्हा काहीतरी सामाजिक काम करायचं अशी मनात खदखद सतत असायची. त्यामुळे मित्रांचा ग्रुप बनवणे आणि एखादी छोटी मोठी कृती करत राहणे हे सुरूच असायचं. यादरम्यान ज्यांच्याशी कधीच संपर्क आला नसता असे अनेक नवीन मित्रामैत्रिणी कायमस्वरूपी जोडले गेले. यामधीलच एका मित्राच्या माध्यमातून माझा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी संपर्क आला आणि मी अभाविपचा सक्रिय कार्यकर्ता झालो. विद्यार्थी प्रश्नांसाठी लढू लागलो. पुढे इस्लामपूरला अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यासाठी येण्यामागेसुद्धा अभाविपच्या कामाचा विस्तार करणे हाच उद्देश होता. इस्लामपूरला आल्यावर अपेक्षेप्रमाणे काम सुद्धा सुरू केलं. हे सर्व सुरू असताना महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिरामध्ये एका दिवशी " बुवाबाजीचा भांडाफोड" या विषयावरील व्याख्यान ऐकले. ते व्याख्यान ऐकत असताना ते काम करणाऱ्यांबद्दल खूपच आदर वाटू लागला होता आणि व्याख्यानाच्या शेवटी समजले की, असे काम करणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा खून झाला. डोके सुन्न पडले. भोंदू लोकांचा पर्दाफाश करणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे, वैज्ञानिक दृष्टीकोणाचा प्रसार करणे ही तर चांगली कामे आहेत. मग समाजासाठी चांगले काम करणाऱ्यांचा असा खून व्हावा, हे मनाला पटत नव्हते. म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाशी आपण जोडले गेलो पाहिजे ही भावना बळावली. अंनिसच्या कामात मी सहभागी होऊ लागलो. पुढे अभाविपचे काम पूर्णच थांबवले आणि सक्रियपणे अंनिसच्या कामात उतरलो. इथे मला एक महत्वाची गोष्ट नमूद करावीशी वाटते, ती म्हणजे अंनिसचे जवळपास सर्व कार्यकर्ते अशाच पद्धतीने या विचारांशी आणि कामाशी जोडले गेले आहेत. यात कार्यकर्त्यांना पैशांची अपेक्षा आहे, ना पदाची, ना प्रसिद्धीची. स्वत: मधील आणि पर्यायाने समाजातील अनिष्ट चालीरिती, वाईट रूढी-परंपरा यांच्यावर मात करण्यासाठी लढण्याची कृतीशील इच्छा प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये दिसते. हे काम करण्याची प्रेरणा, विवेकी विचारांची ताकद आहे. हे काम करणे म्हणजे संत-सुधारकांचा खरा वारसा पुढे चालवण्याचे काम आहे असे मला वाटते. अशी प्रेरणा आणि काम करण्याची इच्छा असणाऱ्या विविध क्षेत्रातील लोकांना एकत्रित आणि एकजुटीने काम करण्याची संधी असणारी संघटना अंनिसला म्हणता येईल.

नुकतेच अंनिसला संघटना म्हणून तीस वर्षे पूर्ण झाली. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या संघटन कौशल्याने आणि दूरदृष्टीमुळे संघटनेचा संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार झाला. गावोगावी अंनिसचे कार्यकर्ते ओळखले जाऊ लागले. डॉ दाभोलकरांच्या खुनानंतर कार्यकर्त्यांनी अतिशय संयमाने निषेध नोंदवला. खचून न जाता अंधश्रद्धा निर्मूलनाचे व्रत आणखी जोमाने पुढे चालवले. 'रिंगण नाटक' आणि मागील सहा वर्षांपासून सुरू असलेली 'जवाब दो' ची मागणी यातून संविधानावरील विश्वास आणि विचारांची लढाई विचारांनीच लढण्याचा निश्चय स्पष्ट दिसतोच. महाराष्ट्रात किंवा संपूर्ण

देशात कुठेही जर अशा पद्धतीने एखाद्या नेत्याचा खून झाला तर काय परिस्थिती उद्भवते याचा विचार न केलेलाच बरा. ज्या संघटनेत साधा एक ग्रामपंचायत सदस्यसुद्धा नसेल अशा संघटनेने दोन कायद्यांसाठी लढा दिला. यासाठी स्वतःचा नेताही गमावला. या लढ्यामुळेच जादूटोणा विरोधी कायदा आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा हे दोन महत्त्वाचे कायदे शासनाला संमत करावे लागले. हे कायदे केवळ कागदावरच राहू नये, यासाठी प्रबोधन आणि अंमलबजावणीसाठी सुद्धा भरपूर प्रयत्न केले जात आहेत. या सर्वांचा पाठपुरावा नेहमीच शांततेच्या मार्गाने केला. पर्यावरणपुरक गणेशोत्सव, होळीची पोळी गरजूला दान, फटकेमुक्त दिवाळी, यांसारख्या उपक्रमांना आज शासन तसेच समाज पातळीवर चांगली मान्यता मिळाली आहे. हे उपक्रम खूपच आधी अंनिसच्या माध्यमातून सुरू केले गेले. कुठेही बुवा- बाबांकडून शोषणाचा प्रकार झाला, तर त्याचा भंडाफोड केला जाऊ लागला. त्यामागील विज्ञान/हातचलाखी काय असते याचे प्रबोधन केले जाऊ लागले. तेंव्हा या उपक्रमांना आणि कार्यकर्त्यांना भरपूर त्राससुद्धा झाला. प्रसंगी मारसुद्धा खावा लागला. आजही असे प्रकार थांबलेले नाहीत.

अविनाश पाटील सध्या अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष आहेत. त्यांच्या भविष्यवेधी नेतृत्वामध्ये संघटनेची वाटचाल जोमाने सुरू आहे. नव्या काळाची अनेक नवी आव्हाने कार्यकर्ते स्वीकारत आहेत. त्यातूनच महाविद्यालयीन युवकांसाठी विवेकवाहिनी, जोडीदाराची विवेकी निवड, फिरते नभांगण, जातपंचायतीला मूठमाती, मानसमित्र, संविधान यात्रा, व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन व लढा, युवा संवाद शिबीर, सोबतच भूत या संकल्पनेची भीती निघून जावी यासाठी स्मशान सहली यासारखे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम पुढे येत आहेत. एकीकडे ओरड असते की तरुणाई चळवळीपासून दुरावत आहे, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात तरुणांचा सहभाग पाहिला तर ही ओरड निरर्थक वाटते. अंनिसच्या कामाची महाराष्ट्राच्या बाहेरसुद्धा मागणी आहे. सध्या दिल्ली, पंजाबसह दहा राज्यांमध्ये अंनिसच्या शाखा सुरू झालेल्या आहेत. त्या माध्यमातून विचारांचा जागर सुरू आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही कामाची दखल घेतली जात आहे. या सर्व कामामागे विचारांची ताकद तर नक्कीच आहे, परंतु हे काम उभारणे, पुढे सुरू ठेवण्यामध्ये आणि महाराष्ट्रभर विखुरलेल्या सर्व कार्यकर्त्यांना जोडून ठेवण्यामध्ये वाटा असलेला प्रत्येक व्यक्ती मला जास्त महत्वाचा वाटतो. भविष्यातील आव्हाने पाहता राग, लोभ, मत्सर, असुया, स्वार्थ, जाती, धर्म असे अनेक मानवी दुर्गुण सोडून फक्त मानवता डोळ्यासमोर ठेऊन काम करणाऱ्या अंनिसच्या कार्यकर्त्यांना पाहणे खूपच आश्वासक आणि आनंददायी गोष्ट आहे. माझा प्रवास या लिंकवर पाहू शकता https://youtu.be/QN_ohynCfhU

■ ■ ■





अविनाश पाटील
राज्य कार्याध्यक्ष, महा. अंनिस

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे मूखपत्र म्हणून प्रसिध्द होणाऱ्या 'अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका' च्या पहिल्या अंकात आपले सर्वांचे स्वागत आहे.

अंधश्रध्दा निर्मूलनाचा विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व्यवहार वैयक्तिक, कौटुंबिक, सार्वजनिक जीवनात रूढ करण्यासाठी आपण कटिबध्द आहोत. देव-धर्म-संस्कृतीच्या नावे मानवी जीवनातील शोषण, फसवणूक, दिशाभूल दूर करीत असतानाच सामाजित प्रतीष्ठेच मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक विचार, व्यवहार, धोरण, मूल्यांचा अवलंब करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे. त्यासाठी मानवी सममूहाच्या सर्वांगिण व चिरंतन विकास प्रक्रियेसाठी आपल्याला जीवनात 'वैज्ञानिक दृष्टिकोन' अंगिकारणे आणि समाजव्यवहार गतिमान करणे गरजेचे आहे. आपण सर्व त्यासाठी बांधिल आहोत, असे मी समजतो आणि त्याच बांधिलकीने परस्परांकडून सोबत, सहअस्तित्व, सहकार्य, सहभाग यासोबत सुसंगत संघटित कार्याची आशा बाळगतो. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी संघटित कार्याच्या तीन दशकीय वाटचालीनंतरच्या टप्प्यावर आपण सुरू करीत असलेल्या नवीन मासिकाच्या वाटचालीस माझ्या मन:पूर्वक सदिच्छा व्यक्त करतो.

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा कार्याध्यक्ष म्हणून आपण सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, सहकारी, समविचारी, देणगीदार, जाहिरातदार, आणि त्यांच्या कुटुंबियांप्रति आजपर्यंतच्या वाटचालीत आपण दिलेल्या प्रोत्साहनपर मदतीसाठी, पाठींब्यासाठी, विनम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. माझी मनोभूमिका तुमच्यासमोर मांडताना आपणास संघटनेच्या आणि संघटनेच्यावतीने केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या कार्यक्रम, उपक्रम, संयोजनाची वर्तमान व भविष्यात समर्थपणे पाठराखण करावी, असे आवाहन करतो. त्यासाठीचा नियमित संपर्क ठेवण्यासाठी मी दरमहा दृकश्राव्य आणि लिखीत माध्यमातून आपल्याशी 'कार्याध्यक्ष संवाद' करणार आहे. त्याला आपल्याकडूनही प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**संघटनेसोबत चालूया**

सद्यस्थितीच्या सभोवतालमध्ये आपल्याला आपले ध्येय, उद्दिष्ट्य पूर्ततेसाठी करावयाची वाटचाल अधिक सुनियोजितपणे करणे आवश्यक आहे. त्यामध्ये मानवी स्वभावातील मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न करीत असतानाच संघटित व सामुहिक वर्तणुकीचे शहाणपण दाखविणे अपेक्षित आहे.

त्यासाठी जगरहाटीचा आजचा परवली विकास साधण्यासाठी गरजेच्या असणाऱ्या काळातील मूल्यविचार धारणांची मदत आणि कालसुसंगत विचार चिंतनाची मदत, मार्गदर्शन घेत वाटचाल करावी लागणार आहे. त्यामध्ये आपण समूह संघटना म्हणून कार्यरत राहताना संघटनेसोबत राहण्यासाठी, संघटनेसाठी काम करण्यासाठी, संघटनेनुसार कार्यप्रवण होण्याचा संघटनेमधुन आणि संघटनेकडूनच अभिव्यक्त होण्याची शिस्त, संयम, बांधिलकी व कटिबध्दता आपल्या अंगी बाणवावी लागेल. याबाबत अधिक तपशिलाने आपल्या सगळ्यांशी बोलण्याचा, लिखित स्वरूपात भूमिका पोहचविण्याचा माझा प्रयत्न असेल. सोबतच आपण एक जागरूक, संवेदनशील नागरिक व सामान्य कार्यकर्ता म्हणून देखील काही व्यवहार सूत्रांची स्पष्टता ठेवून व्यवस्था करणे अपेक्षित आहे. त्याला मी 'संघटनेसोबत चालूया' असे आवाहन करीत आहे. आपल्याला संघटनेच्या बांधिलकीतून अपेक्षित असणारी काळजी-चिंता, संघटनेबद्दलची खात्री, संघटनेसाठी करावयाच्या योगदानाची दक्षता, संघटनेप्रति मानलेली वचनबध्दता, संघटनेतील परस्पर संबंध-सहअस्तित्व-सहजीवन आणि संघटनेच्या हितासाठी आवश्यक असणारी कालसुसंगतता या मूल्यांचा अवलंब करावा लागेल.

आपल्या सगळ्यांकडून व्यक्त करीत असलेल्या आशा-आकांक्षा अपेक्षांच्या जोरावरच आपण भविष्यातील संघटित वाटचाल अधिक समर्थपणे व सक्षमपणे करण्याचा आशावाद बाळगूया.

समाज विचारासाठी कटिबध्द असलेल्या संघटित कार्य दबावाने इप्सित ध्येय-धोरणांच्या पूर्ततेसाठी सातत्यपूर्ण प्रयत्नाने बदल घडवता येतो, असा विश्वास व्यक्त करतो.

'विवेकाचा आवाज बुलंद करू या !
लढेंगे, जितेंगे !'

आपला स्नेहांकित

**अविनाश पाटील**

कार्याध्यक्ष, महा. अंनिस

■ ■ ■

# महा. अंनिसचा अटकेपार झेंडा, युगांडात जादूटोणाविरोधी कायदा



डॉ. सुदेश घोडेराव
९४२२२ ५७६५४

**महाराष्ट्र राज्यातील जादूटोणा विरोधी कायद्याचा युगांडा देशात परिणाम, महा. अंनिसच्या तज्ञ मार्गदर्शनाने युगांडा देशात नरबळी अंधश्रद्धा विरुद्ध कायदा मंजूर.**

– अविनाश पाटील, कार्याध्यक्ष, महा अंनिस.

नरबळी, अंधश्रद्धा विरोधाचा एक कायदा नुकताच युगांडा देशाच्या संसदेने मंजूर केला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने युगांडा देशाला त्यांच्या विनंतीवरून हा कायदा करण्यासाठी आपल्या अनुभव व तज्ञतेची सर्वोतोपरी मदत केली. त्यामुळे आफ्रिका खंडातील युगांडा देशात नरबळी, अंधश्रद्धा विरोधी कायदा संमत करणे हे महाराष्ट्र राज्य आणि महा अंनिससाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

युगांडा देशात आजही नरबळीची कुप्रथा रूढ आहे. युगांडाचे खा. बर्नार्ड अटिक्यु हे 'युगांडा पार्लमेंटरी फोरम फॉर चिल्ड्रन्स' चे अध्यक्ष असल्याने त्यांच्या अध्यक्षतेखालील आठ सदस्यीय समितीला या कुप्रथेला कायमचा आळा घालण्यासाठी कठोर कायद्याची गरज भासत होती. त्यासाठी काय करता येईल यासाठीचे त्यांचे प्रयत्न सुरू होते. त्यांनी त्याचा शोध सुरू केला. भारतात अशा प्रकारचा कायदा असल्याचे त्यांना समजले. तेव्हा युगांडाचे खा. बर्नार्ड अटिक्यु यांनी महा अंनिसचे राज्य प्रधान सचिव माधव बावगे याना फोनवर संपर्क केला. माधव बावगे यांनी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील हे याबाबत अधिकृत सविस्तर माहिती देतील असे सांगून त्यांचा फोन नंबर व मेल आयडी देवून संपर्क करण्यास सांगितले. त्याप्रमाणे खा. बर्नार्ड अटिक्यु यांनी महा अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांना संपर्क केला. अविनाश पाटील यांनी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली कायद्यासाठी तयार केलेला ड्राफ्ट, महा अंनिसने सततचा केलेला संघर्ष, पाठपुरावा, मंजूर झालेला कायदा, त्या अंतर्गत नोंद झालेले गुन्हे याबाबत आवश्यक माहिती त्यांना पुरविली. बर्नार्ड अटिक्यु यांच्या सचिव ॲनी एक्या यांच्या माध्यमातून महा अनिसचे आंतरराष्ट्रीय समन्वय विभाग कार्यवाह डॉ. सुदेश घोडेराव यांचेशी सातत्याने गेली चार वर्ष संपर्क केला जात होता. महाराष्ट्राच्या 'जादूटोणा विरोधी कायदा २०१३' चे प्रारूप, निर्मितीचा इतिहास, कायदेशीर अडचणी, संसदीय पातळीवरील प्रवास, कायद्यातील महत्वपूर्ण शब्दांचे अर्थ, व्याख्या आणि महत्वाचे म्हणजे खून आणि नरबळी यातील फरक अशा विविध पैलूंवर अविनाश पाटील आणि कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.

दि. ८ व ९ नोव्हेंबर २०१८ रोजी 'युगांडातील नरबळी विरोधातील कायदा' या विषयान्वये होणाऱ्या महत्वपूर्ण बैठकीसाठी महा अंनिसला निमंत्रीत करण्यात आले होते. कार्याध्यक्ष अविनाश पाटील आणि संसदीय पातळीवरील व्यूहरचना समजावून घेण्यासाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या शिष्टमंडळाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा युगांडा पार्लमेंटरी फोरम चिल्ड्रन तर्फे करण्यात आली होती. परंतु

वेळेअभावी आणि आर्थिक अडचणीमुळे ते शक्य झाले नाही. त्यामुळे या बैठकीतील विषयांच्या मांडणीसाठी आणि निर्णय घेण्यास उपयुक्त असे कायदेशीर टिपण महा अंनिस कायदा व्यवस्थापन विभाग कार्यवाह ॲड. मनिषा महाजन यांचे प्रयत्नांतून तयार करून संबंधित फोरमला पाठविण्यात आले. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने केलेले सहकार्य, मार्गदर्शन अतिशय उपयुक्त ठरले. त्याचाच परिपाक म्हणून ०४ मे २०२१ रोजी जादूटोणा विरोधी कायद्याच्या धर्तीवर ड्राफ्ट तयार करून खा. बर्नार्ड अटिक्यु यांच्या पुढाकाराने युगांडाच्या सरकारकडे सादर करण्यात आला. नुकताच २१ मे २०२१ रोजी सदर कायदा मंजूर झाला. त्या कायद्याचे नाव 'The Prevention and Prohibition Of Human Sacrifice Bill 2020' असे आहे. तेथील संसदेने सभागृहात बहुमताने तो कायदा मंजूर केला आहे. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर त्याची अंमलबजावणी सुरू होईल. या कायद्यानुसार नरबळीच्या गुन्हयातील आरोपीला मृत्यूदंडाच्या अथवा जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. हा कायदा मंजूर झाल्यानंतर खा. बर्नार्ड अटिक्यु यांनी या कायदा निर्मितीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बहुमोल सहकार्य लाभले, हे मान्य करून आभार व्यक्त केले. युगांडामध्ये असा कायदा मंजूर करण्याच्या प्रक्रियेमध्ये सर्व सहभागी घटकांचे महा अंनिसच्यावतीने हार्दिक अभिनंदन व्यक्त करण्यात आले आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तीन दशकांपेक्षा जास्त कालावधीतील कामाच्या तज्ज्ञतेच्या अनुभवातून आणि जवळपास दीड दशकांच्या अथक पाठपुराव्यामुळे महाराष्ट्रात ' जादूटोणा विरोधी कायदा' व ' सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' करणारे महाराष्ट्र हे देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर पहीले राज्य ठरले आहे. महाराष्ट्राच्या धर्तीवर युगांडामध्ये कायदा मंजूर होऊ शकतो. भारतातील सर्वच राज्यात जादूटोणा विरोधी व सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याची गरज असताना, सतत पाठपुरावा करूनही असा कायदा मंजूर होऊ शकत नाही, ही शोकांतिका आहे. आफ्रिका खंडातील युगांडा देशाचा आदर्श घेऊन भारताच्या संसदेमध्ये हे दोनही कायदे मंजूर करून जागतिक पातळीवर भारताने अंधश्रध्दा निर्मूलनाच्या क्षेत्रामध्ये दिशादर्शक व्हावे, अशी मागणी महा अंनिसच्या वतीने कार्याध्यक्ष अविनाश पाटील, आंतरराष्ट्रीय समन्वय कार्यवाह विभागाचे डॉ. सुदेश घोडेराव यांनी केली आहे.

■ ■ ■

# गुंफू हातामध्ये हात, फुलू सारे एक साथ



सुरेखा भापकर
९३२३६ १६९४१

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या महिला सहभाग विभागाच्या पुढाकाराने व सोशल मीडिया व्यवस्थापन विभागाच्या सहकार्याने 'गुंफू हातामध्ये हात, फुलू सारे एक साथ' ही तीन दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमाला भरघोस प्रतिसादात दिनांक १२ ते १४ जून २०२१ अखेर संपन्न झाली.

दिवस पहिला

**'काय बाय सांगू? कसं ग सांगू?'**

या विषयाअंतर्गत 'स्त्री आरोग्य व गैरसमजुती' या बाबत पद्मश्री डॉ. राणी बंग यांनी उपस्थितांशी संवाद साधला. स्त्रिया आपल्या आरोग्यासंबंधी, विविध प्रश्नांसंबंधी बोलत नाहीत आणि बोलायची इच्छा असली तरी कसं बोलावं ? कोणाशी बोलावं ? याविषयी त्यांच्या मनात संभ्रम असतो. आपल्याला होणारा त्रास न बोलता सहन करत राहिला पाहिजे, हे इथल्या व्यवस्थेने स्त्रियांच्या मनावर बिंबवले आहे. ती स्वतः तर या संदर्भात बोलत नाही. कुटुंबातील सदस्य जोपर्यंत घरातील सर्व व्यवहार थंडावत नाहीत किंवा ती अंथरुणावर पडत नाही तोपर्यंत तिच्या आरोग्याची दखल घेत नाहीत. याच आरोग्य विषयक समस्या ब-याच वेळा तिला अंधश्रद्धेकडे घेऊन जातात. या सर्व विषयांची समग्र मांडणी डॉ. राणी बंग यांनी आपल्या विस्तृत विवेचनात केली. आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीत मासिक पाळी, कौमार्य चाचणी, मूल न होणे, व्यसनाधीनता यांसारख्या अनेक विषयांवर डॉ. बंग यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले.

दिवस दुसरा

**'चित्रपट, मालिका आणि स्त्री-प्रतिमा'**

चित्रपट व दूरदर्शन मालिका हा बहुतेक सर्वांच्याच आवडीचा असा विषय. मनोरंजनाचे आणि अभिव्यक्तीचे एक सुंदर आणि सशक्त माध्यम. विरंगुळ्याचे हे साधन योग्य प्रकारे वापरले तर प्रबोधन ही होऊ शकते. या माध्यमातून स्त्रियांचे व्यक्तिचित्रण ज्या पद्धतीने केले जाते ते मात्र असमाधानकारक किंबहुना आक्षेपार्हच आहे, असंच म्हणावं लागेल. आजच्या दूरदर्शन मालिकांतील स्त्री व्यक्तिरेखा बघितल्या, तर त्या अतिशय कपटी किंवा खुनशी पद्धतीच्या रंगविलेल्या असतात किंवा एकतर अतिशय पारंपरिक, अति सोशिक अशी त्यांची प्रतिमा रंगवलेली असते. जाहिरातीतील स्त्री चित्रण हे बिनडोक सुंदरता किंवा घरकाम करणारी गृहकृत्यदक्ष महिला या प्रतिमांत अडकलेली दिसते.

चित्रपटातील स्त्री व्यक्तिरेखा या तर दुय्यमच असतात. चांगलं दिसणं आणि नायका बरोबर गाणी म्हणणं याशिवाय त्या व्यक्तिरेखांना फारसं महत्व नसतं. काही मोजके

चित्रपट मात्र या ठराविक साचाच्या बाहेर जाऊन काही नवीन मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. या प्रयत्नांची संख्या मात्र वाढायला हवी. ही सर्व सद्य परिस्थिती, समाज मनावर त्याचा होणारा परिणाम आणि यात प्रेक्षक म्हणून आपली भूमिका काय असायला हवी ? या सर्व मुद्द्यांवर आपली स्पष्ट व परखड मते आपल्या दुसऱ्या व्याख्यात्या दर्शना पवार यांनी मांडली दर्शनाताई या साने गुरुजी स्मारक येथे कार्यवाह म्हणून कामकाज पाहातात. त्यांच्या मोकळ्या-ढाकळ्या भाषेत संवाद साधण्याच्या शैलीमुळे विषय उत्तरोत्तर रंगत गेला. मालिका जाहिराती यातील आक्षेपार्ह स्त्री चित्रणासंबंधी बोललं गेलं पाहिजे, योग्य पद्धतीने त्याचा निषेध नोंदवला पाहिजे यावर सर्वांचे एकमत झाले.

दिवस तिसरा

**'कसा ग बाई, जातीचा हयो कीला..!'**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या कार्यवाह ॲड. रंजना गवांदे यांनी वकील व कार्यकर्ता म्हणून असलेल्या आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर या विषयाअंतर्गत 'जात पंचायतीची मनमानी' याविषयावर सखोल मांडणी केली. जातीव्यवस्था ही रक्तशुद्धी व वंशशुद्धी जपण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था आहे. स्त्रियांची लैंगिकता नियंत्रित करणे व योनिशुचितेचा आग्रह जपणे ही या अंतर्गत महत्त्वाची उद्दिष्टे असतात. आपण कोणत्या जातीत जन्माला यावं हे कोणाच्याच हातात नसते. पण ज्या जातीत जन्माला आलो, त्या जातीचा अभिमान मात्र बाळगला जातो. नंतर त्या जातीच्या शुद्धतेसाठी आपल्या मुली दुसऱ्या जातीत लग्न करणार नाहीत, यासाठीच खटाटोप केला जातो. त्यासाठी स्त्रियांवर अनेक बंधने घातली जातात. स्त्रिया या जातीचं प्रवेशद्वार आहेत, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाक्य यासंदर्भात महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात संविधानावर आधारित कारभार सुरू झाला. मात्र जात पंचायतीच्या आधारे एक समांतर व्यवस्था आजही अस्तित्वात आहे. या जात पंचायती आपल्या जातीतील लोकांचे संपूर्ण जीवन नियंत्रित करतात. शिक्षा ठोठावणे, न्याय निवाडा करणे तसेच शिक्षेची अंमलबजावणी करणे, ही सर्व कामे बेकायदेशीरपणे करीत, स्त्रियांचे शोषण करीत असतात. जातपंचायतींनी दिलेले अन्यायकारक निवाडे व अघोरी शिक्षा यांचे केलेले वर्णन ऐकून हे सर्व वास्तव आपल्या पुरोगामी महाराष्ट्रातील आहे की आपण मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेत जगतोय? असा प्रश्न उपस्थितांना पडला.

जात पंचायती नष्ट होऊन जात-पंचायतींचे रूपांतर समाज विकास मंडळात होणे ही खरंतर काळाची गरज आहे, हे यानिमित्ताने अधोरेखित झाले. महा. अंनिसच्या प्रयत्न व पुढाकाराने झालेल्या दोन कायद्यांमुळे पीडितांना न्याय मिळत आहे, याबद्दल सर्वांनी अंनिसला धन्यवाद दिले.

व्याख्यानमालेच्या तिन्ही दिवशी लोकांनी पूर्ण वेळ उपस्थिती नोंदवली. गुगलमीट तसेच फेसबुकच्या माध्यमातून हजारो लोकांनी व्याख्यानांचा लाभ घेतला. आपल्याला पडलेले प्रश्न विचारले. वक्त्यांनीही त्याची समर्पक व समाधानकारक उत्तरे दिली. अनेकांनी संघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त

केली. त्या सर्वांचे स्वागत करीत लगेचच होणाऱ्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात त्यांना सामावून घेण्यात आले. अनेकांनी महा. अंनिस प्रकाशन विभागाच्या पुस्तकांची मागणी नोंदवली. अनेक कार्यकर्त्यांच्या अथक मेहनतीने अतिशय आशयसंपन्न अशी व्याख्यानमाला यशस्वीरित्या संपन्न झाली.

■ ■ ■











# 'मन के साथ मन की बात'
# एक उत्साह देणारा अनुभव

विनायक सावळे
९४०३२ ५९२२६

कोरोनाच्या संसर्गाने अनेक क्षेत्रांवर परिणाम केले. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, व्यावसायिक, कौटुंबिक, वैद्यकीय इत्यादी कितीतरी क्षेत्रे. असे क्षेत्र दाखवा ज्यावर कोरोना संकटामुळे प्रभाव पडलेला नाही, असे म्हणणे देखील अतिशयोक्ती ठरणार नाही. अशा परिस्थितीत माणसाच्या मनावर त्याचा परिणाम होणे अत्यंत स्वाभाविक नाही का? कोरोनाच्या लॉकडाऊनने अनेकांच्या नोकऱ्या हिरावून नेल्या. मानवी पडझड होऊन अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, अनेक कुटुंबातील महिलांना हिंसेला सामोरे जावे लागले, अनेकांचे व्यवसाय बुडाले, बेरोजगारीने उच्चांक गाठला, कित्येकांनी आपले जवळचे आप्तेष्ट गमावले, त्याचा असह्य ताण मानवी मनावर होणारच. अशा वेळी आपण संघटना म्हणून काय करू शकतो? आपण काहीतरी भूमिका घ्यायला हवी. काहीतरी समाजोपयोगी करायला हवे. या हेतूने 'मानसमैत्र' नावाने आपण एक हेल्पलाइन सुरू केली. महाराष्ट्रातील पाचही विभागात नव्वद कार्यकर्ते या हेल्पलाइन मध्ये सहभागी झाले. खूप छान काम आपण याद्वारे करू शकलो. रायगड जिल्ह्यात आजही जिल्हा प्रशासन, विविध सामाजिक संस्था-संघटना यांच्या सहभागाने महाराष्ट्र अंनिसच्या वतीने मानसमैत्र हेल्पलाईन एक दिशादर्शक काम करीत आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणजे आपण मानसिक आजाराबाबत अधिक सकस प्रबोधन करण्यासाठी, महाराष्ट्रातील नामवंत मानसोपचारतज्ज्ञांच्या सहभागाने पाच दिवसांची एक यशस्वी ऑनलाईन व्याख्यानमाला घेतली. त्याला महाराष्ट्रातून उदंड प्रतिसाद मिळाला. व्याख्यान सुरू होण्याआधीच आपली गुगलमीटची श्रोते मर्यादा पूर्ण होऊन श्रोत्यांना फेसबुकचा आधार घ्यावा लागत होता. व्याख्यान संपतेवेळी फेसबुकवर तेराशे ते पंधराशे प्रेक्षकांनी व्याख्यान बघितलेले असायचे. हा प्रतिसाद केवळ सुखावणारा नाही तर कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा पेरणारा ठरला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग' आणि विविध उपक्रम विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या या व्याख्यानमालेचे थोडक्यात वैशिष्ट्य मी आपणास सांगू इच्छितो. या व्याख्यानमालेची संकल्पना आणि विषय निश्चिती संघटनेचे मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ डॉ. प्रदिप जोशी (जळगाव) यांनी केली होती. "मन के साथ, मन की बात" असे समर्पक शीर्षक असलेली ही व्याख्यानमाला महाराष्ट्रातील नामवंत मानसोपचारतज्ज्ञांनी यशस्वी केली. यात डॉ.

प्रदीप जोशी(जळगांव), डॉ. वर्षा पाटील(लातूर), डॉ. मिलिंद पोतदार(लातूर ), डॉ. डी.बी. जोशी(नांदेड )आणि डॉ. अनिल डोंगरे(अलिबाग) यांचा उत्साहवर्धक सहभाग होता. प्रत्येकाला दिलेल्या विषयांची विविधता आणि त्या सर्वांची सोप्या शब्दात मांडणी करण्याची पद्धत यामुळे ही व्याख्यानमाला प्रचंड यशस्वी ठरली. व्याख्यानानंतर होणारी प्रश्न उत्तरे देखील तितकीच प्रभावी झाली. या व्याख्यानमालेमुळे महाराष्ट्रातून दीडशेपेक्षा अधिक लोकांनी अंनिस चळवळीशी स्वतःला जोडून घेण्याबद्दल विचारणा केली. अनेकांनी मानसमित्र होण्याबाबत इच्छा व्यक्त केली. अशा सगळ्यांचा आता स्वतंत्र व्हाट्सअप ग्रुप तयार झालेला आहे. त्यांचे प्रशिक्षण देखील आपण सुरू केलेले आहे. या व्याख्यानमालेला मिळालेला उदंड प्रतिसाद आपल्याला काय दर्शवतो? एक तर या विषयाबद्दल समाजामध्ये प्रचंड अज्ञान आणि कुतूहल आहे. तसेच याबद्दल लोकांना जाणून घेण्याची, समजून घेण्याची प्रचंड इच्छा आहे. त्याचप्रमाणे या कामात सहभागी होण्याबाबतही लोकांची तयारी आहे. मानसिक आजारामागे देवदेवस्की, भुतेखेते नसतात, तर तो एक मानसिक आजार असतो, याबाबत आता समाजात जागृती होऊ लागली आहे. पण तरीही प्रचंड कामाची संधी या विषयात आहेच.

या व्याख्यानमालेचा ऑनलाईन प्रचारही आपण खूप छान केला. दोन व्हिडिओ, एक इमेज आणि एक पोस्ट अशा चार बाबी रोज सकाळी एकाचवेळी व्हायरल केल्या जात होत्या. दुपारपर्यंत ही पोस्ट महाराष्ट्रभर नव्हे, तर परदेशातही पोहोचत होती. अनेकांच्या स्टेटसला, फेसबुक, इंस्टाग्राम अशा विविध माध्यमांमध्ये आठवडाभर या पोस्टचा वावर राहिला. आपली गुगलमीटची श्रोते मर्यादा वाढवण्याची नितांत गरज आहे, हेही तेव्हाच लक्षात आले.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा या व्याख्यानमालेतील सहभाग हे या व्याख्यानमालेचे आणखी एक वैशिष्ट्य. सूत्रसंचालन, प्रास्ताविक, वक्ता परिचय व स्वागत, प्रश्न-उत्तरे, आभार अशा विविध जबाबदाऱ्या विविध कार्यकर्त्यांना देऊन या व्याख्यानमालेने संघटनेला उभारी देण्याचे काम केले. २८ जिल्ह्यातून एकूण चाळीस कार्यकर्ते या विविध जबाबदारीच्या निमित्ताने सहभागी झाले. दिनांक २ जून ते ६ जून २०२१ अशा पाच दिवस चाललेल्या या व्याख्यानमालेने संपूर्ण संघटनेलाच कामाला लावले. सध्याच्या संघटनात्मक परिस्थितीतून निर्माण झालेली मरगळ या व्याख्यानमालेने झटकली. उत्साह आणि चेतना निर्माण केली. या व्याख्यानमालेतील विषयपत्रिकेवर जर तुम्ही नजर टाकली, तर त्यातील विषयांच्या शीर्षकावरूनच तुम्हाला त्याचं वेगळेपण जाणवेल. ' चला डोकाऊया मनाच्या गाभाऱ्यात', 'मन उधाण वाऱ्याचे', 'देव येतो अंगात खरं हाय का', 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' आणि 'कुछ तुम बोलो, कुछ हम बोले'. इत्यादी विषयांची निवड त्याचे शीर्षक यातूनच विषयाची उत्सुकता तयार होत होती.

यातील पहिला विषय 'चला डोकाऊया मनाच्या गाभाऱ्यात' हा डॉ. प्रदीप जोशी यांनी घेतला. त्यात मन म्हणजे काय, मन कसे

तयार होते, मेंदूची रचना, मेंदूतील रचनेचे विविध भाग, त्यातील विविध जोडण्या, त्यातील विविध केंद्रे, त्यांची कामे, मनावर परिणाम करणारे घटक, मन आजारी पडते म्हणजे नेमके काय होते माणसाचे व्यक्तिमत्व कसे तयार होते, व्यक्तिमत्त्वातील बदलासाठी काय प्रयत्न करावे लागतात,असे विविध पैलू त्यांनी विविध प्रतिमांचा वापर करून समजावून दिले.

दुसरा विषय 'मन उधाण वाऱ्याचे'. हा विषय लातूर येथील प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. वर्षा पाटील यांनी घेतला. यात त्यांनी विविध मानसिक आजारांची माहिती दिली. अनेक उदाहरणांसह स्पष्टीकरण देत अतिशय सोप्या शब्दांमध्ये अनेक आजार थोडक्यात समजावून सांगितले. सायकोसिस आणि न्यरॉसिस या दोन्ही प्रकारातल्या प्रमुख आजारांची माहिती त्यांनी अतिशय खुमासदार शैलीमध्ये श्रोत्यांना दिली. हा विषयदेखील श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून गेला. या विषयावरील प्रश्न उत्तरांमध्ये पण खूप रंगत आली. अनेक श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारले. अत्यंत सोप्या साध्या शब्दात वर्षा पाटील यांनी त्यांना उत्तरे दिली.

तिसरा विषय 'देव येतो अंगात खरं हाय का?' याची मांडणी लातूर येथील डॉ. मिलिंद पोतदार यांनी केली. मन आजारी पडणे, अंगात येणे, विशेषतः स्त्रियांच्याच अंगात येणे, विशिष्ट तारीख सण-उत्सवाच्या काळातच अंगात येणे याबद्दल त्यांनी तपशीलात माहिती सांगितली. त्यावरील उपचार, कुटुंबाची जबाबदारी, स्त्रियांचे सामाजिक स्थान याबद्दल देखील त्यांनी तपशीलात समजाऊन सांगितले.

चौथा विषय 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' हा डॉ. डी. बी. जोशी (नांदेड) यांनी घेतला. माणसाचं मन कसं आजारी पडतं, त्याला आत्महत्यांचे विचार कसे येतात, आत्महत्या हा मानसिक आजार कसा आहे, तो रोखण्यासाठी काय करावे, मनावरील ताण तणावाचे व्यवस्थापन कसे करावे, नैराश्य - भीती यावर मात कशी करावी, अशा पद्धतीने त्यांनी या विषयाची मांडणी करीत या विषयातील गांभीर्य श्रोत्यांना पटवून दिले. शेवटचा विषय 'कुछ तुम बोलो कुछ हम बोले' हा डॉ. अनिल डोंगरे, (आलिबाग) यांनी घेतला. समुपदेशन म्हणजे काय, समुपदेशकाने घ्यायची काळजी कोणकोणती, समुपदेशन कसे करावे, त्यातील तथ्य आणि पथ्य कोणती पाळावीत, समुपदेशकाकडे कोणकोणते कौशल्य असणे आवश्यक आहे, अशी बहुमोल माहिती विविध उदाहरणांसह डॉ. डोंगरे यांनी दिली. या व्याख्यानमालेने हे तर नक्कीच सिद्ध केलं की महाराष्ट्र अंनिसला या मानसिक आरोग्य क्षेत्रात भविष्यात मोठे काम उभे करावे लागेल. मा. डॉ. प्रदीप जोशी आणि चाळीसगाव (जि. जळगाव) येथील कार्यकर्त्यांच्या सहभागाने चाळीसगाव येथे 'शहीद डॉ नरेंद्र दाभोळकर मोफत मानसिक आजार उपचार केंद्र' सुरू केले आहे. गेली अनेक वर्ष विविध औषधांसह आपण हे काम मोफत सेवा या तत्वाने करीत आहोत. अशा स्वरूपाच्या विविध आघाड्यांवर आपल्याला या क्षेत्रात आता पुढे जावे लागणार आहे. यासाठी शेकडो प्रशिक्षित मानसमित्रांची फळी आपल्याला पूर्ण राज्यभर उभी करावी लागेल. ही व्याख्यानमाला त्या दिशेने टाकलेले एक दमदार

पाऊल आहे, असे मला वाटते.

विविध उपक्रम विभागाचे राज्य कार्यवाह अनिल करवीर, अतुल सवाखंडे, सचिन थिटे, कृष्णात स्वाती यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्यासोबत राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, राज्य सरचिटणीस नितीन राऊत, सोशल मीडिया विभागाचे अवधूत कांबळे त्याचप्रमाणे विविध जिल्ह्यांचे जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव, विविध उपक्रम विभागाचे जिल्हा कार्यवाह असे अनेक राज्य पदाधिकारी यात सहभागी होते. या सगळ्या साथींचे खूप खूप कौतुक आणि आभार.

■ ■ ■















# जागर विवेकाचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा



प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४ ७३७०२

दिनांक १९ जून ते २३ जून २०२१ दरम्यान महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे पाच दिवसीय नवीन कार्यकर्ता प्रशिक्षण Online व्याख्यानमालेचे Google meet वर आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी महाराष्ट्रभरातून १२४ लोकांनी नोंदणी केलेली होती. शिबिरामध्ये पहिल्या दिवसापासून नवीन कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला होता. एकूण १८० पर्यंत कार्यकर्ते उपस्थित होते. सरासरी १२४ लोकांनी पाच दिवस पूर्ण क्षमतेने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला. सदर व्याख्यानमाला रोज सायंकाळी सात ते रात्री नऊ पर्यंत आयोजिण्यात आली होती. या व्याख्यानमालेमध्ये पाच दिवस विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. 'वैज्ञानिक दृष्टिकोन एक जीवन आधार' यावर मा. किर्तीवर्धन तायडे, नंदुरबार, 'फलज्योतिष एक मायाजाल' या विषयावर डॉ. नितीन शिंदे इस्लामपूर, ' चमत्कार जनामनातील' या विषयावर प्राचार्य मच्छिंद्र मुंडे, नवी मुंबई, 'वेळीच ओळखा बुवाबाजीचा विळखा' या विषयावर माधव बावगे, लातूर आणि 'कायदे अंधश्रद्धा निर्मूलनाचे' या विषयावर ॲड. गोविंदराव पाटील, सोलापूर यांनी मार्गदर्शन केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी महा. अंनिसच्या विविध शाखेच्या कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. ऑनलाइन शिबिराचा हा प्रयत्न खूपच यशस्वी झाला. शंभरहून अधिक शिबीरार्थींनी संघटनेत सक्रिय राहण्याचा मानस नोंदवलेला आहे. यावरूनच संघटनेमध्ये सक्रिय राहण्याची तरुणाईची मानसिकता दिसून येते. ही मानसिकता ओळखून सदर शिबीरार्थींना संबंधित जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी संपर्क करण्यास सांगण्यात आले आहे. संघटनेचा विस्तार आणि शिबीर आयोजनाचा हेतू सफल झाल्याचे एक वेगळेच समाधान यानिमित्ताने मिळाले. शिबिर संयोजनाचे महत्त्वाचे काम प्राचार्य मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी केले. शिबिरार्थींच्या नोंदणीचे काम सारिका डेहनकर वर्धा, दिगंबर कट्यारे जळगाव, संजय बनसोडे इस्लामपूर, विजय परब मुंबई, आणि अनिल दरेकर लातूर यांनी अत्यंत तळमळीने केले.

■ ■ ■

# शाहू जयंती राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा



विशाल विमल
७२७६५ ५९३१८

**शाहूंचे बहुआयामीपण सांगितले २०८ वक्त्यांनी. जळगावचा सारांश सोनार राज्यात पहिला...**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विविध उपक्रम विभागाच्या पुढाकाराने विभागीय आणि राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या पश्चिम महाराष्ट्र, कोकण, खान्देश, अमरावती, मराठवाडा, नागपूर या सहा विभागात १८ ते २० जून २०२१ रोजी विभागीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. या प्रत्येक विभागात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविलेल्या १८ स्पर्धकांची राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा शाहू जयंतीच्या पूर्व संध्येला (२५ जून) घेण्यात आली. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या ऑनलाईन निकालाचा कार्यक्रम शाहू जयंतीदिनी (२६ जून) पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. सुभाष वारे होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र अंनिसच्या विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह अनिल करवीर यांनी स्पर्धेचा आढावा मांडला. परीक्षक डॉ. सुभाष वाघमारे, स्पर्धक सारांश सोनार, गायत्री देशमुख, धनश्री चिंचोळकर यांनी मनोगत व्यक्त केले. विशाल विमल यांनी स्वागत परिचय करून दिला. मनोज ढोमे, अवधूत कांबळे, सिद्धेश छाया, सुयश तोष्णीवाल यांनी तांत्रिक सहकार्य केले. हर्षल जाधव, आरती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. सरचिटणीस नितीन राऊत यांनी आभार मानले.

प्रा. सुभाष वारे म्हणाले की, 'वंचित, शोषित समाजाच्या विकासासाठी शाहू महाराजांनी संधीच्या समानतेचा आग्रह धरला, पण त्याचबरोबर विविध संधीही समाजासाठी निर्माण केल्या. आजचे राज्यकर्ते खाजगीकरण करत सुटले असून तरुणांसाठी शिक्षण आणि रोजगाराची संधी कमी करत आहेत. त्यामुळे राज्यकर्त्यांनी शाहू महाराजांचे संधी निर्माण करण्याचे तत्व अंमलात आणले पाहिजे. आरक्षण गरजेचे आहेच, पण आज खाणारे दहा जण आहेत आणि भाकरी एकच आहे. त्यामुळे ओढाताण होत आहे. सरकारने भाकरीची संख्या वाढवली पाहिजे. भारतीय संविधानाच्या कलम ४१ नुसार रोजगार आणि शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. त्यासाठी तरुणांनी सरकारचे लक्ष वेधले पाहिजे.' प्रा.प्रतिमा परदेशी म्हणाल्या की, 'जातीद्वेष मोडण्यासाठी गरजेच्या असलेल्या आंतरजातीय विवाहास पाठींबा देणारा कायदा राजर्षी शाहू महाराजांनी केला. असे विवाह घडवून आणण्याबाबतच्या

शाहू महाराजांच्या विचारांचा प्रचार झाला पाहिजे. शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहांना पाठींबा देणाऱ्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संस्थानात स्वतंत्र खाते निर्माण केले. स्वतःच्या चुलत बहिणीचा आंतरजातीय विवाह लावून दिला. संस्थानात शंभर आंतरजातीय विवाह लावण्यासाठी प्रयत्न केला. पण पाठयपुस्तकातील अभ्यासक्रमातून हे सांगितले जात नाही. त्यामुळे वक्त्यांनी शाहू महाराजांचे विचार समाजात पसरविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे", असेही प्रा. प्रतिमा परदेशी यांनी सांगितले.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक सारांश धनंजय सोनार (जळगाव - खान्देश विभाग) यांनी मिळविला. प्रथम क्रमांकासाठी २००० रुपये रोख, १००० रुपयांची पुस्तके, गौरवचिन्ह, प्रशस्तीपत्र असे बक्षिसांचे स्वरूप होते. समान गुण असल्याने द्वितीय क्रमांक दोन स्पर्धकांना विभागून देण्यात आला. विश्वजीत संजय शिंदे (नंदुरबार - खान्देश विभाग) आणि गायत्री देशमुख (अकोला - अमरावती विभाग) हे दोघे जण द्वितीय क्रमांकाचे विजेते ठरले आहेत. या दोन्ही स्पर्धकांना प्रत्येकी ८५० रु. रोख, ४०० रु. ची पुस्तके, गौरवचिन्ह, प्रशस्तीपत्र असे बक्षीस देण्यात आले. तृतीय क्रमांक देखील समान गुण मिळाल्यामुळे आनंद मधुकर मसलखांब (सोलापूर - प.महाराष्ट्र विभाग) आणि वैभवी विकास कडवडे (औरंगाबाद - मराठवाडा विभाग) या दोघांना विभागून देण्यात आला. त्यांना प्रत्येकी ७०० रुपये रोख, ३०० रुपयांची पुस्तके, गौरवचिन्ह, प्रशस्तीपत्र असे बक्षीस देण्यात आले. उत्तेजनार्थ पहिला क्रमांक सौरभ संजय पाटील (कोल्हापूर - प.महाराष्ट्र विभाग) यांनी मिळविला. उत्तेजनार्थ दुसरा क्रमांक अमर रमेश पवार (रत्नागिरी - कोकण विभाग) यांनी मिळविला. दोन्ही विजेत्यांना ३०० रुपयांची पुस्तके, प्रशस्तीपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी 'बहुआयामी लोकराजा राजर्षी शाहू महाराज' हा विषय देण्यात आला होता. प्रत्येक स्पर्धकाने सहा मिनिटे भाषण सादर केले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम डॉ. सुभाष वाघमारे (सातारा), राजेश राठोड (नागपूर), जयश्री चव्हाण (नवापूर) यांनी केले. राज्यस्तरीय स्पर्धेच्या संयोजनात महाराष्ट्र अंनिसच्या विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह अनिल करवीर, सहकार्यवाह अतुल सवाखंडे, महाराष्ट्र अंनिसचे सरचिटणीस नितीन राऊत, सरचिटणीस विनायक साळवे, सचिन थिटे, मनोज ढोमे, अवधूत कांबळे, सिद्धेश छाया, सुयश तोष्णीवाल, विशाल विमल, कृष्णात स्वाती, यश सीमा विजय, गजेंद्र सुरकार, किर्तीवर्धन तायडे, हर्षल जाधव, आरती नाईक, माधुरी झाडे, किरण वाळुंजे, स्वाती कृष्णात, तुळशीदास शिंदे आदी कार्यकर्ते सहभागी होते.

राज्याच्या सहा विभागांमध्ये झालेल्या ऑनलाईन विभागीय स्पर्धांमध्ये २१४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचा खुला गट असल्यामुळे या स्पर्धेत सर्व वयोगटातील स्पर्धक सहभागी झाले होते. ' बहुआयामी लोकराजा राजर्षी शाहू महाराज' हा विषय स्पर्धकांना दिला होता. या विषयावर प्रत्येक स्पर्धकाने सहा मिनिटे भाषण सादर केले. प्रत्येक विभागातील प्रथम क्रमांकासाठी एक हजार रुपये रोख, ५०० रुपयांची पुस्तके,

प्रशस्तीपत्र आणि गौरवचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी ७०० रुपये रोख, ३०० रुपयांची पुस्तके, प्रशस्तीपत्र आणि गौरवचिन्ह, तृतीय क्रमांकासाठी ५०० रुपये रोख, २०० रुपयांची पुस्तके, प्रशस्तीपत्र आणि गौरवचिन्ह असे बक्षिसाचे स्वरूप होते.

■ कोकण विभाग : या विभागात ४८ स्पर्धक सहभागी झाले होते. या विभागात प्रथम क्रमांक अमर रमेश पवार (रत्नागिरी), द्वितीय क्रमांक विवेक मधुकर वारभुवन (नवी मुंबई), तृतीय क्रमांक आर्या किशोर कदम (सिंधुदुर्ग) यांनी मिळविले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम आनंदराज रविंद्र घाडगे (रायगड), सुजाता सखाराम घाडीगांवकर (मुंबई), शंकर बळी (मुंबई) यांनी केले. या विभागाचा निकाल परीक्षकांच्या हस्ते जाहीर केला. या स्पर्धेच्या संयोजनात रुपेश शोभा शंकर (मुंबई), यश सीमा विजय (मुंबई), नाजुका सावंत (पनवेल), मनोज डोमे (मुंबई), किरण वाळुंजे (नवी मुंबई), सचिन थिटे (मुंबई), शितल अहिरे (नवी मुंबई), सुहास शिगम (रत्नागिरी), अच्युत देसाई (सिंधुदुर्ग), परेश ताठे (ठाणे), सिद्धेश छाया (पनवेल), राजेश देवरुखकर (ठाणे), नंदना (मुंबई), संदीप (रत्नागिरी), सचिन (रत्नागिरी), अमोल (ठाणे), नाजुका (पनवेल), गोस्वामी सर (पालघर) आदी कार्यकर्ते सहभागी होते, अशी माहिती मनोज ढोमे आणि यश सीमा विजय यांनी दिली. विशेष म्हणजे या विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या अमर रमेश पवार (रत्नागिरी) याने राजयस्तरीय स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला आहे.

■ मराठवाडा विभाग : या विभागात २७ स्पर्धक सहभागी झाले होते. या विभागात प्रथम क्रमांक प्रतिक्षा बळीराम मोरे (लातूर), द्वितीय क्रमांक मंदार गोविंद लटपटे (परभणी), तृतीय क्रमांक वैभवी विकास कडवडे (औरंगाबाद) यांनी मिळविले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम श्रीमती गीता कोल्हटकर (औरंगाबाद), श्रीमती अर्चीता सूर्यकांत म्हस्के (लातूर), केदार काळवणे (बीड) यांनी केले. प्रा.बसवराज कोरे (जालना), प्रा.गजानन कुटे (हिंगोली), आनंद बिराजदार (नांदेड), वासुदेव देशपांडे (औरंगाबाद), ॲड. अजय वाघाळे (उस्मानाबाद), बाबा हालकुडे (लातूर), प्रदीप चव्हाण (बीड), प्राचार्य विठ्ठलराव घुले (परभणी), भाऊ पठाडे (औरंगाबाद), दादासाहेब जंगले (जालना), माधव बावगे, तुळशीदास शिंदे, श्रीनिवास शिंदे, सुधाकर तट, सुधीर भोसले, अनील दरेकर, डॉ.दशरथ भिसे, दीपक खंडागळे, शहाजी भोसले, हरिदास तम्मेवार, हनुमंत मुंडे, अतुल बडवे, सुनील चोथमल, अमोल वाकळे आदी कार्यकर्ते संयोजनात सहभागी होते, अशी माहिती श्रीनिवास शिंदे यांनी दिली. या विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली वैभवी विकास कडवडे (औरंगाबाद) हिचा राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक आला आहे.

■ खान्देश विभाग : या विभागात ३३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या विभागात प्रथम क्रमांक सारांश धनंजय सोनार (जळगाव), द्वितीय क्रमांक प्रफुल्ल तोताराम माळी (धुळे), तृतीय क्रमांक विश्वजीत संजय शिंदे (नंदुरबार) यांनी मिळविले. परीक्षक म्हणून काम आशा लांडगे (नाशिक), जयश्री चव्हाण (नवापूर), बी.एम.भामरे (धुळे), सोपान बोराटे (भुसावळ)

यांनी केले. या स्पर्धेचा निकाल परिक्षक लांडगे, चव्हाण, भामरे, बोराटे, विनायक साळवे, दिगंबर कट्यारे, बलदेव वसईकर यांनी जाहीर केला. या विभागीय स्पर्धेच्या संयोजनात दिगंबर कट्यारे, बलदेव वसईकर, दीपक बाविस्कर, कल्पना चौधरी, सुशीलकुमार इंदवे, अशोक गवांदे आदी कार्यकर्ते होते, अशी माहिती दिगंबर कट्यारे यांनी दिली. विशेष म्हणजे या विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सारांश धनंजय सोनार (जळगाव) याचा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आला आहे. तसेच विश्वजीत संजय शिंदे (नंदुरबार) याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

■ पश्चिम महाराष्ट्र विभाग : या विभागात ४७ स्पर्धक सहभागी झाले होते. प्रथम क्रमांक सौरभ संजय पाटील (कोल्हापूर), द्वितीय क्रमांक आनंद मधुकर मसलखांब (सोलापूर), तृतीय क्रमांक शिवम संजय माळकर (कोल्हापूर) यांनी मिळविले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम डॉ. सुभाष वाघमारे (सातारा), स्मिता पाटोळे (सातारा), धर्मराज चावरे (सोलापूर) यांनी केले. या स्पर्धेचा निकाल समाजवादी नेते प्रा. सुभाष वारे, महाराष्ट्र अंनिसचे सरचिटणीस नितीन राऊत, परीक्षक डॉ. वाघमारे, पाटोळे, चवरे यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले. या स्पर्धेच्या संयोजनात विशाल विमल (पुणे), हर्षल जाधव (कोल्हापूर), कृष्णात स्वाती (कोल्हापूर), अनिल कांबळे (सोलापूर), अजय भालकर (सांगली), संजय भोसले (सोलापूर), रविराज थोरात (पुणे), महाराष्ट्र अंनिसचे प्रधानसचिव संजय बनसोडे, सरचिटणीस सुधाकर काशीद आदी कार्यकर्ते सहभागी होते, अशी माहिती विशाल विमल यांनी दिली. या विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला स्पर्धक आनंद मधुकर मसलखांब (सोलापूर) ह्याचा राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक आला आहे. तर राज्यस्तरीय स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक या विभागातील सौरभ संजय पाटील (कोल्हापूर) याने मिळविला आहे.

■ अमरावती विभाग : या स्पर्धेत १४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांक गायत्री देशमुख (अकोला), द्वितीय क्रमांक श्रीकृष्ण धुरंदर (बुलढाणा), तृतीय क्रमांक प्रतिक राजेश राऊत (अकोला) यांनी मिळविले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम डॉ. एकनाथ खेडकर (अकोला), प्रा. दया पांडे (अमरावती), अरविंद शिंगाडे (बुलढाणा) यांनी केले. या स्पर्धेच्या संयोजनात प्रवीण गुल्हाने, बबन कानकिरड, पी.एस. खंदारे, गजेंद्र सुरकार, प्रा. संजय तिडके, प्रदीप हिवाळे, सुरेश वरभे आदी कार्यकर्ते सहभागी होते. विशेष म्हणजे या विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या गायत्री देशमुख (अकोला) हीचा राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला आहे.


■ नागपूर विभाग : या स्पर्धेत ३९ स्पर्धक सहभागी झाले होते. प्रथम क्रमांक सौम्या सुधीर खंडाईत (भंडारा), द्वितीय क्रमांक अवंती उमेश सिंगनजुडे (भंडारा), तृतीय क्रमांक निखिल तुकेश्वर बनसोड (गोंदिया) यांनी मिळविले. या स्पर्धेत परीक्षक म्हणून काम राजेश राठोड (नागपूर), डॉ. बळवंत भोयर (नागपूर), डॉ. जयश्री संजय सातोकर (भंडारा) यांनी केले. या स्पर्धेच्या संयोजनात नागपूर जिल्ह्यातील गौरव

आळणे, संजय शेंडे, संजय भलमे, वर्धा जिल्ह्यातील सचिन मेश्राम, माधुरी झाडे, प्रकाश कांबळे, भंडारा जिल्ह्यातील युवराज खोबरागडे, आंबीलकर सर, गोंदिया जिल्ह्यातील बबन मेश्राम, चंद्रपूर जिल्ह्यातील पुंडलिक जाधव, गडचिरोली जिल्ह्यातील विलास निंभोरकर आदी कार्यकर्ते सहभागी होते.

■ ■ ■



# वटपौर्णिमा दिनानिमित्त...



कल्पना बोंबे
९२२०८ ४२८५९



दि २४/६/२०२१ रोजी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती शाखा रामटेकच्या वतीने, वटपौर्णिमेच्या दिनानिमित्त पंचायत समितीच्या टेकडीवर वड, आंबा, उंबर, पिंपळ, जांभूळ इ. वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जिल्हा महिला कार्यवाह अर्चनाताई मेश्राम, रामटेक शाखेचे शुभाताई थुलकर, सविताताई डोंगरे, आम्रपाली भिवगडे, दिपा चव्हाण इ. उपस्थित होते. सुरुवातीला संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच नववधू सविता डोंगरे यांना वडाचे रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.



वटपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर आणि राजर्षी शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कल्याण शाखेतर्फे पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण कार्यक्रम शनिवार दिनांक २६ जून २०२१ रोजी नेतवली टेकडीवर राबविण्यात आला. कल्याण-डोंबिवलीचे शाखेचे अनेक कार्यकर्ते सदर कार्यक्रमास उपस्थित होते. 'समता संघर्ष' संघटनेचे प्रमुख आणि महा अंनिसचे हितचिंतक शैलेश दोंदे तसेच पुरोगामी विचारमंचचे महाराष्ट्र अध्यक्ष बंडू घोडे उपस्थित होते. यावेळी पळस, जांभूळ, सीताफळ, साग, बांबू, बकुळ इ. झाडांची रोपे लावण्यात आली. अविनाश पाटील यांनी आंघोळीची गोळी, खिळेमुक्त झाड या उपक्रमांची माहिती दिली. तसेच त्यांनी, संकलित केलेल्या आणि नुकतेच प्रसिद्ध झालेल्या वृक्ष-कवितांच्या पुस्तकाची माहिती दिली. रोपे लावून थांबायचे नाही, तर रोपे जगविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी रोपांना पाणी घालणे, त्यांची निगा राखणे ही कामे करण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या स्वप्नातील कार्यकर्ता आणि संघटना



संदेश बालगुडे
९८९२९ ८९२७०

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती म्हणजे संक्षिप्त रुपात झालेलं अंनिस आणि अंनिस म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोळकर! संघटना आणि संस्थापक एकमेकांसाठी समानार्थी शब्द होणे हे खुप कमी ठिकाणी घडते. आणि पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीत तर ही गोष्ट दुर्मिळच. (असे असणे हे त्यांना वैयक्तिक मान्य नव्हते, असं मानण्याच्या मानसिकतेला ते "सरंजामशाही मानसिकता" असे म्हणतात.) पण अशा अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी सहजशक्य म्हणजेच डॉ. नरेंद्र दाभोळकर. डॉक्टरांच्या निधनानंतर अनेक मान्यवर, विचारवंत, साहित्यिक, संपादक यांनी डॉक्टरांच्या संघटनकौशल्याविषयी वेगवेगळे पैलू आपल्यासमोर मांडलेत. ते महत्वाचे आहेतच. पण डॉक्टरांची मते याबाबत काय होती? त्यांनी संघटना किंवा कार्यकर्ता कसा असावा, याबद्दल काही सविस्तर लिहलेलं आहे असं नाही.

संघटना डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांच्या नावे ओळखली जावी एवढं कर्तृत्व असूनही, डॉक्टर या गोष्टीकडे कसे वळले किंवा संघटना काढावी असे त्यांना का वाटले? यावेळी अनेकांना असे अपेक्षित असते कि, अंधश्रद्धेचा परिणाम असलेला एखादा प्रसंग त्यांच्या किंवा त्यांच्या जवळच्या कोणाच्या आयुष्यात घडला असेल, तर तसेही काही घडलेले नसताना. डॉक्टरकीचा व्यवसाय १२ वर्ष केल्यानंतर, अंतरीची काहीतरी करण्याची उर्मी गप्प बसू न दिल्याने ते इकडे वळले. बी. प्रेमानंद यांचा चमत्कार सत्यशोधनाचा दौरा यशस्वी ठरला, त्याचे आयोजन राष्ट्रसेवादलाने केले होते. हे काम पुढे सुरु ठेवावे अशी सुचना डॉ. दाभोळकर यांनी केली होती, जर ती स्विकारुन राष्ट्र सेवा दलाने काम सुरु ठेवले असते तर डॉ. दाभोळकर तिथे असतेही किंवा नसतेही. सुरुवातीला श्याम मानव यांच्यासोबत ते काम करत असताना, संघटनेत श्याम मानव यांचा प्रभाव होता. श्याम मानव पूर्णवेळ कार्यकर्ता होते. डॉक्टर म्हणतात," मी या चळवळीत भाषणे देवू लागलो. विशिष्ट शिस्तीची मला सवय होती. मी चळवळीत श्यामला प्रतिस्पर्धी होतोय व आपल्यावर दाभोळकरांचे आक्रमण होतयं असं त्याला पहिल्या एकदोन वर्षातच वाटू लागलं असावं, त्याची प्रचिती १९८७च्या शांतीवन-पनवेल येथील शिबिरात आली. या शिबिरात माझ्यावर टिका झाली, त्यानंतर १९८९ च्या मे मध्ये शांतीवन येथेच अंनिसची खास बैठक झाली. या बैठकीला श्याम मानव व मनोविकास प्रकाशनचे पाटकर मुंबईहून आले होते. मी संघटनेतून बाजूला व्हावे यासाठी श्याम आक्रमक झाला. कार्यकर्ते संभ्रमित झाले. मी ठिक आहे असे बोलून शांत राहिलो. पनवेलहून बस यायला अवकाश होता, म्हणून एका

खोलीत शांतपणे झोपून राहिलो. पाटकरना माझ्या विरोधात गदारोळ होऊन मी शांत कसा? याचे आश्चर्य वाटले. यानंतर पुण्यातील कार्यकर्त्यांची बैठक झाली, त्यावेळी पुण्याचे युनिट जोरात होते. त्यांनी मी चळवळीचे कार्याध्यक्षपद स्विकारावे असा आग्रह धरला. दोन वर्ष हे काम करावे व चळवळ पुढे जात आहे असा अनुभव आला तर हे काम पुढे चालवा असा विचार झाला. नंतर मी जोमाने कामाला लागलो. पनवेल येथेच १९९१ ला जी बैठक झाली त्यात ३०कार्यकर्ते हजर होते. याच बैठकीत बार्शीचे पां. न. निपाणीकर व डोंबिवलीचे प्रा. मुंडे यांची कार्यकारीणीत निवड झाली. मधल्या काळात १० ते १२ ठिकाणी समितीचे काम सुरु झाले होते. त्यानंतर आतापर्यंत समिताचा जो पसारा वाढला तो तुम्हाला माहितच आहे." (संदर्भ मुलाखत, अंनिवा दिवाळी अंक२०१०, द्विदशकपूर्ती) यात पुन्हा डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे दोन वेगळे पैलू मला दिसतात, संघटनेतून बाजूला काढले जावूनही ते गाडीला वेळ होता म्हणून शांतपणे झोपी जावू शकतात, पाटकरांनाच काय, आपल्या सर्वांना प्रश्न पडू शकतो कि, हे एवढे शांत कसे, याचे उत्तरही त्यांनीच देवून ठेवले आहे,"तुम्ही भावनिक कोरडेपणा म्हणा हवे तर, पण मला कशाचाच अती आनंद होत नाही व कशाचेच जास्त दु:खही होत नाही." हि गोष्ट सहजासहजी जमण्यासारखी नाहीच. डॉक्टर दाभोळकर, त्याचा संबध त्यांच्या खेळाडू असण्याशी जोडतात. आयुष्यातील तारुण्यातील २०/२५ वर्षाचा काळ ते कबड्डी, खो-खो सारखे खेळ खेळत होते. त्यातून यश-अपयशाचे हिंदोळे ते पचवायला शिकले असावेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, श्याम मानवांपासुन वेगळे होण्याचा प्रसंगही ते तटस्थपणे सांगतात, त्यांची सारखी सारखी वाच्यताही करत नाहीत. किंवा त्याबाबतची स्वत:ची बाजूही मांडत नाहीत. झालं ते असं झालं आणि त्यातून ते पुढे काम करत राहिले. पण या वादग्रस्त बाबीचा त्यांनी उल्लेख टाळलेलाच दिसतो.

अनेक ठिकाणी डॉ. दाभोळकरांनी वेळोवेळी संघटना किंवा कार्यकर्ते याबाबत चिंतनात्मक लेख लिहलेले आहेत. त्यांचे लेखन आपल्याला नेहमीच मार्गदर्शक ठरत आलेलं आहे. "तिमिरातून तेजाकडे" मध्ये असलेल्या "हे सारे येते कुठून?" नावाच्या लेखात, त्यांनी असाच आढावा घेण्याचा प्रयत्न केलाय. "या सर्व बाबतीत संघटनेने थोडे प्रयत्न केले हे सत्य आहे, परंतु आखीव रेखीव प्रशिक्षण, शिस्तबद्ध कॅडर बांधणी, काही विशेष प्रलोभने असे काहीही संघटनेने केले नाही, तरीही हे घडून आले हे खरे आहे." "शिस्तीची बाब घेऊ, समितीची संघटनात्मक शिबिरे होतात, त्यात कार्यकर्त्यांने कसे वागावे हे सांगितले जाते, कार्यकर्ता संघटनेत आपल्याहून जुन्या असलेल्या कार्यकर्त्यांचे वर्तनही बघत असतो, तो आपापसात चर्चाही करत असेल; परंतु समितीची संघटनात्मक बांधणी बरीचशी मोकळी-ढाकळी आणि काहीशी विस्कळीत आहे. अशा संघटनेला नेहमीच शिस्तीचे प्रश्न भेडसावण्याचा धोका असतो. समितीला तसा धोका कधीही झालेला नाही, समितीचे राज्य पातळीवरचे सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तीत व वेळेत पार पडतात. अशा कार्यक्रमांत अनेकदा अनपेक्षित अडचणी येतात, तर कधी

कार्यक्रमाच्या अतिरिक्त माऱ्यामुळे शारीरिक, मानसिक थकवा येतो. अशावेळी शिस्तीचा कस लागतो आणि याबाबत संघटना कसाला उतरली आहे."

"कोणत्याही चळवळीला आर्थिक आधार लागतोच; पण अंनिससारख्या प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्या चळवळीच्याबाबत तो मिळणे अधिक अवघड असते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी एका विशिष्ट उपक्रमासाठी दीर्घकाळ मदत दिली. मात्र अंनिसला प्रामुख्याने दिवाळी अंकातील जाहिरातीतूनच व देणग्यांच्याद्वारे निधी मिळत राहिला आहे. अशा अस्थिर स्त्रोतांवर अवलंबून राहून चळवळ चालवणे हे अवघड आहे. कोणत्याही गोष्टीचे आर्थिक बाजू “आ"करुन उभी असतेच, याबाबतीत दोन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. एक तर अंनिसकडे जवळपास पूर्णवेळ कार्यकर्ते नाहीतच. बहुसंख्य कार्यकर्ते स्वतःचे कुटुंब व स्वतःचा व्यवसाय सांभाळून तीन नंबरच्या प्राधान्यक्रमाने समितीचे कार्य करतात आणि ते घरचे खाऊन या लष्कराच्या भाकऱ्या भाजतात. अंनिसची शाखा चालवण्यासाठी कोणालाही, कसलीही मदत मध्यवर्ती कार्यालय देत नाही. स्वतःचे पैसे स्वतः उभारावेत व खर्च करावेत अशीच कल्पना आहे व त्याची अमंलबजावणी होते. राज्यकार्यकारिणी वर्षातून तीन वेळा होते. अत्यंत नियमाने कार्यकारिणी सदस्य येतात, अपवाद वगळता त्यापैकी कोणी प्रवासखर्च घेत नाही. संघटनेचे स्वतंत्र कार्यालय नाही. येथील एकुण यंत्रणेसाठी नियमित क्लार्क, शिपाई, जागा अशी व्यवस्था नाही. (त्यामुळे अडचण होते; परंतु तरीही सर्वसाधारण काम ठिक चालते.) ही संघटनापद्धती हा झाला एक भाग. दुसरा भाग म्हणजे समितीला कामासाठी हवा तेवढा पैसा दरवर्षी देणग्यांतून व जाहिरातीतून निश्चितपणे उपलब्ध होतो. लोकांना चळवळ हवी आहे याची ही खूण आहे, असेच मी मानतो."

"संघटना म्हंटली की, मतभिन्नता आली, व्यक्तीगत राग- लोभ आले, हेवेदावे, स्पर्धा, असूया हे सगळे मानवी दुर्गुणही आले. जेथे माणसे आहेत, तेथे हे सारे असणारच; परंतु यामुळे आपल्या कामाला आणि म्हणूनच आपल्या शाखेला जिल्ह्यातील आपापसातील वादाचे ग्रहण लागू नये हा शहाणपणा, समंजसपणा दाखवण्याची गरज असते. ही बाब समितीमध्ये राज्य पातळीवर जवळपास साध्य झाली आहे. कोणत्याही संघटनेच्या राज्याच्या कार्याध्यक्षाला जी कामे करावी लागतात, त्यामध्ये शाखांमध्ये निर्माण झालेल्या मतभेदाची आग विझवण्यासाठी फायर बिग्रेडचे कामही करावे लागते. मला अशीवेळ जवळपास आलेली नाही”

"समितीचे कार्य हे मूलतः वैचारिक क्षेत्रातील आहे. या क्षेत्रातील लोकांचे स्वतःच्या विचाराचे आग्रह तीव्र असतात. त्यातही कार्यकर्ते बनले की ते आणखी कडवे बनतात. अशावेळी निर्णयप्रक्रिया अवघड बनते. सर्वांचे समाधान शक्य नसते. मतदानाने बहुमत ठरवता येते, पण मनभेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. असे घडले नाही तर संघटना चालवणे ताणाचा भाग बनतो, बनू शकतो. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यकार्यकारणी बैठका अत्यंत नियमाने

प्रत्येक चार महिन्यांनी होतात. गेल्या २०वर्षात अशा साठ बैठका झाल्या. चर्चा, वादविवाद भरपूर झाले. मतभिन्नता प्रकट झाली; परंतु वीस वर्षातील एकमेव अपवाद वगळता समितीतील सर्व निर्णय बहुमताने नव्हे तर एकमताने झाले. जे अल्पमतात होते त्यांनी कधी मतविभाजनाची मागणी केली नाही; मग बैठकीतून वॉकआऊट करणे तर दूरच राहिले. सर्व निर्णय सहमतीने, ही प्रक्रिया मोठी ताकद ठरली आहे."

संघटनेत सर्व काही आलबेल आहे, छान छान चालू आहे, शिस्त चोख आहे, आर्थिक ताण नाही, जातीय विचाराला दूर ठेवले आहे, गटबाजी नाहीच, प्रसिद्धी योग्य अथवा भरपूर मिळत आहे. असे गोड गुलाबी चित्र रंगवण्याचा हेतू अजिबात नाही. कुणाच्या मनात तशी भावना आल्यास ती दूर करावी. खरे तर हे लेखन हा अनुभवाच्या वास्तवाच्या , आधारे केलेले एक प्रकट चिंतन आहे. चिंतनात मला पडलेला मुख्य प्रश्न हा आहे कि, विशेष असा कोणताच प्रयत्न न करता समितीला या गोष्टी मर्यादित अर्थाने का होईना कशा साध्य झाल्या? याचे उत्तर मला सापडत नाही, विचार करताना एवढेच वाटते कि, प्रत्येक व्यक्तीत स्वाभाविक विवेकवृत्ती असते, संवेदनाशीलता असते. स्वतःला पटणाऱ्या कामासाठी जोडून घेण्याची ओढ असते. अंनिसबाबत आणखी एक गोष्ट घडलेली असावी. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार हा लोकप्रिय विचार नाही. उलट वादग्रस्त विषय आहे. कुटुंबिय, आप्तेष्ट, मित्र यांच्यासोबत असलेले संबंध हा विचार स्विकारल्यावर अनेकदा ताणाचे बनतात, व्यक्ती स्वतःच्या प्रेरणेला स्मरुन विचारावरची निष्ठा अभंग ठेवते; पण आतून तिला एकटेपण जाणवत असते. अंनिस हा अशा एकट्यांचा तयार झालेला जथा आहे. यामुळे हा जथा जिवंत सक्षम ठेवणे ही त्या जथ्यातील प्रत्येकाची आंतरिक गरज आहे. त्यातून मग शिस्त आपोआप येते. खरच, जात, गटतट हे विचार आपोआप बाजुला पडतात. व्यक्ती म्हणून स्वतःमध्ये असलेल्या उणिवा संघटनेच्या वाट्याला येवू नयेत यासाठी व्यक्ती प्रामाणिकपणे धडपडते. अर्थात हे झाले माझे मत. वाचकांना काय वाटते? हे सारे कुठून येते? मी समजून घ्यायला उत्सुक आहे."

(संदर्भः हे सारे कुठून येते? तिमिरातून तेजाकडे)

अंधश्रद्धा निर्मूलन हा तसा नाजुक विषय आहे.आणि चिकित्सा केली तर, त्या गोष्टीमध्ये ज्यांचे हितसबंध गुंतले आहेत अशा लोकांनी नको ते, आणि काही हिणकस आरोप त्यांच्यावर केले. याबाबत डॉक्टर म्हणतात माझी भुमिका अशी आहे की, मी टिकेला उत्तर देत बसत नाही. आरोप-प्रत्यारोपाच्या गदारोळात जात नाही. विचारविरोधकांच्या टिकेला जेवढ्यास तेवढे उत्तर देतो आणि विषय सोडून देतो. अनेकदा अब्रु नुकसानीचा खटला सहज घालता येईल असे आरोप असतात. मी ते काही करत नाही, चळवळ कोर्टकचेऱ्यात नेवू नये असे माझे मत आहे. समविचारी मानले जाणारे मित्र वा संघटना ज्या टीका करतात, त्यांवर तर मी "ब्र" ही उच्चारत नाही, हे माझे वागणे बरोबर का चूक, मला माहित नाही. पण एक नक्की कि, या प्रत्युत्तरात न पडल्याने माझा कधीही तोटा झालेला नाही, माझे असे मत बनले आहे कि, प्रदिर्घ वाटचालीनंतर लोकमानसात

तुमच्याबद्दल एक प्रकारची मान्यता तयार झालेली असते. शेरेबाजी पद्धतीच्या भडक आरोपांतून त्याला धोका पोहोचत नाही. तर आपल्या कार्यकर्त्यांच्या वागण्याबाबत ते एक मूलमंत्रच सांगतात..

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य का करायचे याबाबत मी सहकाऱ्यांना सतत सांगत असतो कि-'कृपया, समाजाचे देणे लागते वगैरे वगैरे गोष्टीसाठी अजिबात काम करु नका. डोक्यावर भलती ओझी घेऊ नका. काम करताना निखळ आनंद वाटावयास हवा, तरच आणि तोपर्यंतच कामात राहा' आणि कार्यकर्त्यांना विवेकी आचरण सुचवताना डॉ. दाभोळकर म्हणतात कि.. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात कार्यकर्त्यांवर एक दुर्बीण सतत रोखलेली असते ती म्हणजे- तुम्ही वागता कसे? कथनी आणि करणी यात अंतर नसावे. हे योग्यच आहे; परंतु "बोले तैसा चाले" अशी वंदनीय पावलेही समाजात कमीच असणार, एक चळवळ म्हणून आमची संघटना आणि एक व्यक्ती म्हणून मी या दिशेने चालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो, असे मला वाटते. आमची खरी ताकद ही संघटनेच्या या चारित्र्यात लपलेली आहे. समितीचे कार्यकर्ते बोलतात तसेच वागण्याचा प्रयत्न करतात, अशी कार्यकर्त्यांबद्दल लोकधारणा आहे. हे कार्यकर्त्यांना आणि मला पूर्णांशाने जमत नाही, हे खरेच आहे, पण जास्तच जास्त आचार हा विचारांशी सुसंगत असावा, असा आमचा प्रयत्न असतो..."

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना मानणारे माझ्यासारखे चळवळीतील नवोदित कार्यकर्ते असतील, किंवा चळवळीबाहेरचे, अनेक जणांना डॉक्टरांच्या एका पैलूने भुरळ घातलेली गोष्ट म्हणजे, त्यांनी स्वःतहून कार्याध्यक्षपद सोडणे. अगदी विचारपूर्वक त्यांनी हा निर्णय घेतलेला होता. घराणेशाहीला नावे ठेवणारांना देखील हे जमलेले नाही. याबाबतीत डॉ. दाभोळकरांची भुमिका अशी होती की, ".....संघटनेच्या स्थापनेपासून मीच कार्याध्यक्ष आहे आणि ते कार्याध्यक्षपद सोडण्याचा निर्णय मीच गेले ३वर्षे जाहीर करत आहे. माझ्यासारखी मान्यता कदाचित आणखी कोणाला केवळ या पदामुळे लाभेलच असे नाही, अशीही शक्यता आहे. त्यासाठी आम्ही संघटनेतल्या पाच ज्येष्ठ कार्यकर्त्यांची कार्यकारी समिती बनवली आहे. संघटनेचे सर्व निर्णय त्यांच्यासह आम्ही ठरवतो. जादूटोणाविरोधी कायदा मंजूर झाल्यानंतर मी कार्याध्यक्षपद सोडावे, असे संघटनेत ठरले, त्याला दिड वर्षे झाले. त्यावेळी कायदा होणे लांबणीवर पडत जाईल असे वाटले नव्हते. पण ते लांबणीवर पडत गेले आणि माझा कार्याध्यक्षपदाचा कालावधी लांबत गेला, अर्थात पदाशिवायही मी सदैव कार्यरत राहीनच." याबाबतीत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम वाढू नये म्हणून त्यांनी "मी कार्याध्यक्षपद सोडले!" या नावाचा लेखच लिहला. इथे "सोडले" हा शब्दच खुप काही सांगून जातो. कायद्याची लांबलेली लढाई आणि कार्यकारी समितीची नवीनच निर्मिती यामुळे हा निर्णय लांबणीवर पडला तरीही, कार्यकारी समितीमुळे संघटना बांधणीच्या कामात अधिक सुसूत्रता निर्माण झाली. अर्थात ही समिती राज्यकार्यकारणीला उत्तरदायी आहे आणि राज्यकार्यकारणी संघटनेला उत्तरदायी. या निर्णयावर डॉ. दाभोळकर म्हणतात,"

अविनाश पाटील यांनी या काळात आपली संघटनात्मक बांधणीची गुणवत्ता सिद्ध केली. कार्यकारी समितीच्या यंत्रणेनेही आपली जबाबदारी चांगल्या प्रकारे घेतली, ही सर्वच बाब माझ्या दृष्टीने अनुकूल होती. तरीही या निर्णयाचा अनेकांना सुरुवातीला धक्का बसला याचे कारण आपल्या सामाजिक मानसिकतेत आहे. ज्याची लागण काही प्रमाणात संघटनेलाही झाली होती. आपल्या समाजाला अशी सवय आहे कि, त्याला संघटनेपेक्षा व्यक्ती लवकर भावते. व्यक्तीच्या नावाने तो संघटना ओळखू लागतो.संघटनेच्या संस्थापकात कर्तृत्व असेल तर त्यांना याचा फायदा मिळतो. कारण संघटनेची पाटी कोरी असते. मग संघटना आणि ती व्यक्ती यांचे द्वैत तयार होते. जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू, **खरे तर ही काहीशी सरंजामशाही मानसिकता आहे....हे योग्य नव्हे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारख्या विवेकी चळवळीने हे ओळखले पाहिजे.** या व्यवस्थेतील फायदे संघटनेला मिळत राहतील, असे पाहत त्यातील दोषांवर मात करण्याचे कौशल्य दाखवले पाहिजे. कार्याध्यक्ष बदलून संघटना म्हणून ते आपण दाखविले आहे.

तरुणांच्याकडे कामाची धुरा सोपवली पाहिजे असे सतत बोलले जाते पण त्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे व संधी देणे या बाबींचा मात्र बहुधा विसर पडतो. त्यामुळे कर्तृत्ववान तरुणही त्यांच्या क्षमता पूर्णपणे प्रकट करु शकत नाहीत. अविनाशकडे संघटना चालविण्यासाठी आवश्यक ते कर्तृत्व, कौशल्य, मान्यता आहे. शिवाय तो माझ्यापेक्षा २५ वर्षांनी लहान आहे. याचा प्रचंड फायदा त्याला व संघटनेला आहे. दुसरे म्हणजे भुमिका कोणती महत्त्वाची नाही; संघटना महत्वाची. संघटनेतील पदासाठी वखवखलेल्या माणसांचा हा जमाना आहे. आपल्या संघटनेत सत्ता, पैसा नाही, त्यामुळे त्या अर्थाने पदाचा फायदा काय? पण तरीही संघटनेला आता प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. संघटनेच्या पदामुळे मान्यता प्राप्त होते. स्वाभाविकच ते पद गेल्यावर ती मान्यता कमी होण्याची भितीही मनात डोकावते. आज महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला याची बाधा नाही, पण आजूबाजूचे वातावरण प्रदूषित आहे. धोका होवू शकतो. या विरोधात प्रभावी प्रतिबंधक लस म्हणजे, 'संघटनेतील पद ही जाणारी बाब आहे.' ही गोष्ट सर्वांनी सदैव ध्यानी ठेवायची. संघटनात्मक चलनवलन गतिमान होणे, नवे नेतृत्व पुढे येण्याची प्रक्रिया सर्व थरात घडून येणे. हे यापाठोपाठ घडून यावयास पाहिजे. नव्या रक्ताची कदर व्हावयास हवी आणि त्या रक्ताने जुन्यांच्या कामाबद्दल, त्यागाबद्दल आदर करावयास हवा...आणखी एक सूचना आली ती अशी की, 'संघटनेत संघटनेच्या संरचनेच्या बाहेर पर्यायी सत्ताकेंद्र उभे राहू नये.' ही सूचनाही मोलाची आहे. अन्यथा प्रसारमाध्यमे, संघटनेतील कार्यकर्ते पूर्वीप्रमाणे मलाच विचारत राहिले असते आणि ते योग्य ठरणार नाही. त्यामुळे असाही निर्णय झाला की, संस्थापक-कार्याध्यक्ष या नात्याने मी कार्यकारी समितीत कायम निमंत्रित राहावे. यामुळे वरील अडचण उद्भवणार नाही, एका गोष्टीचे समाधान जरुर आहे, ते असे की, आपल्या चळवळीत तरुण आहेत. ते नेतृत्व देण्याएवढे समर्थ आहेत. त्यांना पुढे आणण्याएवढी संघटनेची मानसिकता पक्व व कार्यक्षम आहे.

■ ■ ■

(अंनिवा, जुलै २०१०)

हे सर्व वाचताना एक लक्षात येते की, डॉ. नरेंद्र दाभोळकर हे रसायनच वेगळे आहे. त्यांच्याच भाषेत बोलायचे तर, मी नियोजनपूर्वक काही केले नाही, पण केले ते प्रामाणिकपणे..! हा प्रामाणिकपणा माणसाला वेगळ्या उंचीवर घेवून जातो. अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि तिची ध्येयधोरणे, किंवा एखाद्या प्रसंगाचा खोलवर परिणाम म्हणून चळवळीत न येता, ते या चळवळीत आले. 'मतभेदाच्यावेळी कोणतीही खळखळ न करता बाजूला झाले,' त्या प्रसंगाचा किंवा त्यावेळी असणाऱ्या त्यांच्या बाजूविषयी त्यांनी वाच्यता केली नाही. आरोप-प्रत्यारोप तर दूरची गोष्ट, त्यानंतर स्वतःच तयार केलेल्या संघटनात्मक रचनेच्या कार्याध्यक्षपदावरुन बाजूला झाले आणि एक कार्यकर्ता म्हणून सतत कार्यरत राहिले.

या गोष्टीबाबत पुस्तक/लेख याविषयी काही माहिती मिळवण्यासाठी साथी विनायक सावळे यांच्याशी बोलणे झाले असता, विनायक यांनी डॉं नरेंद्र दाभोळकर यांच्या वेगळ्या पैलूचा उल्लेख केला, तो असा कि, डॉ. दाभोलकर कार्यकर्त्यांचे गुण, त्याची कौशल्ये हेरायचे. आणि त्या-त्या प्रकारे त्यांना कामाची जबाबदारी द्यायचे. नुसतीच जबाबदारी द्यायचे नाही तर तसे अधिकारही द्यायचे. म्हणजे प्रत्येक कार्यकर्त्यांला आपण संघटनेसाठी काही खास आहोत हा "फिल" द्यायचे. हि नेतृत्वगुण म्हणून मोठीच गोष्ट आहे. आणि डॉक्टरांनतर त्यांच्या साथीनी ही गोष्टही वारसा म्हणून सुरु ठेवलेय. कार्यकर्ता किंवा अंनिसचा हितचिंतक म्हणून आपण काय काय करु शकतो. यावरील त्यांनी दिलेल्या प्रश्नाचे उत्तर सांगून या लेखाची सांगता करतो. या उत्तरावरुनही लक्षात येते कि, डॉ. दाभोळकर किती बाजूनी विचार करायचे. प्रश्न असा कि,"दाभोळकर, अडचण अशी आहे कि, मी तुमच्या मताचा आहे, पण घरात कुणालाच माझं पटत नाही, जर घरात आपण समजून सांगू शकत नाही, तर उगीच जगाला सांगण्यात काय अर्थ आहे?...लक्षात घ्या, अर्थ आहे! तुमचे आई-वडील, नवरा-बायको, भाऊ-बहिण यांना सुधारण्याच्या भानगडीत पडू नका. तुम्ही स्वतःला बदलू शकता कि नाही? बदलाचे सहा टप्पे आहेत- विचार, उच्चार, प्रसार, संघटन, आचार आणि संघर्ष. मला माहित आहे कि, तुम्ही आचार आणि संघर्ष करु शकत नाही, ते करुच नका. तुम्ही योग्य विचार कराल कि नाही? तो बोलाल कि नाही? त्याचा प्रचार कराल कि नाही? आणि जमलचं तर संघटनेत याल कि नाही? म्हणजे तुम्हाला जर असे वाटले कि, "होय, या देशामध्ये जातनिरपेक्ष आणि धर्मनिरपेक्ष समाज अस्तित्वात यायला आंतरजातीय लग्नं व्हायला पाहिजेत"(तुमच्या घरातल्यांची लग्न आंतरजातीय करायला सांगत नाही), तर हे बोलाल कि नाही? नुसता योग्य विचार पटला, तर बोला. जमलं, तर प्रचार करा. त्याच्यापुढे जमलं तर आमच्या संघटनेत या. आपण सगळे मिळून काम करु. कारण सगळ्या परिवर्तनाची सुरवात विचारबदलापासून होते. विचाराला ज्या वेळी मूल्यांचा आशय मिळतो, त्यावेळी आपण त्याला विवेक म्हणतो, आणि अंनिसचं दुसरं नाव "समाजाचा विवेक वर्धिष्णू करणारी चळवळ" असं आहे.

■ ■ ■

## भय



एकनाथ पाटील
९४२१२ ८५०८२

मी लिहायला बसतो कविता रात्री- अपरात्री
तशी ती छळत असते मला खूप खूप आतून
कितीतरी दिवस , महिने आणि वर्षांपासून...
तिचे माझ्याशी आणि
माझे तिच्याशी नाते अटळ.

अस्वस्थता टोकाला गेल्यावर
मी जेव्हा बसतो लिहायला एकांतात
तेव्हा एकांत हा भास असतो नुस्ता.
माझ्यासमोर उभी असते झुंड डोळे वटारुन,
माझ्यासह माझ्या कवितेवर नजर रोखून.

तिला तपासायचे असते 'पाणी'
माझ्या कवितेतल्या संदर्भांचे
आणि त्यामागचे 'त्यांच्या' सोयीचे तपशील
सोयीच्या विश्लेषणासहित.
त्यांच्या टोकदार भावनांचे टोकदार भाले
माझ्या दिशेने करून
झुंड उभी असते
माझ्या जगण्याच्या भोवतालात
आणि मग जाताच येत नाही मला
माझ्या कवितेच्या जगात.

झुंड नसली दिसत डोळ्यांना
तरी तिचा धाक जाणवतो सर्वत्र क्षणाक्षणाला
ती वावरत असते
माझ्या जगण्याच्या पसाऱ्यात
वेगवेगळ्या रूपात
धर्मांच्या, अस्मितेच्या झुली पांघरून
झुंडीला नसतो चेहरा
तरी तिची दहशत जाणवते

...आणि मी मात्र गातो साने मास्तरांचे गाणे
' खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'

विवेक दुखावण्याऐवजी
भावना दुखावण्याच्या या संशयास्पद काळात
मला माझ्याच कवितेची
खूप भीती वाटू लागते
आणि राहून जाते लिहायची कविता
मरून जाते कविता मनातल्या मनात.
तिच्याशिवाय मी आणि माझ्याशिवाय ती
आम्ही जगू शकत नाही एकमेकांशिवाय
आणि म्हणून सांप्रत काळात
मला कळत नाही
काय करायचे
मनात उगवणाऱ्या या कवितेच्या झाडाचे?

...आणि आता आताशा मला भय वाटते
माझ्यातल्या कवीच्या मरून जाण्याचे.

■ ■ ■

- सदरचा अंक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आला आहे.
- अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेसाठी लेखन साहित्य युनिकोड फाँटमध्ये टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे.
- लेखकाने स्वत:चे नाव, मोबाईल नंबर व इमेल बिनचूक नमूद करावा.
- लेखन साहित्यासोबत लेखातील आशयाला समर्पक दोन फोटो आणि स्वत:चा फोटो पाठवावा.
- समताधिष्ठित समाजरचनेला पोषक भूमिका मांडणाऱ्या दर्जेदार साहित्याचे स्वागत आहे.
- लेखकांनी आपले लेखन शक्यतो प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे.
- अंकासाठी साहित्य ९९२०१ २८६२८ या व्हाटस् ॲप नंबरवर अथवा manspatrika@gmail.com या इमेलवर पाठवावे.
- तूर्त अंक ऑनलाईन पाठवण्यात येईल.
- ऑनलाइन अंक निशुल्क असेल. छापील अंकाच्या वर्गणीचे स्वरुप यथावकाश कळविण्यात येईल.
- छापील स्वरुपातील अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्यांनी ७२७६५५९३१८ या व्हाटस् ॲप नंबरवर पूर्वनोंदणी करावी.

**संपादकीय पत्ता**

संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

www.mans.org.in
/pg/MaharashtraANiS /MahaANIS_MANS /t.me/mahaANIS

बुक पोस्ट

प्रति,

..............................

..............................

..............................

**प्रेषक**

कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर,
संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१